# मार्क्सवादी
# तत्त्वज्ञानाचा परिचय

न्यु व्हिस्तास पब्लिकेशनने प्रसिध्द केलेल्या पूस्तकाचे स्वैर संक्षिप्त रुपांतर


-: संक्षिप्त अनुवाद :-

शिरीष मेढी

**मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा परिचय**

© कॉपीराईट नाही

....................................

**प्रकाशन** : ९ सप्टेंबर २००८

(कॉ. माओ-त्से-तुंग स्मृतीदिन)

....................................

**प्रकाशक** :

सामाजिक विज्ञान केंद्र

दुसरा मजला, भूपाळी सोसायटी,

डॉ. निला परांजपे यांच्या रुग्णालया जवळ,

राममारूती रोड, ठाणे - ४००६०२

**संपर्क दूरध्वनी** : शिरीष मेढी - ९८९२६६४२२७

....................................

**मुद्रण** :

व्ही-टू एन्टरप्रायझेस, टिळक नगर,

साकीनाका, मुंबई - ४०००७२

....................................

**देणगी मूल्य** : ३० रू.

**कार्यकर्त्यांसाठी देणगी मूल्य** :२० रू.

....................................

(खाजगी वितरणासाठी)

# प्रकाशकीय

कार्ल मार्क्स, लेनिन व माओ यांनी आपल्या वर्ग संघर्षांच्या लढ्यांमधे मार्क्सवादी तत्वज्ञानाचा उपयोग कामगार वर्गाचे एक महत्वाचे हत्यार म्हणून केला व जगात क्रांतिकारक उलथापालथी घडवून आणल्या. आजच्या काळातील मार्क्सवादी तत्त्वज्ञान म्हणजे मार्क्सवाद - लेनिनवाद - माओवाद यांचा एकत्रित सार आहे. त्याचे महत्व अतिशयोक्ती करण्यापलीकडे आहे. समाजाविषयी व समाजातील बदलांविषयी योग्य समज प्राप्त करण्यासाठी व प्रस्थापित समाजव्यवस्था बदलण्यासाठी या तत्त्वज्ञानाचा अभ्यास व त्याच्या प्रकाशात कृती अत्यावश्यक आहे. या तत्वज्ञानाशिवाय कोणी जर समाजाचा विकास करू इच्छित असेल तर तो किंवा ती अंधारात तीर मारू पहात आहे व म्हणून त्यांनी मार्क्सवादी तत्त्वज्ञानाच्या प्रकाशाद्वारेच साम्राज्यवादी भांडवलशाही व जातीय सरंजामशाही पिळवणुकीरूपी अंधाराला नष्ट करणे शक्य आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

साामाजिक विज्ञान केंद्र -ठाणे तर्फे शोषीतांच्या चळवळीतील कार्यकर्त्यांसाठी व तसेच मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा अभ्यास करू इच्छिणाऱ्यांसाठी हे पुस्तक मराठीत प्रसिध्द केले जात आहे. या आधी कार्ल मार्क्सच्या राजकीय अर्थशास्त्रावर व पॉल बॅरन यांच्या विकासाच्या राजकीय अर्थशास्त्रावर एक संयुक्त पुस्तक आणि जागतिक आर्थिक परिस्थिती, विषमता, दारिद्रय व अर्थशास्त्र या नावाने एक पुस्तक प्रसिध्द करण्यात आले आहे.

प्रस्तुत पुस्तक न्यु विस्तास पब्लिकेशन, दिल्ली, द्वारा प्रकाशित इंग्रजी पुस्तकावर आधारीत आहे. आम्ही वाचकांना विनंती करीत आहोत की या पुस्तकातील लिखाणाबाबत काही सूचना वा सुधारणा असतील तर त्यांनी त्या अवश्य प्रकाशकांना कळवाव्यात.

**सामाजिक विज्ञान केंद्र -ठाणे**



# मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा परिचय

# प्रकरण -१

## तत्वज्ञान म्हणजे काय ?

मार्क्सवादी तत्त्वज्ञान मार्क्सवाद-लेनिनवाद-माओवादाचे महत्वाचे अंग आहे. मार्क्सवादी तत्त्वज्ञानास द्वंद्वात्मक व ऐतिहासिक भौतिकवाद असेही म्हटले जाते. मार्क्स व एंगल्स यांनी द्वंद्वात्मक व ऐतिहासिक भौतिकवादाची मांडणी केली. लेनिन व माओ या क्रांतीकारकांनी या तत्त्वज्ञानाचे उत्कृष्ट पध्दतीने विश्लेषण केले व त्याचा सृजनतापूर्वक विकासही केला. मार्क्सवादी तत्त्वज्ञान क्रांतीकारी व्यवहाराशी जोडलेले आहे. जगामध्ये क्रांतिकारी बदल घडवून आणण्याचे ध्येय व ते ध्येय साध्य करण्यासाठी आवश्यक असणारा व्यवहार, मार्क्सवादी तत्वज्ञानाचे अतिशय महत्वाचे पैलू आहेत. सर्वहारांच्या पक्षाचा जगाकडे बघण्याचा दृष्टीकोन मार्क्सवादी तत्वज्ञान हाच आहे. कुठलीही घटना समजून घेण्याची ती एक पध्दत आहे. वर्गविहिन समाजरचना निर्माण करण्याचे ऐतिहासिक कार्य सर्वहारा वर्गाने पार पाडण्यासाठी आवश्यक असा स्वत:चा जगाकडे बघण्याचा दृष्टीकोन या तत्त्वज्ञानाद्वारे विकसीत केला जातो. हे ऐतिहासिक कार्य पूर्ण करण्यासाठी आवश्यक अशा सर्वहारा वर्गाच्या क्रांतीकारी सिध्दांतासाठी वैज्ञानिक पाया मार्क्सवादी तत्त्वज्ञानाने मिळवून दिला आहे.

तत्त्वज्ञानाचा विकास समाजाच्या विकासाच्या अंतर्गतच होत असतो. तत्त्वज्ञानाच्या तीन हजार वर्षांच्या दीर्घ इतिहासात द्वंद्वात्मक भौतिकवाद हा तत्त्वज्ञानाच्या विकासातील सर्वोच्च टप्पा आहे, म्हणूनच आत्तापर्यंतच्या मानवाच्या एकूण सामाजिक व बौध्दिक विकासाचा परिणाम म्हणून मार्क्सवादी तत्त्वज्ञानाकडे बघितले पाहिजे.

तत्त्वज्ञान म्हणजे काय? कोणत्या विषयांवर विवेचन यात केले जाते? याबाबत तत्त्ववेत्त्यांमध्ये मतभेद आहेत. समाजाच्या विकासाबरोबरच नैसर्गिक व सामाजिक विज्ञान विकसीत झाले. या प्रक्रियेत तत्वज्ञानाच्या विषयांतही बदल झाले. गुलामांच्या समाजात तत्त्वज्ञान एक विज्ञान म्हणून पुढे आले. त्या काळात माणूस व त्याभोवती असलेल्या जगाचे ज्ञान म्हणून तत्त्वज्ञान विकसीत झाले. म्हणूनच आपणांस आढळून येते की, त्या काळातील तत्त्ववेत्ते एकाच वेळेस निसर्ग वैज्ञानिक व समाज वैज्ञानिकही होते. जेव्हा विज्ञान व सामाजिक विज्ञान अगदी प्राथमिक अवस्थेत होते, तेव्हा असे असणे अटळ होते. या परिस्थितीमुळे निसर्गाबाबत व सामाजिक विज्ञानाबाबत सर्वसाधारण माहिती एकत्र

गोळा झाली. यामुळेच असा गैरसमज प्रस्थापित झाला की, तत्त्वज्ञान असे विज्ञान आहे की, ज्यामध्ये विज्ञानाचे सर्व ज्ञान आहे व सर्व विज्ञानांमध्ये तत्वज्ञानाचे विज्ञान हे सर्वश्रेष्ठ आहे.

सामाजिक उत्पादनाच्या विकासाच्या दीर्घ प्रक्रियेमध्ये, जेव्हा सामाजिक व नैसर्गिक विज्ञान विकसीत झाले, तेव्हा तत्त्वज्ञान व अन्य विज्ञानांतील फरक स्पष्ट झाले. तरीसुध्दा तत्त्वज्ञान इतर विज्ञानांपेक्षा श्रेष्ठ आहे, असा गैरसमज अस्तित्वात होताच. मार्क्सच्या आधीच्या सर्व तत्त्ववेत्त्यांनीही असाच समज करुन घेतला होता. मार्क्स व एंगल्स यांनी अशा प्रकारे तत्वज्ञानाला अन्य विज्ञानांपेक्षा श्रेष्ठ ठरविणाऱ्या दृष्टीकोनाचा विरोध केला. त्यांनी तत्त्वज्ञानाची व्याख्या पुढील प्रमाणे केली. तत्त्वज्ञान हे असे विज्ञान आहे की, जे निसर्गाच्या विकासाच्या, मानवी समाज विकासाच्या व मानवी विचार प्रक्रियेच्या विकासाच्या सर्वसाधारण नियमांचा शोध घेत असते.

मार्क्सवाद्यांच्या या व्याख्येमुळे तत्त्वज्ञान आणि नैसर्गिक व सामाजिक विज्ञानातील जैविक व द्वंद्वात्मक संबंध स्पष्ट केले जातात. निरनिराळ्या विज्ञानांच्या सर्वसाधारण नियमांसाठी तात्विक दृष्टीकोन तत्त्वज्ञानामुळे मिळाल्यामुळे, त्यांचा विकास होत असतो. त्याच वेळेस विज्ञानातील विकासामुळे तत्त्वज्ञानाचा ही विकास होत असतो.

## तत्त्वज्ञानातील मुलभूत प्रश्न - जगाकडे बघण्याचे दोन दृष्टीकोन

मानव वस्तूनिष्ठ जगाचा एक अविभाज्य घटक आहे. हे जग जडवस्तूंचे आहे. माणूस हा विचार करणारा व जाणिव असलेला सजीव आहे. माणसाची जाणिव चैतन्यशिल आहे. माणसाच्या पंचेंद्रियांच्या क्रिया, भावना व विचार चैतन्यशिल आहेत.

आपण आधी पाहिल्याप्रमाणे तत्त्वज्ञान नक्की काय आहे, याबाबत तत्त्ववेत्त्यांमध्ये एकमत नाही. परंतू तत्त्वज्ञानातील चर्चेचे सर्व मुख्य मुद्दे, विविध मांडण्या व पध्दती एकाच प्रश्नाभोवती केंद्रीत झाल्या आहेत व हा प्रश्न तत्त्वज्ञानातील सर्वात मुलभूत प्रश्न आहे.

तत्त्वज्ञानातील व विशेषत: अलिकडच्या तत्वज्ञानातील मोठा मुलभूत प्रश्न, अस्तित्व व जाणिव यांच्या संबंधाविषयी आहे. (लुडविग फ्युअरबॅक-एंगल्स)

या प्रश्नाचे दोन भाग आहेत.

१) प्राथमिक महत्त्वाचे काय आहे ? अस्तित्त्व की जाणिव ?

२) अस्तित्त्व व जाणिव यांचा एकमेकांशी संबंध कसा आहे ? दुसऱ्या शब्दात हे जग आकलनशील आहे का ? या प्रश्नाद्वारे हेच आपण मांडू शकतो.

## अस्तित्त्व की जाणिव - प्राथमिक महत्त्वाचे काय आहे ?

अस्तित्व की जाणिव, वस्तुमान की कल्पना यापैकी मुलभूत महत्वाचे कोण आहे ? या पैकी कोण दुसऱ्यावर अवलंबून आहे ? या प्रश्नांना जी उत्तरे दिली गेली, त्या उत्तरांवरुन तत्त्वज्ञानी दोन गटात विभागले जातात.

ज्यांनी चैतन्य (जाणिव) प्राथमिक मानले व म्हणून सर्व प्रकारच्या चैतन्यवादींच्या मांडणीतून जगाचा निर्माता असला पाहिजे, असा अर्थ अटळपणे निघतो. अशा चैतन्यवाद्यांच्या गटाला 'कल्पनावादी' असे म्हणतात. अन्य दुसऱ्यांनी निसर्ग म्हणजेच वस्तुमान (अस्तित्व) प्राथमिक आहे, असे मांडले व हे तत्त्ववेत्ते निरनिराळ्या प्रकारच्या भौतिकवादी गटात मोडतात. (लुडविग फ्युअरबॅक-एंगल्स)

प्राथमिक महत्व निसर्ग, वस्तुमान, भौतिक व बाह्य जगाला द्यावे आणि जाणिव, मन, पंचेद्रियांना आलेले अनुभव यांना दुय्यम महत्व द्यावे, या मुलभूत प्रश्नावरून तत्त्ववेत्त्यांमध्ये दोन गट पडले आहेत. (भौतिकवाद व अनुभव प्रामाण्यवरील टीका-लेनिन)

**कल्पनावाद:** कुठल्याही प्रकारचा कल्पनावाद हे गृहित धरतो की, जगाच्या बाहेर असणाऱ्या व जगावर अवलंबून नसणाऱ्या, चैतन्यामुळेच वस्तुनिष्ठ जग अस्तित्वांत आले व त्याद्वारेच टिकले आहे. हे तत्त्ववेत्ते अशा चैतन्याला आत्मा किंवा ब्रह्म असे म्हणतात. अशा प्रकारच्या चैतन्यामुळे जग अस्तित्वात आले, असे गृहित धरल्यामुळे, या कल्पनावादातून देवाच्या अस्तित्वास किंवा निसर्गापेक्षा श्रेष्ठ असणाऱ्या शक्तिच्या अस्तित्वास धार्मिक आधार प्राप्त होतो व हेच जगावर नियंत्रण ठेवत असतात, असा गैरसमजही निर्माण होतो. म्हणूनच कुठल्याही प्रकारच्या कल्पनावादाचा धर्माशी जवळचा संबंध निर्माण होतो.(अनेक जण कल्पनावादास आदर्शवाद किंवा चैतन्यवाद असे ही म्हणतात. परंतु हे शब्द योग्य नाहीत.)

## कल्पनावाद मुख्यत: दोन स्वरुपात आढळतो

**वस्तुनिष्ठ कल्पनावाद :** वस्तुनिष्ठ कल्पनावाद असे मांडतो की, ज्या चैतन्याद्वारे वस्तुनिष्ठ जग वा वस्तूमान अस्तित्वात आले, ते चैतन्य दुसऱ्या जगातील आहे व मानवी चैतन्याशी त्याचा काही संबंध नाही. परमात्मा किंवा स्वयंपूर्ण चिद्‌भाव किंवा विश्वाचा प्रेरक मानवी अस्तित्वाच्या, मानवी जाणिवेच्या व भौतिक जगाच्या बाहेर आहेत. वेदांताचे सर्व प्रकार वस्तुनिष्ठ कल्पनावादात मोडतात. ब्रह्म किंवा परब्रह्म जगाच्या निर्मितीस कारणीभूत आहे, असे वेदांत मानते.

वस्तुनिष्ठ कल्पनावादामुळे वस्तुनिष्ठ जगाच्या बाहेरील चैतन्याद्वारे वर्गांच्या अस्तित्वास व वर्गीय दडपशाहीस पाया प्राप्त होतो व हे चैतन्यच निसर्ग व समाज नियंत्रीत करत

असल्यामुळे वर्गीय दडपशाही व पिळवणूकीची कारणे समाजात व वस्तुनिष्ठ जगात शोधण्यास काहीच अर्थ उरत नाही. शोषीत जनतेच्या मनावर या वस्तुनिष्ठ कल्पनावादाने एवढा परिणाम केला आहे की, त्यांच्या शोषणाची कारणे खाजगी संपत्तीमध्ये वा वर्गीय संबंधामध्ये आहेत, यावर त्यांचा विश्वास बसत नाही. ते समाजाबाहेरील व जगाबाहेरील शक्तीवरच अवलंबून राहतात.

वस्तुनिष्ठ कल्पनावादामुळे धर्मास व धार्मिक समजूतीस पाया उपलब्ध होतो. व हाच कल्पनावादाचा प्रमुख प्रकार आहे. प्लेटो (४२७-३२७ खिस्तापूर्वी) ते हेगेल (१७७०-१८३१) व नवहेगेलवादी तत्त्ववेत्ते या गटांत मोडतात.

**आत्मनिष्ठ कल्पनावाद** : आत्मनिष्ठ कल्पनावाद अशी मांडणी करतो की, वस्तुमान जगाचे अस्तित्व फक्त मानवी ज्ञानेंद्रियांमध्येच व विचारांमध्येच आहे व अन्यत्र कोठेही नाही. जॉर्ज बिशप बर्कले (१६८५-१७५३), डेव्हीड ह्यूम (१७११-१७७६) हे या गटांत येतात. जर कोणी या विचारांशी सातत्यपूर्वक सहमत होत असेल तर त्याची मनोधारणा होते की, जग म्हणजे फक्त स्वत:ला जाणवणारे वास्तव आहे व दुसरे काहीही नाही.

म्हणूनच सर्व प्रकारचे आत्मनिष्ठ कल्पनावादी अंतिमत: काही प्रमाणात वस्तुनिष्ठ कल्पनावादाकडेच येतात. आत्मनिष्ठ कल्पनावादाचा पुरस्कर्ता व स्थापक बिशप बर्कले यांनी तत्त्वज्ञानातून वस्तूमान ही संकल्पनाच काढून टाकण्याचा प्रयत्न केला. त्याने सांगितले की, बाह्य जग दुसरे तीसरे काही नसून, फक्त माणसांच्या ज्ञानेंद्रियांची जाणिव आहे. त्यास अशा निर्णयास यावे लागले की, देवानेच ज्ञानेंद्रिय निर्माण केली आहेत.

माणूस हा स्वतंत्र आहे व स्वत:च्या विकासास तो किंवा ती स्वत:च जबाबदार आहे असे सांगणारे तत्त्व, माणसांचे म्हणणे केवळ व्यवहारांच्या परिणामांद्वारेच व मानवाचा स्वार्थ साधण्याच्या दृष्टीकोनातून विचारात घेतले पाहिजे असे सांगणारे तत्त्व, जी माणसे चैतन्य ही संकल्पना मान्य करत नाही व ज्यांचे विचार प्रत्यक्षातील निरिक्षणांवर अवलंबून असतात. अशा प्रत्यक्षवादी व्यक्तींची तत्त्वे ही सर्व तत्त्वे भांडवली तत्त्वे आहेत व ही तत्त्वे आधूनिक विज्ञानावर आधारित आहेत असाही दावा करतात. पण ही सर्व तत्त्वे आत्मनिष्ठ कल्पनावादी तत्त्वे आहेत. ही तत्त्वे सुध्दा अंतिमत: वस्तूनिष्ठ कल्पनावादाकडेच जातात व धर्म आणि धार्मिक संकल्पना वृध्दींगत करतात.

कल्पनावादाचे हजारो निरनिराळे प्रकार आहेत व त्यामध्ये आणखी एखादा प्रकार कोणीपण आणू शकतो. असा नविन प्रकार आणणाऱ्याला या नव्या प्रकारातील भिन्नता खूप महत्त्वाची वाटते. परंतू भौतिकवादी दृष्टीकोनातून या सर्वांमधील भिन्नतेला काहीही महत्व नाही. (लेनिन)

कल्पनावाद वस्तूमय जगाचे खरे अस्तित्वच नाकारतो. यामुळे लोकांना असा आभास होण्याचा प्रयत्न केला जातो की, वर्गाचे अस्तित्व, वर्गीय शोषण, कामगार वर्गाची दयनीय व भीषण परिस्थिती, शोषण करणाऱ्या वर्गाचे विलासी जगणे हे सर्व काही भ्रम आहेत व म्हणून मिथ्य आहेत. केवळ आत्मा, परमात्मा, ब्रह्म इत्यादी वास्तव आहे व त्यांच्या बाबतीतील ज्ञानच खरे ज्ञान आहे असा गैरसमज निर्माण होतो. कल्पनावाद धर्माचा तात्विक पाया बनतो. सर्व धर्म मांडणी करतात की, प्रत्येकाने हे नित्याचे निरस जग विसरून जावे व दुसऱ्या जगाची इच्छा बाळगावी. मुक्ती, समाधी, निर्वाण यासारखे मार्ग खऱ्या अर्थाने मृत्युकडे नेणारे मार्ग आहेत. धर्मामुळे असा भ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो की ज्या इच्छा, आकांक्षा या जगात पूर्ण होत नाहीत त्या दुसऱ्या जगात पूर्ण केल्या जातील. सत्ताधारी वर्ग म्हणजेच उत्पादन साधनांची मालकी असलेला वर्ग, धर्म व कल्पनावादी तत्त्वज्ञानाचा उपयोग वर्गीय शोषण कायमपणे चालू राहण्यासाठी एक शक्तीशाली शस्त्र म्हणून करतो.

**भौतिकवाद -**भौतिकवाद असे मांडतो की, वस्तूमय जग किंवा निसर्ग बाहेर अस्तित्वात आहे व जाणिव किंवा चैतन्य यापासून स्वतंत्र आहे. कल्पनावादाच्या अगदी विरोधी मांडणी भौतिकवाद करतो व जाणिव वस्तूमय जगावर अवलंबून आहे, असे मांडतो. भौतिकवाद मांडतो की, जाणिव वस्तूमय जगाची उत्पत्ती आहे. या वस्तूमय जगाच्या निर्मितीसाठी कुठल्याही निर्मात्याची आवश्यकता नव्हती आणि हे जग अस्तित्त्वात आहे. भौतिकवाद धर्म व धार्मिक श्रध्दांच्या विरोधात उभा आहे.

भौतिकवादाच्या विकासाच्या क्रमात भौतिकवाद तीन स्वरुपात मांडला गेला.

१) पूरातन भौतिकवाद (खिस्तपूर्व सात ते एक शतक) २) यांत्रिक भौतिकवाद (१७-१८ व्या शतकातील) ३) द्वंद्वात्मक व ऐतिहासिक भौतिकवाद म्हणजेच वैज्ञानिक भौतिकवाद.

## विचार प्रक्रिया व अस्तित्त्व यांचा परस्पर संबंध

मानवी विचार प्रक्रिया किंवा जाणिव वस्तूमय जगाबाबत अचूक ज्ञान मिळवू शकतात का? या प्रश्नाची दोन उत्तरे आहेत. बहुसंख्य तत्त्ववेत्त्यांनी मांडणी केली आहे की, मानवी जाणिव वस्तूमय जगाचे वा जडवस्तूंचे ज्ञान अचूकपणे प्राप्त करु शकते. याचा अर्थ असा होतो की, जगाचे आकलन होणे शक्य आहे.

परंतू काही तत्त्ववेत्त्यांची मांडणी अशी आहे की, मानवी जाणिव जगाचे आकलन करण्यास असमर्थ आहे. अशा तत्त्ववेत्त्यांना इंग्रजीमध्ये ॲग्नॉस्टिक असे म्हणतात. पूरातन ग्रीक तत्त्ववेत्त्यांच्या (कांट व हुमे) स्वरुपात ॲग्नॉस्टिसीझम अस्तित्त्वात आला. आधूनिक

काळातील आत्मनिष्ठ कल्पनावादी, नवप्रत्यक्षवादी व माणूस स्वतंत्र आहे व स्वत:च्या विकासास तोच जबाबदार आहे, असे सांगणारे तत्त्ववेत्ते सुध्दा ॲग्नॉस्टिकच आहेत. कारण त्यांचे म्हणणे आहे की, विज्ञानालाही मर्यादा आहेत व म्हणून निसर्ग, मानवी समाज व त्याचे नियम विज्ञानाद्वारे पूर्णपणे आकलन होऊ शकत नाही.

## पध्दतीशी संबंधीत प्रश्न

### तत्त्वज्ञानातील दोन पध्दती

कुठल्याही विज्ञानामध्ये अभ्यास करण्यासाठी व पडताळणीसाठी एक विशिष्ठ पध्दत असते. ती पध्दत वापरल्यामुळे त्या विज्ञानाद्वारे एखाद्या विषयाचा पध्दतशीरपणे अभ्यास व अवलोकन करणे शक्य होते. योग्य व विशिष्ठ पध्दत वापरल्याशिवाय विज्ञानातील वा व्यवहारातील कुठलाही प्रश्न सोडविणे अशक्य आहे. म्हणून पध्दत म्हणजे नक्की काय असा प्रश्न उपस्थित होतो. ज्या उद्देशांनी अभ्यास करायचा असतो वा प्रत्यक्ष व्यवहार करायचा असतो तो उद्देश साध्य कण्यासाठी जे काही विशिष्ठ तऱ्हेने केले जाते, त्यास पध्दत असे म्हणतात.

ज्या तऱ्हेने तत्त्वज्ञानातील मुलभूत प्रश्नाबाबत दोन एकदम विरोधी दृष्टीकोन आहेत, त्याच तऱ्हेने पध्दतीबाबत दोन विरोधी मते आहेत. १) अधिभौतिक पध्दत २) द्वंद्वात्मक पध्दत.

## अधिभौतिक पध्दत

ही पध्दत वस्तूमय जगातील एकत्व मान्य करीत नाही. या पध्दतीच्या म्हणण्यानुसार निसर्गात बदल होत नाहीत व निसर्ग गतिहीन आहे. ही पध्दत गुणवत्तेमधील बदल व गुणवत्तेचा विकास अमान्य करते.

या पध्दतीचे उत्कृष्ट उदाहरण पेरमेनीडूस (इ.स. पूर्वी ५०० वर्षे) हा आहे. हेराक्लीटस याने जेव्हा सांगितले की, सर्वकाही बदलत असते, तेव्हा पेरमेनीडूस याने सांगितले, की काहीही बदलत नाही. नंतर सतराव्या व अठराव्या शतकात भांडवलशाही व विज्ञान विकासाच्या प्राथमिक टप्प्यात होते तेव्हा अधिभौतिक पध्दतीने तत्त्वज्ञानात शिरकाव केला. अधिभौतिक पध्दत सामाजिक विज्ञानात आपले खरे स्वरुप उघडे करते व संपत्ती असलेल्या वर्गाच्या बाजूने मांडणी करते.

वरवर बघता, जे अगदी अलग अलग वाटते (विशेषत: सामाजिक बाबींच्या संदर्भात) पण प्रत्यक्षात त्या अलग अलग वाटणाऱ्या घटना, बाबी यांचा एकमेकांशी संबंध असतो. अधिभौतिकी पध्दतीमध्ये मात्र या संबंधांना वगळण्यात येते. परिणामी ज्या बाबींचा संबंध संपूर्ण समाजाशी येतो त्या बाबींचा विचार मात्र एक एक व्यक्तिपूरता वा एखाद्या गटापूरताच

अलग अलगपणे, या पध्दतीमध्ये केला जाऊ शकतो. जनतेचे अलग अलग विभाग, गट व व्यक्ती आपले प्रश्न सोडविण्यासाठी स्वतंत्रपणे झगडत असल्यामुळे समाजातील शोषण करणाऱ्यांच्या वर्गाचा, दडपशाही करणाऱ्या वर्गाचा फायदाच होत असतो. या पध्दतीमुळे शोषीतांची एकजूट होण्यास अडथळा होत असल्यामुळे पिळवणूकीविरुध्द, दडपशाहीविरुध्द व वर्गीय समाजरचनेविरुध्द शक्तीशाली व निर्णायक व एकजूटीचा संघर्ष उभा राहू शकत नाही. या पध्दतीमुळे अशा एकजुटीच्या संघर्षाची आवश्यकताच लोकांसमोर येऊ शकत नाही.

संख्यात्मक बदलांचा गुणात्मक बदलात रुपांतर होऊ शकते, हेच मुळी अधिभौतिकी पध्दत मान्य करत नाही. म्हणून या पध्दतीमुळे अशा विचारसरणीला तत्त्वज्ञानाचा आधार प्राप्त होतो, की जी विचारसरणी सामाजिक विकास हा हळूहळू होणाऱ्या संख्यात्मक बदलांद्वारेच होतो, असे सांगते व जीचा अचानक होणाऱ्या संख्यात्मक बदलातील गुणात्मक रुपांतरावर विश्वास नसतो. म्हणूनच ही पध्दत आहेरे वाल्यांच्या वर्गाचे हीत सांभाळते व सामाजिक क्रांतीद्वारे होणाऱ्या सामाजिक विकासास विरोध करीत असल्यामुळे त्या आहेरे वाल्या वर्गाची सत्ता अबाधीत ठेवत असते. ही पध्दत भांडवलदारांचे हीत सांभाळण्याच्या आवश्यकतेमुळे भांडवलशाहीच्या विकासाबरोबरच निर्माण झालेली आहे.

### द्वंद्वात्मक पध्दत

तत्त्वज्ञानामध्ये द्वंद्वात्मक पध्दत ही संकल्पना अधिभौतिकी पध्दतीच्या एकदम विरोधी आहे. द्वंद्वात्मक पध्दत एकत्व मान्य करते. याचाच अर्थ असा की, ही पध्दत निरनिराळ्या घटना, बाबी यांच्यातील परस्पर संबंध विचारात घेते. या पध्दतीमध्ये हे मान्य केले जाते की, वस्तूमय जग सतत गतिमान आहे, त्यात बदल होत असतात व त्यात विकासही होत असतो. जगातील विकास दोन विरोधी घटकांतील संघर्षातून होत असतो, असे ही पध्दत मानते. जुने नष्ट होण्याचे व नविन निर्माण होण्याची प्रक्रिया चालू असते व तसेच खालच्या पातळीवरून वरच्या पातळीकडे प्रगति होत असते, असे मानले जाते.

द्वंद्वात्मक पध्दतीचा विकास तीन टप्प्यात झाला आहे.

१) पूरातन भौतिकवादींची द्वंद्वात्मक पध्दत

२) १८ व १९ व्या शतकातील जर्मन कल्पनावाद्यांची द्वंद्वात्मक पध्दत

३) मार्क्सवाद्यांची भौतिकवादी द्वंद्वात्मक पध्दत

### मार्क्सवादी तत्त्वज्ञान कशा प्रकारचे आहे ?

अन्य तत्वज्ञानाप्रमाणे मार्क्सवादी तत्त्वज्ञान वस्तूमान व जाणीव आणि अस्तित्व व

विचारप्रक्रिया यांमधील संबंधाविषयी सैध्दांतिक मांडणी करते. परंतू विज्ञानाच्या आधारेच मार्क्सवादी तत्त्वज्ञानाची मांडणी करीत असल्यामुळे या प्रश्नांची उत्तरे वैज्ञानिक आहेत. द्वंद्वात्मक भौतिकवाद भौतिकवादाचा केवळ सर्वोच्च टप्पा नाही तर तर्कनिष्ठ व वैज्ञानिक भौतिकवाद आहे.

भौतिकवाद व द्वंद्वात्मक पध्दत मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचे जिवंत व अविभाज्य घटक आहेत. मार्क्सवादी तत्त्वज्ञान निसर्गाचाच केवळ अभ्यास नाही, तर समाज आणि मानवी विचारप्रणालीचाही द्वंद्वात्मक पध्दत वापरून केलेला अभ्यास आहे. हे तत्त्वज्ञान गतिचे नियम, तसेच निसर्ग, समाज आणि मानवी विचारप्रणाली मधील बदल व विकास यांचा अभ्यास आहे. मार्क्सने लिहीले आहे की, ''**तत्त्ववेत्यांनी जगाचे विश्लेषण निरनिराळ्या प्रकारे केले आहे. पण महत्वाचे हे आहे की, जगामध्ये बदल घडवून आणला पाहिजे**''. याद्वारे मार्क्सवादी तत्त्वज्ञानाच्या क्रांतीकारी स्वरुपाला मार्क्सने महत्व दिले आहे, हे लक्षात येते. मार्क्सवादी तत्त्वज्ञान वस्तूमय जगाच्या विकासाचे सर्वसाधारण नियम तर स्पष्ट करतेच व तत्त्वज्ञानातील मुलभूत प्रश्नांची सोडवणूकही करते. व शिवाय जगामध्ये क्रांतिकारी बदल घडवून आणण्यासाठी आवश्यक असणाऱ्या साधनांबाबतही माहिती देते. याबाबत त्याच्या खास शैलीनुसार मार्क्स सांगतो की, मार्क्सवादी तत्त्वज्ञानामध्ये सर्वहारा वर्ग स्वत: वस्तुनिष्ठ शस्त्र आहे, तर सर्वहारा वर्गाचे मार्क्सवादी तत्त्वज्ञान हे आध्यात्मिक शस्त्र आहे.

असे कुठलेही तत्त्वज्ञान अस्तित्वात नाही की, जे एका विशिष्ठ वर्गाची विचारप्रणाली नाही. मार्क्सवाद ही एका विशिष्ठ वर्गाची विचारसरणी आहे. फरक हाच आहे की, मार्क्सवाद ही बाब स्पष्टपणे जाहीर करतो. द्वंद्वात्मक भौतिकवाद सर्वहारा वर्गाचा जगाकडे बघण्याचा दृष्टीकोन आहे. तो कामगार वर्गाच्या मुलभूत हीताचे प्रतिनिधीत्व करतो. द्वंद्वात्मक भौतिकवाद कामगार वर्गाला आर्थिक व आध्यात्मिक गुलामगिरीतून मुक्त होण्याचा मार्ग दाखवितो. केवळ मार्क्सवादी तत्त्वज्ञानच जगाकडे बघण्याचा वैज्ञानिक दृष्टीकोन उपलब्ध करुन देते. मार्क्सच्या आधीच्या बहूसंख्य तत्त्ववेत्त्यांनी संपत्ती असणाऱ्या वर्गाच्या हीताची बाजू घेतली. याच कारणामुळे या तत्त्ववेत्त्यांनी जगातील वास्तव परिस्थितीचे विश्लेषण करतांना वास्तवाचे विकृतीकरण केले. सर्वहारा हा संपत्तीहीन वर्ग आहे. तो खाजगी मालमत्तेचे अस्तित्व नष्ट करून मुक्त होऊ शकतो. स्वत:ची मुक्तता करण्यासाठी व सर्वहारा वर्गांच्या हीतासाठी जगाचे आकलन वैज्ञानिक दृष्टीकोनातून करणे आवश्यक आहे. म्हणून मार्क्सवादी तत्त्वज्ञान जरी सर्वहारा वर्गाचे पक्षपाती असले, तरी ते वैज्ञानिक दृष्टीकोन उपलब्ध करुन देते.

# प्रकरण -२

## तत्त्वज्ञानाचा इतिहास

तत्त्वज्ञानाचा इतिहास हा कल्पनावाद आणि भौतिकवादामधील संघर्षाचा इतिहास आहे. द्वंद्वात्मक व ऐतिहासिक भौतिकवाद असे तत्त्वज्ञान आहे की, ज्यास आधीच्या सर्व काळातील सैध्दांतिक व वैज्ञानिक यश, शोध यांचा वारसा प्राप्त झाला. म्हणून भौतिकवाद व द्वंद्वात्मक पध्दतीचा विकास समाजाच्या प्रगतिबरोबर व विज्ञानाच्या विकासाबरोबर कसा झाला याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. तत्त्वज्ञानाच्या इतिहासाच्या अभ्यासावरून लक्षात येते की, तत्त्वज्ञानाच्या विकासाचा सामाजिक व्यवहाराशी खूप जवळून संबंध आला आहे.

तत्त्वज्ञानाचा गेल्या तीन हजार वर्षांचा इतिहास, म्हणजे कल्पनावाद आणि भौतिकवादातील संघर्षाचा इतिहास आहे. आदिम साम्यवादी समाजाच्या काळापासून तत्त्वज्ञानाच्या वैचारिक कार्याला सुरुवात झाली. तेव्हापासूनच कल्पनावाद व भौतिकवाद या दोन प्रवाहांचा उगम झाला. नैसर्गिक शक्तींबाबतचे अज्ञान व त्यांच्या भीतीपोटी जादूटोणाच्या संकल्पना व कल्पनावाद उदयास आले. परंतू त्यावेळेस आदिम माणसाच्या लक्षात आले होते की, वस्तूमय जग वास्तवात अस्तित्वात आहे, परिणामी भौतिकवादी संकल्पना उत्स्फुर्तपणे निर्माण होऊ लागल्या. अर्थात त्या अगदी साध्या वा बालीश होत्या.

गुलामांच्या समाज व्यवस्थेमध्ये बौध्दिक व शारीरिक श्रमांची विभागणी उदयास आली. त्यानंतर कल्पनावादी व भौतिकवादी दृष्टीकोन काही प्रमाणात विकसीत झाले. संपत्ती असलेला वर्ग श्रमप्रक्रिया व उत्पादनापासून अलग झाला व ही कामे हलक्या दर्जाची आहेत असे मानायला लागला. या तऱ्हेने पूर्णपणे बौध्दिक कार्ये अस्तित्वात आली व त्यांचा कुठलाही संबंध सामाजिक व्यवहाराशी येत नव्हता. त्यांच्या विचार प्रक्रिया व्यवहारांशिवाय घडत गेल्यामुळे त्यांच्या जाणिवा वास्तवविरहित होत्या.

वर्गीय समाजाच्या सुरुवातीपासुनच कल्पनावाद व धर्माची आवश्यकता सत्ताधारी वर्गाला आपली सत्ता टिकविण्यासाठी भासू लागली. तेव्हापासून ते आजपर्यंत कल्पनावादाने प्रतिगामी भूमिका स्विकारली आहे. कल्पनावादाच्या आधारावर उभ्या असलेल्या धर्माने विज्ञानाच्या प्रगतीत अडथळे आणले आहेत.

प्रगतिशील शक्तींचा व वर्गाचा दृष्टीकोन नेहमीच भौतिकवादी राहीला आहे. समाजातील प्रगतीशील शक्ती व प्रतिगामी शक्तींमधील संघर्षाचे प्रतिबिंब अनेकदा कल्पनावाद व भौतिकवादांमधील संघर्षामध्ये पडत असते. वर्गसंघर्षाची प्रेरणा असलेल्या वर्गीय समाजाच्या ऐतिहासिक विकासाबरोबरच तत्वज्ञानाचा इतिहास घडत गेला आहे. तत्त्वज्ञानाचा विकास मुख्यत: भारत, चीन व ग्रीसमध्ये खिस्तापूर्वी ७ ते १ या शतकांच्या काळात गुलामांच्या समाजातील सामाजिक विज्ञानाच्या विकासाबरोबरच झाला.

## पूरातन भारतीय तत्त्वज्ञान

सिंधु संस्कृतीच्या काळातील तत्त्वज्ञानामधील विचारांच्या विकासासंबंधी आपणास खात्रीशीरपणे व नक्की माहिती उपलब्ध नाही. परंतू त्यांनी त्यांच्या धार्मीक विधींमध्ये निरनिराळ्या देवांना व देवतांना जे काही महत्त्व दिले आहे, त्यावरून आपण असे म्हणू शकतो की, त्यांचा धर्म व धार्मिक संकल्पना आदिम काळातील शेती करणाऱ्या जमातींच्या जादूटोणा तंत्रातूनच विकसीत झाल्या आहेत. आर्य जमातींनी भारतामध्ये जनावरांच्या कुरणांसाठी बाहेरून प्रवेश केला. यज्ञामध्ये व अन्य विधींमध्ये जे कर्मकांड केले जाते, ते सुध्दा जादूटोणा आहे. कुरणांवर आधारित आर्य जमातींमधील स्त्रीयांना कृषी जमातीमधील स्त्रीयांच्या स्थानापेक्षाही खालचे स्थान दिले जायचे. पूढील काळात जेव्हा वर्गीय समाज प्रस्थापित झाला व वाढला तेव्हाच्या काळातील निरनिराळ्या दर्शनांमध्ये आपणास आर्य व अनार्यांच्या जादूटोणाच्या खूणा अजूनही आढळतात.

भारतीय तत्त्वज्ञानाने खिस्तापूर्वी ७ ते ५ शतकांच्या काळात आकार घेण्यास सुरवात केली. हा काळ आदिम साम्यवादी व्यवस्थेमधून वर्गीय समाजाकडे जाण्याचा काळ होता. या काळातच जुन्या तत्त्वज्ञानातील संकल्पनांना व श्रध्दांना आव्हान दिले गेले. जैन व बुध्द तत्त्ववेत्त्यांनी या काळातच वैदिक तत्त्ववेत्यांपुढे आव्हान उभे केले. खिस्तापूर्वीच्या पाचव्या व चौथ्या शतकाच्या काळात सूत्र व दर्शन (तत्त्वज्ञानाचे विचार) उदयास आली. भारतीय तत्त्वज्ञान अनेक भिन्न तऱ्हेने विकसीत झाले.

नविन येणाऱ्या कृषी समाजाच्या गरजांच्या विरोधात यज्ञ व अन्य कर्मकांडे येऊ लागली. अहिंसेचे पूरस्कार करणारे जैन व बुध्द तत्त्वज्ञान शेतकऱ्यांमध्ये पाया मिळवू शकले. कारण त्यामुळे जनावरांच्या कत्तली कमी झाल्यामुळे कृषी क्षेत्राचा विकास होणे शक्य झाले. ब्राह्मणांच्या वर्चस्वास व वेदांच्या प्रभुत्वास या तत्त्वज्ञानांमुळे आवाहन मिळाले. क्षत्रियांनीही ब्राम्हणांच्या वर्चस्वावर विजय मिळविण्याचा प्रयत्न केला. बुध्दाचे तत्त्वज्ञान या नविन समाजाचे प्रतिनिधित्व करु लागले व त्यास क्षत्रिय व वैश्य लोकांची मान्यता मिळाली.

दुसऱ्या बाजूला ज्यांनी वेदाचे प्रभूत्व मान्य केले, पण कर्मकांड (यज्ञ, याग इ. विधी) नाकारली व दुसरा पंथ स्विकारला व उपनिषदांवर आपली श्रध्दा व्यक्त केली व कर्म मार्गाचा त्याग केला त्यांनी नविन समाजाचे प्रतिनिधीत्व केले. त्यामुळे भारतीय दर्शनांची आपण दोन विभागात वर्गवारी करू शकतो.

अ) वेदांचे प्रभूत्व मान्य करणारी दर्शने :

१) पूर्व मीमांसा किंवा मीमांसा, २) उत्तर मीमांसा किंवा वेदांत, ३) सांख्य, ४) न्याय, ५) वैशेषिक, ६) योग.

ब) वेदांचे प्रभुत्व मान्य न करणारी दर्शने :

१) बुध्दवाद, २) जैनवाद, ३) लोकायत

## पुर्व मीमांसा

खिस्तापुर्वी दोनशे वर्षे ते इ.सन दोनशे साल या कालखंडात मीमांसा सुत्र जैमिनी यांनी एकत्र केली. या तत्वज्ञानाने देवाचे अस्तित्व नाकारले आहे. कारण देवाच्या अस्तित्वाबाबत पुरावा उपलब्ध नाही. यज्ञातील मंत्राचे आवाज म्हणजे देवाचे एक स्वरुप आहे असे समजले गेले. यज्ञ व कर्मकांड जादुटोण्याचेच एक भाग म्हणून मानण्यात आले. या तत्वज्ञानाने अद्वैत प्रकारच्या कल्पनावादाला नाकारले आहे व शंकराच्या मायावादावर टीका केली आहे.

## वेदांत (उत्तर मीमांसा)

बद्रायनाच्या ब्रह्म सुत्रांच्या आधारावर हे तत्वज्ञान उभे राहिले आहे. गौदपदाने या तत्वज्ञानाचे भाष्य आठव्या शतकात केले व ते भाष्य अद्वैत प्रकारच्या कल्पनावादाचा आधार झाले व पुढील काळातील भारतीय कल्पनावादाचाही आधार बनले. मांडूक्य कारिका द्वारे गौदपदाने जगमिथ्यावादाचा पुरस्कार केला. मध्य युगातील सत्ताधाऱ्यांमध्ये हे तत्वज्ञान लोकप्रिय झाले होते व ते अतिशय प्रतिगामी स्वरुपाचे होते. मोक्ष म्हणजे आत्म्याचे /ब्रह्माचे ज्ञान प्राप्त होणे असे हे तत्वज्ञान सांगते. अद्वैत म्हणजे केवळ जाणिवच अस्तित्वात आहे असे समजणे. भौतिक जडवस्तुंचे अस्तित्व हे तत्वज्ञान नाकारते.

## सांख्य

सांख्य तत्वज्ञान हे पुढील प्रश्नाने सुरु होते. या जगाचे मुख्य कारण काय आहे? हे तत्वज्ञान सर्वव्यापी ईश्वराचे आणि ब्रह्माचे अस्तित्व नाकारते. हे तत्वज्ञान सत्कार्यवाद किंवा महतकार्यवादाचा आधार घेते. प्रत्येक परिणामामागे काहीतरी कारण आहे व म्हणून या जगाच्या कारणांचा शोध आपण घेतले पाहिजे असे हे तत्वज्ञान सांगते. जग हे मुख्यत:

भौतिक जडवस्तुंचे आहे व म्हणून या जगाचे कारण प्रकृती (निसर्ग) आहे. सांख्य तत्वज्ञानाने कल्पनावाद नाकारला व भौतिकवाद स्विकारला. पण नंतरच्या काळात या तत्वज्ञानाचे रुपांतर जाणिवपूर्वक कल्पनावादामध्ये करण्याचे प्रयत्न झाले.

## योगशास्त्र

पंतजलीने योगसुत्रे मांडली. योग म्हणजे अति नैसर्गिक शक्ती प्राप्त करण्याची पुरातन पद्धत आहे. योगशास्त्राने या जगातील भौतिक जडवस्तुंचे गुणधर्म व विशेषत: मानवी शरीराचे गुणधर्म समजण्याचे प्रयत्न केले. म्हणुनच योगशास्त्र विज्ञानाचा विकास करण्यास कारणीभूत झाले आहे. नंतरच्या काळात योगशास्त्राचे रुपांतर हठवाद, रसवाद व तांत्रिकवादामध्ये झाले. बुद्धधर्माने व जैनवादाने योगशास्त्राची चर्चा केली आहे.

## न्याय-वैशेषिक शास्त्र

या दोन शास्त्रामध्ये भौतिकवादाचे मजबूत धागे होते व ही दोन्ही पुढील काळातील प्रभुत्व गाजविणाऱ्या कल्पनावादाच्या विरोधात होती. यांनी अस्तित्वातील जगाचे सत्य मान्य केले होते व हे सत्य समजून घेण्याचे प्रयत्न केले.

न्याय- आत्मा या संकल्पनेचा स्विकार या शास्त्राने केला, पण ब्रह्माचे (देवाचे) अस्तित्व नाकारले. या तत्ववेत्यांनी भारतीय तर्कशास्त्र निर्माण केले. वात्सायन, उद्योतकारा व विश्वनाथ यांचा देवावर विश्वास नव्हता. परंतु वाचस्पती, वर्धमान इ.नी पुढील काळात देवाचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी प्रमाणशास्त्राचा वापर केला.

वैशेषिक - या शास्त्राप्रमाणे आपल्या ज्ञानेंद्रियांना जाणवणारे व न जाणवणारे असे दोन जग आहेत. त्यांनी अणूंनी जड वस्तू तयार झाल्या आहेत असे सांगितले. पण या अणूंना गती नसते असे मांडले व म्हणून हे शास्त्र कल्पनावादाकडे वळले.

## जैन तत्वज्ञान

जैन तत्वज्ञानाने वेदांचे प्रभूत्व अमान्य केले व देवांचे अस्तित्व ही नाकारले. तरीही मुलभूतपणे हे कल्पनावादी तत्वज्ञान होते. बुद्धांचा समकालीन महावीर या शास्त्राचा शेवटचा तत्ववेत्ता होता. जैन शास्त्राने आत्मा व कर्म मान्य केले. ज्याप्रमाणे तेलयुक्त वस्तु धुळीला आकर्षित करते त्याप्रमाणे कर्म आत्म्याशी जोडलेले असते. वनस्पती, प्राणी, पक्षी व पंचभूतास कायमपणे जीव असतो असे समजले गेले. अहिंसा ही त्यांची गरज होती. जैनवाद केवळ व्यापारी वर्गापुरताच मर्यादित राहिला.

## लोकायत

आर्य भारतात येण्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या असूर दृष्टीकोनाद्वारे लोकायत शास्त्र

विकसित झाले. पुरातन कृषी समाजातील जादूटोण्याच्या तंत्रातून हे सुसंगत भौतिकवादी शास्त्र तयार झाले. या शास्त्राने केवळ वैदिक विधिंनाच विरोध केला नाही तर ब्राह्मण वर्ग व भारतातील पहिल्या वर्ग व्यवस्थेला म्हणजेच वर्ण व्यवस्थेला विरोध केला. चरकाच्या आधी शेकडो वर्षे लोकायतच्या तांत्रिकांना मानवी शरीराविषयी वैज्ञानिक माहिती होती. वर्ण व्यवस्थेला लोकायतने आव्हान दिल्यामुळे सत्ताधारी वर्गाने त्यांच्यावर दडपशाही केली.

□ या शास्त्राप्रमाणे जग म्हणजे खरे भौतिक वास्तव आहे. आग, पृथ्वी, पाणी व हवा ही चार महाभूते या जगाचे भौतिक घटक आहेत व ते त्यांच्यामधील गतीमुळे क्रियाशील असतात.

□ फक्त या जगाचे अस्तित्व सत्य आहे व मृत्यूनंतर जीवन असू शकत नाही. म्हणजे त्यांनी दुसरे जग व पुनर्जन्म या संकल्पनांना नाकारले.

□ निसर्गापेक्षा श्रेष्ठ व पवित्र शक्ती अस्तित्वात नाही. देव ही संकल्पना श्रीमतांनी गरीबांना फसविण्यासाठीच तयार केली आहे. सर्व धार्मिक लिखाण काही स्वार्थी लोकांच्या कल्पनेची भरारी आहे.

□ भौतिक जडवस्तूंपासून अलग असलेला आत्मा अस्तित्वात नाही. आत्मा म्हणजे दुसरे काही नसून विचार करू शकणारे फक्त भौतिक जडवस्तू आहे.

□ सर्व दु:खाची मुळे या जगातील अन्यायात व क्रुरते मध्ये दडलेली आहेत व आधीच्या जन्माशी त्यांचा काही सबंध नसतो. कर्म सिद्धांत हा खोटा विचार आहे.

□ आपल्या अनुभवाच्या पलिकडे काही अस्तित्वात नाही. माणसास खरे ज्ञान फक्त त्यांच्या ज्ञानेंद्रियांच्या ग्रहणातून प्राप्त होऊ शकते.

□ ज्ञानप्राप्तीच्या प्रक्रियेमध्ये दैनंदिन कार्यांच्या सहभागाचे महत्व लोकायतच्या लक्षात आले नाही व ज्ञानेंद्रियांनी मिळविलेले ज्ञान आणि बुद्धीप्रामाण्ययुक्त ज्ञान यामधील द्वंद्वात्मक संबंध लोकायत प्रस्थापित करू शकला नाही.

लोकायतने ब्राह्मणी धर्म व कर्मकांड आणि वर्णव्यवस्थेद्वारा होणारे वर्गीय शोषण व दडपशाही यांवर हल्ला चढविला. म्हणूनच सत्ताधाऱ्यांनी लोकायतची हेटाळणी केली व या विचारांच्या व्यक्तींचा छळ केला. लोकायतची सर्व मुळ ग्रंथसंपदा नष्ट करण्यात आली. लोकायतवर जी टीका झाली व अपमानास्पद कृत्ये त्याविरुद्ध करण्यात आली त्या सर्वांद्वारेच आपणास लोकायत विषयी माहिती मिळू शकते.

अशा तऱ्हेने भारतामध्ये कल्पनावाद व भौतिकवाद यांचा संघर्ष पुरातन काळापासून

चालू आहे. या संघर्षातूनच येथील तत्वज्ञान विकसित झाले आहे. हिंदूवादी जरी अमान्य करीत असले तरी भारतामध्ये भौतिकवादी विचारधारा मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होत्या. साम्राज्यवादी व गुलामी पत्करलेल्या बुद्धीजीवींनी अशी खोटी बोंब उठवली आहे की, भारत दैववादी आहे व पश्चिमेकडील देश भौतिकवादी आहेत.

## बुध्दवादाचे तत्त्वज्ञान

बुध्दवादाने त्यावेळी वाढणाऱ्या कृषी उद्योगाच्या व वर्गीय समाजाच्या गरजा समाजापुढे आणल्या, म्हणूनच बुध्दवाद प्रसिध्दी व पूरस्कर्ते प्राप्त करू शकला. बुध्दवादामध्ये काही भौतिकवादी घटक होते.

गौतम बुध्द (खिस्तपूर्व ५६३-४८३) शाक्य गणाचा राजपूत्र होता. त्यावेळेच्या समाजातील अमानवी परिस्थितीमुळे त्याच्या मनावर फार परिणाम झाला. आधीच्या समाजातील आठवणींमुळे गौतम बुध्द समानता व बंधुत्व या संकल्पनांद्वारे प्रेरित झाला. त्याची अहिंसेची संकल्पना, वैदिक धर्माची निर्भत्सना व तत्त्वज्ञानातील मांडणी, उत्पादक शक्तींचा विकास करू पाहणाऱ्या क्षत्रियांना मदतकारक ठरली. परंतू समानता ही संकल्पना बुध्दांच्या संघापुरतीच मर्यादित राहिली.

- बुध्दवादाने बाह्य जगाचे वास्तव मान्य केले. प्रत्येक वस्तू अनेक मुल्यद्रव्ये एकत्र येऊन तयार होते, असे सांगितले.
- बुध्दवादाने बदल प्रक्रिया जाणून घेतली, जगात काहीच कायम राहत नाही, असे सांगितले. सर्वकाही क्षणभंगूर आहे. यालाच अनित्यवाद (क्षणिकवाद) असे म्हणतात.
- जर कोणी शहाणपण वापरले व जड वस्तू अस्तित्वात कशा आहेत हे बघितले, तर आपण 'काहीही अस्तित्वात नाही' असे म्हणू शकत नाही. जेव्हा आपण विनाश बघतो, तेव्हा आपण ते येथे अस्तित्वात आहे असे म्हणू शकत नाही. या तऱ्हेने विरोधातील एकत्व बुध्दवादाने मान्य केले. ही द्वंद्वात्मक पध्दत जरी विज्ञाननिष्ठ नसली, तरी वेदामधील कल्पनावादी पध्दतीपेक्षा भिन्न आहे.
- बुध्दाचे तत्त्वज्ञान आत्म्याचे अस्तित्व मान्य करीत नाही.
- बुध्दाचे तत्त्वज्ञान नास्तिक आहे व त्याने देवाचे अस्तित्व नाकारले आहे.
- परंतू या तत्त्वज्ञानाने कर्म, पूनर्जन्म, निर्वाण या संकल्पना मान्य केल्या आहेत.
- वस्तूमान व गति याबाबत जरी बुध्दाने भौतिकवादी दृष्टीकोन स्विकारला असला, तरी वस्तूमान की जाणिव हा मुलभूत प्रश्न टाळला आहे. म्हणूनच त्यांचे तत्त्वज्ञान लोकायत प्रमाणे सातत्य असलेले भौतिकवादी तत्त्वज्ञान होऊ शकले नाही.

वर्गीय समाजाची मुळे रुजल्यानंतर बुध्दवादाचे रुपांतर कल्पनावादी तत्त्वज्ञानात झाले. महायानाच्या गटाने बुध्दवादाला धर्मामध्ये व बुध्दाला देवामध्ये रुपांतरित केले. पुढील काळात नागार्जूनाने वेदांतामधील मिथ्यवाद म्हणजेच बुध्दवाद आहे असे सांगितले. म्हणूनच आपण असे म्हणू शकतो की, महायानाचा बुध्दवाद म्हणजेच अद्वैत्वाची वा वेदांताची दुसरी पायरी आहे.

## सतराव्या व अठराव्या शतकांमधील तत्त्वज्ञान

सरंजामशाहीच्या पोटात भांडवली वर्ग जेव्हा उदयास आला व वाढू लागला तेव्हा त्यास सरंजामशाहीतील गुढमय व प्रतिगामी संकल्पनांविरूध्द संघर्ष करणे भाग पडले. उगवत्या भांडवलदारांच्या वर्गाचे हितसंबंध नैसर्गिक विज्ञानाच्या प्रगतिपासून अलग काढणे असंभव होते. सरंजामशाहीत धर्म एक महान शक्ती बनून गेली होती व धर्माचा प्रभाव सर्वत्र पसरला होता. बौध्दिक क्षेत्रातील धर्माच्या मक्तेदारीविरूध्द भांडवलदारांना संघर्ष करणे भाग पडले. ज्या देशांत भांडवलशाही उदयास आली, तेथे हा संघर्ष फार मोठा महत्वाचा ठरला. भांडवली लोकशाही क्रांतीच्या आधी धर्म, तत्त्वज्ञान व विज्ञानातील क्रांती होणे आवश्यक होते.

एंगल्सने याबाबत पुढीलप्रमाणे लिहून ठेवले आहे, ''भांडवलदारास औद्योगिक उत्पादनात वाढ करावयाची होती. वस्तूंचे गुणधर्म माहित होण्यासाठी, नैसर्गिक शक्तींवर विजय मिळविण्यासाठी विज्ञानाची आवश्यकता निर्माण झाली होती. देवावरील विश्वासास तडा जाईल इतपत विज्ञानाने प्रगती केली नव्हती, तोपर्यंत विज्ञान धर्माच्या सेवकाचीच भुमिका निभावत होते व तोपर्यंत विज्ञानाने धर्मातील अवैज्ञानिक संकल्पनांना विरोध केला नव्हता. म्हणून त्या अर्थाने त्यास विज्ञान असे म्हणता येत नव्हते. परंतू शेवटी विज्ञानाने धर्माविरुध्द क्रांती केलीच. विज्ञानाशिवाय भांडवलदारांचा वर्ग अस्तित्व टिकवू शकत नव्हता. म्हणून भांडवलदारांनी या क्रांतीला पाठिंबा दिला.''

सोळाव्या शतकाच्या मध्यास प्रोटेस्टंट पंथाने क्रांती व पूनर्रचना करावयास सुरुवात केली. एंगल्सने सांगितले की त्यावेळेच्या परिस्थितीमध्ये भांडवली वर्गाची राजकीय क्रांती धार्मिक क्रांतीच्या स्वरुपात होणे अटळ होते.

एंगल्सने लुडविग फ्युअरबॅक या पूस्तकात लिहीले आहे की, ''मध्ययुगातील काळात राजकारण, कायदे इत्यादी धर्मशास्त्रातून अस्तित्वात होते व त्यांना धर्मशास्त्राच्या शाखा असेच ओळखले जायचे. या प्रकारे प्रत्येक सामाजिक व राजकीय चळवळीस धार्मिक चळवळीचे स्वरूप येणे बंधनकारक होते. जनतेच्या इच्छा, आकांक्षा, विचारपध्दती केवळ धर्माच्या आधारेच आकारास येत होत्या. म्हणूनच भांडवली वर्गाला स्वत:च्या हीतांना

धार्मिक मुलामा देऊनच चळवळ उभारणे आवश्यक होते''

निकोलस कोपरनिकस (१४७३-१५४३), ब्रुनो (१५४८-१६०५), गॅलिलिओ (१५६४-१६४२) व बेकॉन (१५६१-१६२६) इत्यादी वैज्ञानिकांनी धर्म, अंधश्रध्दा यांविरूध्द लढा दिला व सत्य शोधण्याच्या बाजूने उभे राहिले. त्यांनी भांडवली भौतिकवादाचा पाया घातला, विज्ञानाच्या प्रगतिच्या आधारावरच तत्त्वज्ञान विकसित झाले. भांडवली वर्गाच्या उदयामुळे व वाढीमुळे तत्त्वज्ञानाच्या विकासावर प्रचंड मोठा परिणाम झाला आहे.

## इंग्लीश तत्त्वज्ञान

आधूनिक काळातील फ्रांसीस बेकॉन हा पहिला भौतिकवादी तत्त्वज्ञानी होता. मार्क्सने त्यास आधूनिक भौतिकवादाचा संस्थापक असे संबोधले आहे. बेकॉनने संपुर्ण कल्पनावादाला नाकारले. कल्पनावाद धर्माचे तूणतूणे वाजवितो म्हणून त्याचा धिक्कार केला. मुलभूत प्रश्नाबाबत त्याने सातत्याने भौतिकवादी भूमिका स्विकारली. त्याने सांगितले की, खऱ्या ज्ञानाचा आधार आपणास ज्ञानेंद्रियाद्वारे व बुध्दीद्वारे समजणारे ज्ञानच आहे. त्याने सांगितले की, जडवस्तूंची महत्वाची गुणवत्ता त्यांची गती हीच आहे. त्याने सर्व गतींना यांत्रिक गतीमध्ये रुपांतरित केले. जग समजण्याची त्याची पध्दत अधिभौतिकी व यांत्रिक होती.

थॉमस होबजने भौतिकवादी दृष्टीकोन अधिक विकसीत केला. यंत्रशास्त्र व गणितामधील सैध्दांतिक यशाच्या आधारावर त्याने भौतिकवादाची विश्वव्यापी तत्वे तयार केली. त्याने सर्व गतींना यांत्रिक गतीमध्ये आणले. त्यांचा यांत्रीक भौतिकवाद एक प्रगतिशील पाऊल होते. त्याने तत्त्वज्ञानाला विज्ञानाच्या जवळ आणण्याचा प्रयत्न केला.

सतराव्या शतकाच्या पुर्वाधामध्ये भांडवली क्रांतीने इंग्लंडमध्ये विजय प्राप्त केला. परंतू भांडवली वर्गाने आपली लढाई तडजोडी स्विकारून केली. त्याने सरंजामी वर्गाबरोबर तडजोड केली. सत्तेवर आल्यावर व सत्तारूढ झाल्यानंतर त्यांना भौतिकवादी सिध्दांतांची आवश्यकता राहिली नाही. इंग्लीश भौतिकवाद बर्कले व डेव्हीड ह्यूम यांच्या मांडणीद्वारे आत्मगत कल्पनावादाला शरण गेला.

## हेगेलचा द्वंद्वात्मक कल्पनावाद

हेगेलने (१७७० ते १८१४) कांटच्या आत्मगत कल्पनावादाच्या व जग समजणे अशक्य आहे, या मांडणीचा विरोध केला. हेगेलने सांगितले की, वस्तूमय जग या जगाच्या बाहेरील जाणिवेद्वारा निर्माण झाले आहे. त्याची तत्त्वे धर्माला पाठिंबा देणारी व त्याद्वारे प्रतिगामी प्रशीयन राजवटीला मान्यता देणारी होती. परंतू त्याची द्वंद्वात्मक पध्दत मात्र क्रांतीकारी होती. त्याने सांगितले की, जगात कायम असे काहीच नसते. सर्वकाही

बदलत असते. हेगेलच्या तत्त्वज्ञानातील महत्वाचा व क्रांतीकारी भाग हा आहे, की मानवी विचारांच्या व कृतींच्या त्रिकालाबाधीत (कायमच्या) मान्यतेला त्याने मृत्यूशय्येवर नेले. (एंगल्स-लुडबिग फ्युअरबॅक)

परंतू हे कायमपणे होणारे बदल व विकासक्रीया प्रत्यक्षातील वस्तूमय जगामुळे होत नाहीत, तर जाणिवेत होणाऱ्या बदलांमुळे व विकासामुळे घडत असतात, असे हेगेलने सांगितले. हेगेलची तत्त्वे धर्माला पाठिंबा देणारी होती. त्यामुळे प्रतिगामी राजवटींना पाठिंबा मिळाला. मार्क्स, एंगल्स व अन्य पुरोगामींनी त्याच्या क्रांतीकारी द्वंद्वात्मक पध्दतीला महत्त्व दिले.

## फ्युअरबॅकचा भौतिकवाद

मार्क्सच्या आधीचा सर्वोच्च स्वरुपातील भौतिकवाद म्हणून फ्युअरबॅकच्या मांडणीकडे बघितले जाते. मुलभूत प्रश्नाच्या दोन पैलूंच्या आधारावर फ्युअरबॅकने (१८०४-१८७२) हेगेलच्या कल्पनावादाचा विरोध केला. तत्त्वज्ञानात हेगेलची तत्त्वे व कल्पनावाद खोलवर रुजला असतांनाच, फ्युअरबॅकच्या भौतिकवादाने स्फोट घडवून आणला. त्यामुळे हेगेलच्या तत्वज्ञानाच्या पायाला धक्का लागला. मार्क्स, एंगल्स व अन्य डाव्या विचाराचे हेगेलच्या द्वंद्वात्मक पध्दतीकडे ओढले गेले होते, ते सर्व एकदम भौतिकवादी झाले. फ्युअरबॅकच्या धारदार टीकेमुळे तत्त्वज्ञानाचा विकास व द्वंद्वात्मक भौतिकवादाला आकार येणे शक्य झाले. यामुळे हेगेलच्या द्वंद्वात्मक पध्दतीला वैज्ञानिक पाया प्राप्त होण्याची सुरूवात शक्य झाली. हेगेलच्या कल्पनावादाला ठोकरत असतांनाच, फ्युअरबॅकने हेगेलच्या द्वंद्वात्मक पध्दतीलाही ठोकरल्यामुळे फ्युअरबॅक अधिक पुढे जाऊ शकला नाही.

फ्युअरबॅकने धर्म व कल्पनावादातील साटेलाटे स्पष्टपणे उघडे केले. त्याच्या तत्त्वज्ञानाचा मुळ गाभा भौतिकवादाची उभारणी व संरक्षण हा आहे. आपल्या तत्वांत मानव व मानवाचे जगातील अस्तित्व त्याने प्रामुख्याने पुढे आणले. मात्र इतिहासाची मांडणी करीत असतांना, फ्युअरबॅक कल्पनावादीच राहिला. त्याने सांगितले की, मानव त्याचे सत्व देवामध्ये पाहतो. तो धर्म अमान्य करीत नाही, तर धर्मामध्ये सुधारणा झाली पाहिजे असे सांगतो. तरीसुध्दा फ्युअरबॅकच्या भौतिकवादाने हेगेलच्या कल्पनावादाला मोठा धक्का दिला व जगाकडे बघण्याचा वैज्ञानिक दृष्टीकोन प्राप्त करण्यासाठी मदत केली.

## मार्क्सवादी तत्त्वज्ञान

कार्ल मार्क्स (१८१८-१८८३) व फ्रेडरिक एंगल्स (१८२०-१८९५) यांनी द्वंद्वात्मक व ऐतिहासिक भौतिकवादाची मांडणी केली. मानवी समाज, तत्त्वज्ञान, नैसर्गिक विज्ञान, (पदार्थ विज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, जीवशास्त्र इत्यादी) व सामाजिक

विज्ञान (इतिहास, नागरिकशास्त्र इ.) या सर्वांच्या दिर्घ काळातील विकासाच्या परिणामी मार्क्सवादी तत्त्वज्ञानाची मांडणी झाली. मार्क्स व एंगल्सच्या द्वंद्वात्मक व ऐतिहासिक भौतिकवादाच्या मांडणीत पुढील तीन घटकांनी योगदान केले.

१) सामाजिक-आर्थिक परिस्थिती, २) नैसर्गिक विज्ञानातील विकास, ३) तत्त्वज्ञानातील विकासाचे योगदान.

**१) सामाजिक-आर्थिक परिस्थिती :** युरोपामधील अनेक राष्ट्रांमध्ये १९ व्या शतकाच्या मध्यास भांडवलशाहीने सरंजामशाहीवर विजय प्राप्त केला. समाजामध्ये भांडवलदार व सर्वहारा असे दोन मोठे वर्ग तयार झाले होते. त्यामधील वर्गविरोध तीव्र होत चालला होता. सुरुवातीस वर्ग झगडे उत्स्फुर्तपणे होत होते. हळूहळू ते संघटितपणे होऊ लागले. सुरुवातीच्या संघर्षानी १८४० च्या सुमारास फ्रांस, जर्मनी व ब्रिटन या देशांना हादरविले.

समाजात क्रांतीकारी पध्दतीने बदल घडवून आणण्यासाठी समाजाच्या विकासाचे नियम शास्त्रीय पध्दतीने समजून घेण्याची व जगाकडे बघण्याचा वैज्ञानिक दृष्टीकोन प्राप्त करण्याची गरज सर्वहारा वर्गाला भासू लागली. ती एक ऐतिहासिक आवश्यकता होती. मार्क्स व एंगलसने हे ऐतिहासिक कार्य फार मोठ्या समर्थपणे पार पाडले. या तऱ्हेने ऐतिहासिक गरजेपोटी मार्क्सवाद व भौतिकवादी तत्त्वज्ञान अस्तित्वात आले.

**२) नैसर्गिक विज्ञानातील विकास :** जगाकडे बघण्याच्या वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या गरजेपोटी द्वंद्वात्मक भौतिकवादाचा विकास झाला, यांत काहीच संशय नाही. परंतू विज्ञानाच्या काही टप्प्यापर्यंतच्या विकासाचीही गरज वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी आवश्यक होती. १९ व्या शतकात विज्ञान खूप वेगाने विकसीत झाले. त्यामुळे द्वंद्वात्मक भौतिकवादाची सत्यता पडताळून पाहणे शक्य झाले.

नैसर्गिक प्रक्रियांमधील एकमेकांच्या संबंधाविषयी खोलवर ज्ञान मिळविण्यासाठी ज्या तीन शोधांची मदत झाली, ते पुढीलप्रमाणे आहेत.

अ) उर्जेचे रुपांतर व संवर्धनाचा नियम, ब) जीवंत जिवाणूंच्या पेशीचा सिध्दांत,

**क) डार्वीनचा उत्क्रांतीवाद**

## अ) उर्जेचे रुपांतर व संवर्धनाचा नियम

पदार्थविज्ञान शास्त्राच्या या नियमाप्रमाणे उर्जा एका स्वरुपातून दुसऱ्या स्वरुपात रुपांतरीत करता येते. उर्जा निर्माण करता येत नाही वा नष्ट होत नाही. एंगल्सने असे मत व्यक्त केले की, १९ व्या शतकातील हा नियम विज्ञानाच्या अनेक शोधांमधील सर्वात महत्वाचा

शोध आहे. एंगल्सने या नियमाचे वर्णन जगातील सर्व वस्तूमानांचे एकत्व पदार्थविज्ञान शास्त्राच्या शब्दांतून या नियमाद्वारे व्यक्त होते असे केले. निसर्गातील सर्व गतींचे एकत्व आता यापुढे केवळ तत्त्वज्ञानातील विचार न राहता, ते एक वैज्ञानिक वास्तव झाले आहे.

### ब) पेशींचा सिध्दांत

जीवंत जीवाणूंच्या शरिराबाबतचा पेशीचा सिध्दांत सांगतो की, वस्तूमय पेशी जीवाणूंच्या शरीराचा मुलभूत घटक आहे. या जैविक पेशींमध्ये बदल होऊ शकतो. या सिध्दांतामुळे जीवाणूंचा अभ्यास योग्य प्रकारे होऊ शकला.

### क) डार्वीनचा उत्क्रांतीवाद

चार्ल्स डार्वीन (१८०९-८२) या इंग्लीश निसर्ग वैज्ञानिकाच्या जीवाणूंच्या उत्क्रांतीच्या सिध्दांताद्वारे उत्पत्तीच्या धार्मिक श्रध्दांना व निसर्गाकडे अतिभौतिकी दृष्टीकोनातून बघण्याला धक्का बसला. त्याने हे निर्विवादपण सिध्द केले की, जीवाणूंचे जीवन देवाची निर्मीती नाही व जीवंत पेशींच्या उत्क्रांतीचा तो परिणाम आहे. जैविक जीवाणू अधिकाधिक गुंतागूंती असलेले व उच्च प्रकारचे स्वरुप घेत असल्यामुळे मानव अस्तित्वात येऊ शकला. म्हणून डार्वीनच्या सिध्दांतामुळे द्वंद्वात्मक विकास या संकल्पनेस फार मोठा पाठिंबा मिळाला. १९ व्या शतकाच्या पहिल्या भागातील विज्ञानाच्या प्रगतिमुळे द्वंद्वात्मक भौतिकवादाची मांडणी शक्य झाली व या मांडणीतील नियम सिध्द होण्यास मदत झाली.

### ३) तत्त्वज्ञानाचा विकास

नैसर्गिक विज्ञानातील यशाबरोबरच तत्त्वज्ञानातील विजयामुळे मार्क्सवादी जागतिक दृष्टीकोन विकसीत होण्यास खूप मदत झाली. द्वंद्वात्मक भौतिकवाद विकसीत करण्यासाठी मार्क्स व एंगल्स यांनी तत्त्वज्ञानाच्या इतिहासाचा खोलवर अभ्यास केला व वैज्ञानिक तत्त्वज्ञानाचा दृष्टीकोन समृध्द करण्यासाठी जे जे काही उपयोगी योग्य होते, ते सर्व आत्मसात केले. १९व्या शतकातील जर्मन तत्त्वज्ञान व विशेषत: हेगेल व फ्युअरबॅक यांचे तत्त्वज्ञान मार्क्सवादाचे सैध्दांतिक स्त्रोत ठरले. एंगल्सने सांगितले की जर्मन तत्त्वज्ञानाशिवाय वैज्ञानिक समाजवाद अस्तित्वात येणे अशक्य होते. त्यांनी विज्ञानाचाही खोलवर अभ्यास केला. त्यांनी वर्ग संघर्षात भाग घेतल्यामुळेच तत्त्वज्ञानात नविन मांडणी करण्यास प्रेरणा व शक्ती मिळाली. त्यांनी फ्युअरबॅकच्या भौतिकवादी मांडणीतील कल्पनावादी पैलूंचा त्याग केला. निसर्ग, समाज व मानव यांच्या संबंधी केलेल्या भौतिकवादी विचारांच्या तर्कशुध्द मांडणीला त्यांनी पाठिंबा दिला. त्यांनी हेगेलच्या द्वंद्वात्मक पध्दतीमधील कल्पनावादी विचारांचा त्याग केला व भौतिकवादी द्वंद्वात्मक पध्दत विकसीत केली.

लुडविग फ्युअरबॅकमध्ये एंगल्सने लिहिले की, फ्युअरबॅकला भौतिकवादी पाया होता.

पण त्याच्या कल्पनावादामुळे तो शृंखलेमध्ये अडकला होता. फ्युअरबॅकच्या धर्माबाबतच्या व नैतिकतेबाबतच्या तत्त्वज्ञानाकडे बघितले की, त्याचा खरा कल्पनावाद सिध्द होतो.

ज्याप्रमाणे स्वतंत्रपणे अस्तित्वात असणाऱ्या नैसर्गिक जगाविषयी माहिती मानवाच्या ज्ञानामध्ये प्रतिबिंबित होते, त्याचप्रमाणे समाजाच्या आर्थिक व्यवस्थेचे प्रतिबिंब मानवाच्या ज्ञानामध्ये म्हणजेच तत्त्वज्ञान, धर्म, राजकारण इ. विषयीच्या मानवी दृष्टीकोनामध्ये व विविध विचारसरणीमध्ये पडते. राजकीय गट, पक्ष, संस्था, विचार इ. अधिररचनेचे भाग असून ते आर्थिक ढाच्यावर आधारित आहेत. उदा. आपणास असे दिसते की, युरोपमधील सरकारे भांडवलदारांचे कामगार वर्गावरील आपले राज्य विविध राजकीय स्वरुपाद्वारे बळकट करीत आहेत, हे दिसते. मार्क्सचे तत्वज्ञान एक सर्वसमावेशक तत्वज्ञानात्मक भौतिकवाद आहे व त्याद्वारे मानवजातीस व विशेषत: हा कष्टकरी वर्गाला ज्ञान प्राप्त करण्याचे अतिशय शक्तीशाली साधन प्राप्त झाले आहे. (लेनिन- मार्क्सवादाचे तीन स्त्रोत व तीन घटक)

## लेनिन व माओ यांनी मार्क्सवादी तत्त्वज्ञानाच्या विकासात केलेले योगदान

मार्क्सवादी तत्त्वज्ञान असे समजते की, जग हे सतत बदलत असते. हे तत्त्वज्ञान विज्ञानाच्या आधारावर उदयास आले आहे. म्हणून समाज व विज्ञानाच्या प्रगतीबरोबर मार्क्सवादी तत्त्वज्ञानही विकसीत होते. विज्ञानाच्या शाखांना वैज्ञानिक दृष्टीकोन प्रदान केल्यामुळे मार्क्सवादी तत्त्वज्ञानाने या सामाजिक व नैसर्गिक विज्ञानांमध्ये मोठे योगदान केले आहे.



याचाच अर्थ असा होतो की, सामाजिक व वैज्ञानिक विकासामुळे मार्क्सवादी तत्त्वज्ञान कालबाह्य होऊ शकत नाही. मार्क्सवादी तत्त्वज्ञान एक सृजनशील विज्ञान आहे. जर ते सृजनतापूर्वक विकसीत केले गेले, तर ते अतिशय धारदार शस्त्र बनू शकते. सत्य काय आहे, हे समजून घेण्यासाठी मार्क्सवाद वस्तूगत परिस्थिती व सामाजिक व्यवहार यांचा उपयोग करतो. मार्क्सवाद सर्व प्रकारच्या कर्मठपणाला (डॉग्मा) विरोध करतो. म्हणूनच सामाजिक व वैज्ञानिक विकासाबरोबर

मार्क्सवादालाही संपन्न व्हावे लागते. एवढेच नव्हे तर भांडवली तत्त्वज्ञानाविरुध्द व तत्त्वज्ञानातील विकृतीकरणाविरुध्द मार्क्सवादाला कामगार वर्गीय तत्त्वज्ञान सुरक्षित ठेवण्यासाठी सतत संघर्ष करावा लागतो. आंतरराष्ट्रीय साम्यवादी चळवळीने ही दोन्ही कार्ये पार पाडली आहेत. लेनिन व माओ यांचे तत्त्वज्ञानाच्या विकासातील योगदान फार महत्वाचे व मुलभूत आहे.

## मार्क्सवादी तत्त्वज्ञान व लेनिन

आपणास माहित आहे की, लेनिनवाद म्हणजे साम्राज्यवादाच्या काळातील मार्क्सवाद आहे. हा असा काळ आहे की, जेव्हा रशियातील समाजामध्ये मुलभूत अंतर्विरोध परिपक्व झाले होते व समाजवादी क्रांती करणे आवश्यक होते. लेनिनने जागतिक समाजवादी क्रांतीचे नेतृत्व केले, प्रतिगामी भांडवलदारांच्या तत्त्वज्ञानातील अपप्रवृत्ती व विकृतीकरणाविरुध्द त्याने लढा दिला. हे करीत असताना त्याने मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचे संरक्षण केले व त्यास अधिक वरच्या पातळीवर बसविले. लेनिनच्या लिखाणामध्ये आपणास द्वंद्वात्मक भौतिकवादाचे जीवंत व व्यावहारिक उदाहरणे मिळतात. १९०८ साली त्याने लिहिलेले मटेरिअलीझम अँड एम्पिरीओ क्रिटीसीझम हे पुस्तक मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचे साम्राज्यवादी काळातील विकासाचे उत्तम उदाहरण आहे. लेनिनने मान्य केले होते की, तत्त्वज्ञानातील हा संघर्ष एक तातडीचे कार्य आहे. या पुस्तकात त्याने भांडवली तत्त्वज्ञानावर केलेली टीका मुलभूत टीका समजली जाते. ज्ञान केवळ अनुभवाद्वारेच मिळते, आत्मगत घटकांनाच महत्व आहे व जग समजणे शक्य नाही, या सर्व गैर सिध्दांत मांडणाऱ्या विचारसरणीचा पाडाव केल्यामुळेच मार्क्सवादी तत्त्वज्ञान सुरक्षित राहू शकले.



लेनिननंतर आलेल्या स्टॅलीन यांनीही मार्क्सवादी तत्त्वज्ञान क्रांतीकारी व्यवहारांचे विज्ञान म्हणून विकसीत केले व ते समाजवादी समाजाच्या उभारणीसाठीही वापरले. तसेच आंतरराष्ट्रीय साम्यवादी चळवळ उभारण्यासाठी ते उपयोगात आणले.

## मार्क्सवादी तत्त्वज्ञान व माओ

माओनेही लेनिनप्रमाणेच मार्क्सवादी तत्त्वज्ञान अपवादात्मक गुणवत्तेद्वारे विकसीत केले. जगातील शोषीत जनतेसाठी मार्क्सवादी तत्त्वज्ञान मार्गदर्शक

करण्याकरिता त्याने घेतलेले श्रम फार महान आहेत. माओच्या अंतर्विरोधी-संबंधीचा अभ्यास व ज्ञान प्राप्त करण्याच्या पध्दतीविषयी त्याने केलेले खोल विश्लेषण खूप मुलभूत आहे. अंतर्विरोधाच्या नियमांच्या सर्व पैलूंबाबत त्याने मांडणी केली व ती द्वंद्वात्मक पध्दतीची प्रमुख बाब आहे. विकासाच्या द्वंद्वात्मक पध्दतीचे व विरोधी घटकांतील एकत्व व संघर्षाने होणाऱ्या बदलाचे विश्लेषण खूप चांगल्या तऱ्हेने माओने केले आहे. माओचा 'अंतर्विरोधाबाबत' हा निबंध ज्यांना वास्तव जगामधील अंतर्विरोध समजून घ्यायचे असतील, त्यासाठी खूप मार्गदर्शक आहे. माओचा 'लोकांमधील अंतर्विरोध कसे सोडवावेत' हा निबंध क्रांतीपूर्वीचे व क्रांतीनंतरचे लोकांमधील अंतर्विरोध कसे समजून घ्यावेत व ते कसे सोडवावेत, याबाबत आवश्यक असणारा दृष्टीकोन निर्माण करून देतो.

ज्ञानासंबंधीच्या सिध्दांतामध्ये माओचा 'व्यवहाराबाबत' हा निबंध खूप मुलभूत आहे. या निबंधामध्ये त्याने ज्ञान व सामाजिक व्यवहार यांच्यामधील संबंधाचे स्पष्टीकरण देऊन ज्ञानाबाबत सैध्दांतिक मांडणी केली. समजून घेण्याच्या दोन टप्प्यांबाबत व त्यांच्यातील द्वंद्वात्मक संबंधाबाबत त्याने उत्कृष्ट मांडणी केली आहे.

# प्रकरण तीन

## द्वंद्वात्मक भौतिकवाद

द्वंद्वात्मक भौतिकवाद हा मार्क्सवादी-लेनिनवादी पक्षाचा जगाकडे बघण्याचा दृष्टीकोन आहे. आपल्या तत्त्वज्ञानाला द्वंद्वात्मक भौतिकवाद असे म्हटले जाते कारण त्याचा निसर्गातील घटनांकडे बघण्याचा दृष्टीकोन, त्याची अभ्यास करण्याची व समजून घेण्याची पध्दत द्वंद्वात्मक आहे व निसर्गातील घटनांचे विश्लेषण करण्याची क्रिया, या घटनांबाबत संकल्पना तयार करणे, त्यांची सैध्दांतिक मांडणी हे सर्व भौतिकवादी आहे. (स्टॅलीन)

द्वंद्वात्मक भौतिकवाद व ऐतिहासिक भौतिकवाद मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचे अतूट व जीवंत पैलू आहेत. आपण प्रथम द्वंद्वात्मक भौतिकवादाच्या तत्त्वांचा अभ्यास करु.

### मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा भौतिकवाद

कल्पनावाद व धर्माने वास्तवातील जगाचे सत्य नेहमीच नाकारले आहे. कल्पनावादी असे मांडतात की, देव किंवा परमात्मा किंवा चैतन्य हा या जगाच्या निर्माता आहे. ते पुढे असे सांगतात की, या जगाचा जन्म, वाढ व मृत्यु सर्व काही देवाच्या इच्छेप्रमाणे होते. परंतू मार्क्सवादी तत्त्वज्ञान सांगते की, जग माणसांवर वा अन्य कुठल्याही महान शक्तींवर अवलंबून नाही. निसर्ग स्वत:च अस्तित्वात आहे. त्यास निर्मात्याची गरज नाही. या वस्तूमय जगाची सुरुवात नाही किंवा अंतही नाही. अणूपासून ते प्रचंड आकाराचा गोळा, एक पेशीच्या अमीबापासून ते मानव, झाडे, प्राणी असे सर्वजण व जीवंत जीवाणू जडवस्तूंची विविध प्रकारची स्वरुपे आहेत. निसर्गात अगणित विविधता असली, तरी वस्तूमानामध्ये एकत्व आहे.

विचार करणाऱ्या वस्तूमानाची म्हणजेच मेंदूची जाणिव ही एक गुणवत्ता आहे. मेंदू म्हणजे वस्तूमानाचे सर्वात जास्त विकसीत स्वरुप आहे. वस्तूमान जाणिवेतून निर्माण झाले आहे, ही कल्पनावादाची मांडणी भौतिकवाद नाकारतो. मानवाच्या जाणिवेत वस्तूमय जगाचे अचूक प्रतिबिंब येऊ शकते. म्हणजेच जग समजून घेणे शक्य आहे, या आधारावरच मानवी विचार प्रक्रियेची तपासणी भौतिकवाद करु शकतो.

तत्त्वज्ञानाची तत्त्वे विज्ञानाच्या आधारावर सिध्द करणे व समजून घेणे, हे मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचे खास वैशिष्टय आहे. विज्ञानाच्या आधारावर मार्क्स व एंगल्स यांनी जडवस्तू व त्यांची निरनिराळ्या प्रकारची स्वरुपे, गति, पोकळी व कालमान यांची मांडणी तत्त्वज्ञानाच्या दृष्टीकोनातून केली. आता आपण वस्तूमान व जाणीव यांचा संबंध समजून घेऊ या.

आपणास तत्त्वज्ञानातील वस्तूमान व जाणीव यामधील मुलभूत प्रश्नाविषयी माहिती

आहे व या प्रश्नातून निर्माण होणारे तत्त्वज्ञानाचे एकमेकांविरुध्द असलेले दोन दृष्टीकोनही माहित आहेत.

''सुरुवातीच्या काळातील कल्पनावाद आदिम काळातील माणसांचे अज्ञान व त्यांच्या अंधश्रध्दा याद्वारे उदयास आला. नंतर उत्पादन शक्तींच्या वाढीबरोबर व विज्ञानातील प्रगतीबरोबर कल्पनावाद नगण्य होऊन, त्या जागी भौतिकवाद यायला हवा होता. पण प्राचीन काळापासून ते आत्तापर्यंत कल्पनावाद नगण्य होण्याऐवजी वाढला आहे व भौतिकवादावर प्रभूत्व मिळविण्यासाठी संघर्ष करीत आहे. त्याचे कारण समाज वर्गव्यवस्थेमुळे दूभंगला आहे हे आहे. ज्याप्रमाणे समाजातील शोषण करणारा वर्ग आपल्या हितासाठी कल्पनावादी विचारसरणी निरनिराळ्या स्वरुपांत समाजात पसरवित असतो, त्याचप्रमाणे शोषित वर्गातील कामगारांनी, शेतकऱ्यांनी, आदिवासींनी, बुध्दीवंतांनी व अन्य कष्टकऱ्यांनी भौतिकवादी विचारसरणीला पाठिंबा देऊन पसरविले पाहिजे. म्हणूनच कल्पनावाद व भौतिकवाद वर्गसंघर्षाची शस्त्रे आहेत व जोपर्यंत वर्ग अस्तित्वात आहेत, तोपर्यंत या दोघांमधील संघर्ष संपुष्टात येणार नाही''.(माओ-सिलेक्टेड वर्कस् ६ वा खंड)

हा संघर्ष दोन आघाड्यांवर चालू असतो. शोषण करणाऱ्या वर्गाच्या दृष्टीकोनाविरुध्द बाह्य संघर्ष हा पहिला संघर्ष. साम्यवादी पक्षातील गैर-सर्वहारा प्रवृत्तींविरुध्द जो संघर्ष करावा लागतो तो दुसऱ्या आघाडीवरचा संघर्ष आहे. कल्पनावादी विचारसरणीसाठी खूप सामाजिक आधार उपलब्ध आहे व ती मोठ्या प्रमाणावर पसरली आहे व म्हणूनच ही विचारसरणी सर्वहारांच्या साम्यवादी पक्षातील कार्यकर्त्यांनाही बाधीत करु शकते.

## जडवस्तू म्हणजे काय?

कल्पनावादी तत्त्ववेत्त्यांनी जडवस्तूंच्या व्याख्येबाबत आक्षेप घेतला की, जडवस्तू ही संकल्पनाच अर्थहीन आहे. कारण विज्ञानामध्ये जसजसे नविन शोध लागत गेले, त्याप्रमाणे आपणास जडवस्तूंविषयी नविन नविन माहिती मिळत गेली. म्हणून जडवस्तू म्हणजे नक्की काय असा प्रश्न निर्माण झाला. परंतू मार्क्स, एंगल्स व त्यानंतर लेनिन यांनी जडवस्तू ही संकल्पना तत्त्वज्ञानामध्ये अशा तऱ्हेने विकसीत केली की कल्पनावादी कुठलाही आक्षेप घेऊ शकणार नाही व कुठल्याही नविन वैज्ञानिक शोधामुळे संकल्पना कालबाह्य ठरणार नाही.

## जडवस्तू या संकल्पनेबाबत

जडवस्तू म्हणजे कुठलीही एक विशिष्ट वस्तू वा गुणवत्ता नव्हे, तर सर्व वस्तूंचे (अणूपासून ते आकाशातील ग्रहसमुह, अमीबा ते मानव) सर्वसाधारण व वैश्विक सार आहे.

## सर्व वस्तूंचे सर्वसाधारण व वैश्विक सार काय आहे ?

१) अनंत वस्तू व प्रक्रिया कुठल्याही चैतन्याच्या आधाराशिवाय अस्तित्वात आहेत.

२) वास्तवातील जगाचा आपल्या पाच ज्ञानेंद्रियांवर प्रभाव पडल्यामुळे वास्तव आपल्या जाणिवेत प्रतिबिंबित होते.

जडवस्तू या संकल्पनेद्वारे आपण या दोन पैलूंचाच विचार करतो. म्हणून जडवस्तूचे कुठलेही विशेष स्वरुप वा गुणवत्ता या अर्थाने आपण जडवस्तूकडे बघत नाही. संपूर्ण निसर्गाचे सार या अर्थानेच जडवस्तू या संकल्पनेचा वापर केला पाहिजे.

लेनिनने जडवस्तू या संकल्पनेमध्ये जी भर घातली, त्यामुळे केवळ तत्त्वज्ञानाचा विकास झाला नाही, तर विज्ञानामध्येही विकास झाला.

१) जडवस्तूंच्या जडणघडणीबाबत विज्ञानाद्वारे अधिक नविन माहिती मिळाली, तर त्यामुळे जडवस्तूच्या संकल्पनेला काही धक्का लागत नाही, उलट जडवस्तूंबाबत आपली माहिती वाढतच जाते.

२) जडवस्तू प्राथमिक आहेत व त्यांचे अस्तित्व जाणिवेवर अवलंबून नाही, हे स्पष्ट झाल्यामुळे सर्व कल्पनावादी व धार्मिक विचारसरण्या टाकावू होतात.

३) वस्तूमय जगाचे प्रतिबिंब मानवी मनांत पडते असे सांगितल्यामुळे क्रांतीकारक बदल घडवून आणण्यासाठी जगाचे आकलन अधिक खोलवर करण्यासाठी प्रेरणा मिळते.

## जडवस्तूंचे अस्तित्व गतिमध्ये आहे

हे जग वस्तूमय आहे व जे काही अस्तित्वात आहे, ते वस्तूमान म्हणूनच आहे. वस्तूमान केवळ गतिमध्येच अस्तित्वात असते. लेनिनने त्याबाबत लिहिले आहे की, जगात गति असलेल्या वस्तूमानाशिवाय काहीच अस्तित्वात नाही. वस्तूमान व गति यांना वेगळे करणे अशक्य आहे. ज्याप्रमाणे गतिशिवाय वस्तूमानाची कल्पना करणे अशक्य आहे, त्याचप्रमाणे वस्तूमानाशिवाय गतिची कल्पना करणे अशक्य आहे. ज्याप्रमाणे वस्तूमान निर्माण करणे वा नष्ट करणे अशक्य आहे, त्याचप्रमाणे गतिही निर्माण वा नष्ट करणे अशक्य आहे.

गति म्हणजे केवळ जागेतील बदल नव्हे, गति म्हणजे विश्वातील सर्व बदल, उत्क्रांती व विकास होय.

जागा व वेळ याशिवाय जडवस्तू गति प्राप्त करु शकत नाही व गति असलेल्या जडवस्तूंशिवाय जगात दुसरे काहीही अस्तित्वात नाही. जागा व वेळ जडवस्तूंप्रमाणे कायम व अमर्यादित आहे. त्यांना सुरुवात व अंत नाही. जागा या संकल्पनेसाठी लांबी, रुंदी व उंची हे तीन मोजमाप करणारे घटक आहेत. म्हणून वस्तूमान या तीन दिशांनी गतिमान होऊ शकते. परंतू वेळ या संकल्पनेसाठी एकच मापक आहे व वेळ गतकाळापासून भविष्यकाळाकडेच गतिमान होऊ शकते व ही दिशा उलटी करणे अशक्य आहे. म्हणूनच

समाजाच्या व वस्तूमानाच्या गतकाळातील स्थितीकडे जाणे अशक्य आहे. म्हणूनच क्रांतीकारी कार्य जागा व वेळ यांना लक्षात घेऊनच करावे लागते. जे काही कालबाह्य आहे ते टाकून द्यावे लागते. नाहीतर सिध्दांतामध्ये कर्मठपणा येऊ शकतो.

## जाणीव म्हणजे वस्तूनिष्ठ वास्तवाचे मानवी विचारांतील प्रतिबिंब आहे.

मानव हा विचार करणारा आहे. मानवी मेंदूद्वारे विचार केले जातात. म्हणूनच मानवी जाणिव ही मेंदूची गुणवत्ता आहे. वस्तुमय जगाचे प्रतिबिंब आपल्या जाणिवेत, आपल्या ज्ञानेंद्रियामुळे येते. सर्व विचारांचा स्त्रोत बाह्य जग हाच आहे. म्हणून सर्व विचार व जाणिवा यांचा स्त्रोत जडवस्तूच आहे. ''जडवस्तूंशिवाय जाणिवेची कल्पना करणे अशक्य आहे. जर ज्ञान किंवा जाणिव जडवस्तूंशिवाय अस्तित्वात असेल, तर मग मेंदूशिवाय विचार अस्तित्वात असतील''. (मेंदू नसलेले तत्त्वज्ञान -लेनिन)

जाणिवा व विचार जडवस्तूंची उत्पत्ती आहे. जडवस्तू जाणिवेतून वा विचारातून निर्माण होऊ शकत नाही. जाणिवा जडवस्तूंचे कुठलेही स्वरुप होऊ शकत नाही. जाणिवा व जडवस्तूंमध्ये फरक आहे.

## श्रमप्रक्रिया : जाणिव आणि भाषा

मानव प्राणी अवस्थेतून सामाजिक अवस्थेत जात असतांनाच्या टप्प्यांवर मानवी श्रमांनी महत्त्वाची भूमिका निभावली आहे. मानवी जाणिव नेहमीच सामाजिक राहिली आहे. मानवास नैसर्गिकपणे प्राण्यांच्या प्रवृत्ती लाभल्या होत्या. पण सामाजिक जीवनाच्या आवश्यकतेमुळे मानवी जाणिवा विकसीत झाल्या. श्रमप्रक्रियेमुळे मानवास वस्तू व प्रक्रियेबाबत संवाद साधण्याच्या गरजेमुळे, त्यांना त्यांनी शब्दात व्यक्त करण्यास सुरुवात केली व त्यातून भाषा विकसीत झाल्या व संभाषण शक्य झाले.

आपण बघितले की, जड वस्तूंच्या पायावर जाणिवा विकसीत झाल्या, पण जाणिवा जडवस्तूंवर परिणाम करु शकतात का ? होय, जर जाणिवांनी जडवस्तूंचे योग्य आकलन केले तरच. उदाहरणार्थ : पावसाळ्यात वीज पडण्याचे कारण समजून घेतल्यामुळे मानव त्यावर उपाय शोधू शकला. ज्यावेळेला आपण म्हणतो की, क्रांतीकारी सिध्दांत जेव्हा जनतेच्या मनाची पकड घेतात, तेव्हा ते मोठी शक्ती बनतात. त्यावेळेला आपण जाणीवांच्या कृतीशील कार्याला विचारात घेत असतो.

## मार्क्सवादी द्वंद्वात्मकता

भौतिकवादी द्वंद्वात्मकता म्हणजे समाज व निसर्ग यांचे निरिक्षण व आकलन करण्याची पध्दत होय.

## परंतू मार्क्सवादी द्वंद्वात्मकता म्हणजे काय?

एंगल्सने एके ठिकाणी अशी व्याख्या केली आहे की, जगातील वस्तूमानांचे आपआपसातील संबंधाविषयीचे विज्ञान म्हणजे मार्क्सवादी द्वंद्वात्मकता होय. म्हणजे मार्क्सवादी द्वंद्वात्मकता अधिभौतिक या संकल्पनेच्या एकदम विरोधी आहे. दुसऱ्या एका ठिकाणी एंगल्सने लिहिले आहे की, निसर्ग, मानवी समाज व विचार प्रक्रियांच्या गतिचे व विकासाच्या सर्वसाधारण नियमांचे विज्ञान म्हणजे द्वंद्वात्मकता होय. या दोन्ही व्याख्या एकमेकांस पुरक आहेत. आपआपसातील संबंधाचे विज्ञान म्हणजे द्वंद्वात्मकता होय. आपआपसातील संबंधामध्ये एकत्व असणाऱ्या जगाच्या गतिच्या व विकासाच्या सर्वसाधारण नियमांचे विज्ञान म्हणजे मार्क्सवादी द्वंद्वात्मकता होय.

## वस्तूमय जगाच्या विकासाच्या नियमांचे विज्ञान या अर्थाने द्वंद्वात्मकता

द्वंद्वात्मकता असे मांडते की, निसर्ग कधीही स्थिर व गतिहीन स्थितीत नसतो. त्याचप्रमाणे तो कधीही कुंठीत (स्थगित) वा अपरिवर्तनीय अवस्थेत नसतो. उलट निसर्ग सतत गतिशील व परिवर्तनीय असतो व नेहमीच काहीतरी उदयास येत असते व विकसीत होत असते. नेहमीच काहीतरी नष्ट होत असते व मृत्यु पावत असते. म्हणून कुठल्याही घटनेचा द्वंद्वात्मकदृष्ट्या विचार करीत असतांना आपण केवळ आपाआपसातील संबंधाबाबत विचार न करता, त्यांची गतिमानता, त्यामधील बदल, विकास व त्यांचा उदय व अस्त या सर्वांचाही विचार करतो.

## विकासाच्या दोन संकल्पना आहेत.

१) संख्यात्मक बदल होऊन विकास होणे. संख्या कमी वा जास्त होणे किंवा पुनरावृत्ती होणे.

२) दोन विरोधी घटकांमधील संघर्षामुळे विकास होणे.

पहिल्या संकल्पनेमध्ये गतिची प्रेरणा त्यांचा स्त्रोत, त्यांचा उद्देश याबाबत स्पष्टता नाही. म्हणून ही संकल्पना मृत, अपूरी व निरस आहे.

दुसरी संकल्पना खूप महत्वाची आहे. भौतिकवादी द्वंद्वात्मकतेप्रमाणे विकास म्हणजे बदल किंवा गति की, ज्यामुळे वस्तू किंवा प्रक्रिया खालच्या पातळीवरून वरच्या पातळीकडे जाते किंवा सामान्य घडणी ऐवजी क्लिष्ट घडणी निर्माण होणे. या विकासामुळे अंतर्गत घडणीमध्ये अपरिवर्तनीय बदल घडतात व वस्तूला वा प्रक्रियेला नविन गुणधर्म व स्वरुप प्राप्त होते.

विकास कधीच सरळ रेषेत व अडथळ्याविना होत नाही. विकास म्हणजे पुढील टप्पा

गाठणे, तर कधी माघार घेणे, सामाजिक विकासही सरळ रेषेत होत नाहीत. एका बाजूला पुरोगामी व क्रांतीकारक शक्ती असतात तर दुसऱ्या बाजुला प्रतिगामी, प्रतिक्रांतीकारी शक्ती असतात व या दोघांमधील संघर्ष विजय-पराभव-विजय या वाकड्या मार्गाने होत असतो. जमीनदार व भांडवलदार यामधील शेकडो वर्षांच्या संघर्षाच्या इतिहासात अंतिम विजय मिळविण्यापूर्वी अनेक चढ उतार झाले होते. अर्थात हे लक्षात घेतले पाहिजे की कुठल्याही सामाजिक क्रांतीकारक विकास प्रक्रियेत फक्त पूरोगामी शक्तीच अंतीमत: विजयी होतात. भांडवलशाहीकडून साम्यवादाकडील बदलही बरेच प्रदिर्घ असेल व त्यामध्ये सुध्दा विजय-पराभव-विजय हाच मार्ग असेल.

द्वंद्वात्मकता विकासावर भर देते, जुन्या गोष्टी पुन्हा अस्तित्वांत येत नाही. मग रशिया व चीनमध्ये भांडवलशाहीची पुर्नस्थापना का होऊ शकली. कारण समाजवाद हा टप्पा भांडवलशाहीकडून साम्यवादाकडे जाण्याचा एक तात्पुरता व बदलत जाणारा टप्पा आहे. समाजवादामध्ये भांडवली संबंध पूर्णपणे नाहीसे झालेले नसतात व म्हणून या काळात क्रांतीकारी व प्रतिक्रांतीकारी यामधील संघर्ष चालू असतो. तसेच समाजवादाचा टप्पा हा सामाजिक विकासामधील पूर्णपणे नविन टप्पा नाही. म्हणूनच या टप्प्यात भांडवलशाहीची पुर्नस्थापना होऊ शकते. पण चीन व रशिया मध्ये सरंजामशाही मात्र पुन्हा प्रस्थापित होऊ शकत नाही. भांडवलशाहीची पुर्नस्थापना एक तात्पुरता पराभव आहे.

हे खरे आहे की, सध्या प्रतिगामी शक्ती क्रांतीकारी शक्तींपेक्षा जास्त ताकदवान आहेत. परंतू प्रतिगामी शक्ती विकासाच्या आड येत असतात व म्हणून त्या क्षीण होण्याची प्रक्रियाही चालू असते. या प्रतिगामी शक्ती आता कालबाह्य झाल्या आहेत. कामगार वर्गाच्या नेतृत्त्वाखाली क्रांतीकारी शक्ती व दडपलेल्या अन्य लोकांच्या शक्ती जरी सध्या अशक्त असल्या तरी त्या पुरोगामी शक्ती आहेत व दिवसेंदिवस त्या वाढत जातील. आज जे अशक्त आहेत ते उद्या सशक्त होतील व सत्ताधारी वर्गाला खाली खेचून क्रांती करतील. सामाजिक विकासाचे तंत्र हेच आहे.

## द्वंद्वात्मक पध्दतीचे नियम

आपण बघितले आहे की, द्वंद्वात्मकता म्हणजे आपाआपसातील संबंध व विकास याविषयाची सैध्दांतिक मांडणी आहे. जगातील हे संबंध व विकासप्रक्रिया, द्वंद्वात्मक पध्दतीच्या नियमांद्वारे मांडल्या जातात. हे नियम अगदी सर्वसाधारण आहेत व ते सर्व वस्तूंना, घटनांना लागू होतात. द्वंद्वात्मक पध्दतीचे मुलभूत तीन नियम आहेत.

१) विरोधी घटकांतील एकत्व आणि संघर्ष किंवा अंतर्विरोधाचा नियम.

२) संख्यात्मक स्वरुपाचा गुणात्मक स्वरुपामध्ये बदल व या उलटच्या प्रक्रिया

३) नष्ट करण्याचे नष्ट होणे.

या तीन नियमांपैकी पहिला नियम मुलभूत आहे व दुसरे दोन त्याच्याशी संबंधीत आहेत. माओने अंतर्विरोधाबाबत या लेखात या संबंधी बरीच खुलासेवार चर्चा केली आहे.

## अंतर्विरोधाचा नियम

सर्व वस्तू व क्रियांमध्ये अंतर्गत अंतर्विरोध असतो व म्हणूनच जगातील सर्व वस्तू व क्रिया गतिशील असतात व त्यांचा विकास होत असतो. लेनिनने लिहिले आहे की, अंतर्विरोधाचा नियम द्वंद्वात्मक पध्दतीचे सत्व आहे. ''द्वंद्वात्मक पध्दत असे मानते की, निसर्गातील सर्व वस्तू व घटनांमध्ये अंतर्गत विरोध असतो. कारण त्यामध्ये सकारात्मक व नकारात्मक घटक असतात, त्यांना भुतकाळ व भविष्यकाळ असतो. त्यामधील काही घटक मृत पावत असतात, तर काही विकसीत होत असतात. तसेच या विरोधी घटकांध्ये संघर्ष होत असतो. जूने व नविन यामधेही संघर्ष होत असतो. जे नाहीसे होत असते व नविन उदयास येत असते यामधेही संघर्ष होत असतो व हे सर्व विकासाच्या प्रक्रियेतील अंतर्गत घटक आहेत व त्यामधील बदल संख्यात्मक बदलांकडून गुणात्मक बदलांकडे जात असतात''. (स्टॅलीन - द्वंद्वात्मक व ऐतिहासिक भौतिकवाद)

प्रत्येक वस्तूमध्ये प्रोटॉनस् व इलेक्ट्रॉनस् असतात. श्वसन प्रक्रियेमध्ये हवा आत घेतली जाते व बाहेर फेकली जाते. हृदयामध्ये आकूंचन व प्रसरण सतत घडत असते. शरीरातील पेशी सतत मरत असतात व जन्मासही येत असतात. ग्रहांमधील प्रक्रियेत एकमेकांकडे खेचणे व दूर करणे, व्यक्तींमधील चांगलेपणा व वाईटपणा, समाजातील वर्ग, जमीनदार-शेतकरी, भांडवलदार-कामगार, युध्द-शांतता, पक्षांमधील दोन वेगळी धोरणे, टीका व आत्मटीका ही सर्व एकाच प्रक्रियेमधील वा वस्तूमानांमधील दोन विरोधी घटक आहेत. एक घटक दुसऱ्या घटकाला विरोध करीत असतो. पण ते एकाच प्रक्रियेमध्ये वा वस्तूमानामध्ये अस्तित्वात असतात. एकाचे अस्तित्व दुसऱ्यावर अवलंबून आहे व ते स्वतंत्रपणे अस्तित्वात राहू शकत नाही. या विरोधी घटकांतील एकत्वास व विरोधास अंतर्विरोध असे म्हणतात.

अंतर्विरोधाचा नियम असे सांगतो की, सर्व वस्तू व क्रियांच्या गतिस व विकासास अंतर्गत अंतर्विरोध कारणीभूत आहेत.

जगामध्ये असंख्य अंतर्विरोध आहेत. या असंख्य विविध प्रकारच्या अंतर्विरोधांचा अभ्यास कसा करायचा ? माओने यासाठी वैज्ञानिक पध्दत शोधून काढली. या पध्दतीनुसार आपणास पुढे दिलेल्या घटकांचा अभ्यास करावा लागतो.

१) दोन विरोधांमधील एकत्व व संघर्ष, २) अंतर्गत व बाह्य अंतर्विरोध, ३) वैश्विकता व विशेषता, ४) मुख्य अंतर्विरोध, ५) अंतर्विरोधाचा मुख्य पैलू, ६) अंतर्विरोधातील शत्रूत्वाचे ठिकाण.

## १) दोन विरोधांमधील एकत्व व संघर्ष

दोन विरोधी घटक एकत्र असतात, याचा अर्थ काय आहे. संघर्ष म्हणजे काय ? एकत्व व संघर्ष यामधील विकासाची प्रक्रिया कोण ठरवित असतो ?

## विरोधांमधील एकत्व

दोन विरोधी घटकांचे अस्तित्व एकमेकांशिवाय असू शकत नाही. एक जर अस्तित्वात असेल, तर दुसराही अस्तित्वात असला पाहिजे. जर एक विरोध नाहीसा झाला, तर दुसरा स्वतंत्रपणे अस्तित्वात राहू शकत नाही. काही विशिष्ट परिस्थितीमध्ये विरोधी घटक एकमेकांत रुपांतरीत होतात. जीवंत जीवाणूंमध्ये मृत पेशींच्या जागी, जीवंत पेशी येत असतात व कालांतराने त्याही मृत्यू पावतात. युध्दामध्ये कालांतराने शांतता येत असते व काही काळाने हीच शांतता युध्दात रुपांतरीत होते.

वर्ग संघर्षाबाबतही हे खरे आहे का ? भांडवली समाजामध्ये भांडवलदार व कामगार, असे दोन विरोधी वर्ग संबंध असतात. दिर्घ काळात हे दोन विरोध एकमेकांची जागा घेतात. समाजवादी क्रांतीच्या यशामुळे ज्या कामगार वर्गावर, याआधी सत्ता चालविली जात होती, तो कामगार वर्ग क्रांतीनंतर भांडवली वर्गावर सत्ता चालवितो. या दोन वर्गांचा जोपर्यंत अस्त होत नाही, तोपर्यंत एक दुसऱ्यामध्ये रुपांतरीत होण्याची प्रवृत्ती नाहीशी होत नाही. म्हणूनच समाजवादामध्येही वर्ग संघर्ष महत्वाचे कार्य करीत असतो. चीन व रशियामधील भांडवलशाहीची पुर्नस्थापना, म्हणजे या विरोधी वर्गांचे एकमेकांतील रुपांतर आहे. म्हणूनच माओने समाजवादाच्या काळातील भांडवलशाहीच्या पुनर्स्थापनेच्या धोक्याविषयी मांडणी केली आहे.

## विरोधांमधील संघर्ष

एकाच वस्तूमधील वा प्रक्रियेतील विरोधी घटक एकमेकास नष्ट करु बघतात, एकमेकात शिरकाव करू बघतात. गति प्राप्त होण्यास व विकास होण्यासाठी विरोधी घटकांतील संघर्षच कारणीभूत होतात. प्रत्येक अंतर्विरोध विशिष्ठ स्वरुपातच अस्तित्वात असतो. निरनिराळे अंतर्विरोध निरनिराळ्या प्रकारे सोडविले जातात. त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पध्दतीही निरनिराळ्या असतात.

भांडवलदारांचे हीत व कामगारांचे हीत एकमेकांविरुद्ध असतात. नफ्यामध्ये वाढ केली

तर कामगारांकडून शोषून घेतलेल्या अतिरिक्त मुल्यांमध्ये वाढ होते. जर पगार वाढले किंवा कामाच्या परिस्थितीत सुधारणा केली तर नफ्यामध्ये घट होते. या दोघांमधील संघर्षातूनच ज्यांच्यावर आता सत्ता गाजवली जात आहे ते कामगार सत्ताधारी बनतील व जे आता सत्तेवर आहेत त्यांच्यावर सत्ता गाजवली जाईल.

## अंतर्गत व बाह्य अंतर्विरोध

आपणास माहित आहे की काहीही बाकीच्यांपासून वेगळे राहून अस्तित्वात राहू शकत नाही. जे असंख्य अंतर्विरोध जगात अस्तित्वात आहेत, त्यापैकी काही अंतर्गत आहेत, तर काही बाह्य आहेत. जे अंतर्विरोध अन्य वस्तू वा प्रक्रियेशी असलेल्या संबंधाबाबत असतात, त्यांना बाह्य अंतर्विरोध म्हणायचे. विकासासाठी दोन्ही प्रकारचे अंतर्विरोध महत्वाचे आहेत. अंतर्गत अंतर्विरोध विकासासाठी प्राथमिक आहेत. कारण ते महत्वाच्या बाबीशी जोडलेले असतात.

इंग्लीश लोकांनी भारतात येण्याआधी, भारत व इंग्लंडमधील अंतर्विरोध बाह्य अंतर्विरोध असा होता. मात्र इंग्लीश लोकांनी भारतात वसाहत केल्यानंतर तो अंतर्विरोध अंतर्गत झाला. आता जरी इंग्लीश लोकांची भारतामध्ये वसाहत नसली तरी अनेक देशातील परकीय भांडवलाने भारतामधील उत्पादन व्यवस्था व सामाजिक संस्कृतीवर प्रभूत्व मिळविले आहे व भारतामधील सामान्य जनतेच्या विकासामध्ये हे भांडवल अडथळा बनले आहे, म्हणूनच आज साम्राज्यवाद व भारतीय जनता, यामध्ये महत्वाचा अंतर्गत अंतर्विरोध आहे.

## वैश्विकता व विशेषता

प्रत्येक जडवस्तू वैश्विक आहे व प्रत्येक वैश्विक एक एक जणाशी जोडलेले आहे. प्रत्येक वैश्विक सारांशाने एक एक जणाशी जोडलेले आहे. प्रत्येक जण वैश्विकतेशी अंशत: जोडलेला आहे. (लेनिन)

आपण काही विशिष्ट वस्तूंचे निरिक्षण करुनच त्याबाबत, त्यांच्याबद्दल अनूमान काढतो व त्यांच्यासाठी अमूर्त संकल्पना तयार करतो. उदा. जेव्हा आपण कामगार ही संकल्पना वापरतो तेव्हा एखाद्याचे लिंग, भाषा, राष्ट्रीयत्व याबद्दल विचार करीत नाही. कामगारांकडे उत्पादनांच्या साधनांची कुठलीही मालकी नाही व त्यास त्याची श्रमशक्ती विकावी लागते या अर्थाने कामगार ही संकल्पना वापरतो व ती वैश्विक आहे.

अंतर्विरोध प्रत्येक जडवस्तू व क्रियेमध्ये आहे व या अर्थाने अंतर्विरोध वैश्विक आहे. अंतर्विरोधाची वैश्विकता त्याच्या विशेषतेवर अवलंबून असते. विशेषतेचा अभ्यास केल्यावर आपण वैश्विकतेकडे पोचू शकतो.

२० व्या शतकात भांडवलशाही साम्राज्यवादामध्ये परिवर्तीत झाली. लेनिनने भांडवलशाहीची ही विशेषता लक्षात घेतली. दुसऱ्या आंतरराष्ट्रीय समितीच्या नेत्यांना मात्र ही समजली नाही व ते पोथिनिष्ठपणे विचार करीत राहिले. भांडवलशाही जरी साम्राज्यवादामध्ये परिवर्तीत झाली तरी भांडवलशाहीचे गुणधर्म व अंतर्विरोध बदलले नव्हते. अंतर्विरोध आहे, हे तसेच ठेवून भांडवलशाहीने साम्राज्यशाहीची विशेषता ग्रहण केली होती. म्हणून लेनिनने सिध्दांत मांडला की क्रांती आता फक्त साखळीतील कमजोर ठिकाणीच होऊ शकते व क्रांती एका देशामध्ये विजयी होऊ शकते.

निरनिराळ्या प्रकारचे अंतर्विरोध निरनिराळ्या प्रकारच्या पध्दती वापरूनच सोडवावे लागतात. रशियामधील फेब्रुवारी क्रांतीने व ऑक्टोबर क्रांतीने सोडविलेल्या अंतर्विरोधामध्ये मुलभूत फरक होता. म्हणून ते अंतर्विरोध सोडविण्यासाठी भिन्न मार्ग वापरले गेले. मार्क्सवाद्यांनी हे तत्व नीट लक्षात ठेवले पाहिजे. जे क्रांतीकारक एकच डावपेच / व्यूहरचना कायमपणे वापरतात, त्यांच्यामुळे क्रांतीची पिछेहाट होत असते व मोठे नुकसान ही होऊ शकते.

## ४) मुख्य अंतर्विरोध

जडवस्तूंमध्ये व प्रक्रियेमध्ये अनेक अंतर्विरोध एकाच वेळेस असतात. ते एकमेकांवर परिणाम घडवून आणत असतात व सर्व मिळून गतिची क्रिया व विकासाची क्रिया ठरवली जात असते. परंतू विकासाच्या क्रमात या सर्व अंतर्विरोधांना समान महत्व असत नाही. कुठल्या विशिष्ट वेळी एकच अंतर्विरोध महत्वाचा असतो व तोच विकास प्रक्रिया ठरवित असतो.

आपल्या देशामध्ये जनता व सरंजामशाही यामधील अंतर्विरोध प्रधान आहे. याशिवाय कामगारवर्ग-भांडवलदारांचा वर्ग, साम्राज्यवाद-जनता, दलाल नोकरशहांचे भांडवल-सर्वसाधारण जनता, तसेच सत्ताधारी वर्गातले आपापसातील अंतर्विरोध, पुरुष-स्त्रीया, खेडी-शहरे, बौध्दिक कामे-श्रमाची कामे, उच्च जातींतील माणसे-दलीत जातीतील माणसे इत्यादी अंतर्विरोध आहेत. परंतू मुख्य अंतर्विरोध बाकीच्या अंतर्विरोधाचे अस्तित्व ठरवित असतो. मुख्य अंतर्विरोधाच्या सोडवणूकीवर बाकीच्या अंतर्विरोधांची सोडवणूक अवलंबून असते. म्हणूनच मुख्य अंतर्विरोध नक्की करणे फार महत्वाचे आहे.

मुख्य अंतर्विरोध सुटल्यावर बाकीचे अंतर्विरोध आपोआप सुटत नसल्यामुळे साम्यवादी पक्षाला बाकीच्या अंतर्विरोधांकडे दुर्लक्ष करणे शक्य नाही. मुख्य अंतर्विरोधाबरोबर दुसऱ्या अंतर्विरोधाची सुटका करणे आवश्यक आहे व या कार्यात सुसूत्रता आणणे फार जरूरी आहे.

अनेक सुधारणावादी असे आरोप करतात की, साम्यवादी व्यक्ती व पक्ष मुख्य

अंतर्विरोधाच्या नावाखाली बाकी अंतर्विरोधांना टाळतात. सुधारणावादी अधिभौतिक पध्दतीनुसार एक एक प्रश्नांचा विचार स्वतंत्रपणे करतात. स्त्री मुक्ती चळवळ, विद्यार्थ्यांची चळवळ, जातीप्रश्नाची चळवळ... इत्यादी चळवळी राजकारण न करता कराव्यात, असे जे सांगत असतात, ते सर्व मुख्य अंतर्विरोधाच्या सोडवणूकीचे महत्व लक्षात घेत नाहीत. म्हणून जाणिवपूर्वक वा अजाणतेपणे जो अंतर्विरोध त्यांना सोडवायचा आहे त्याच्या सोडवणूकीच्या मार्गात ते स्वत:च अडथळे बनतात. जे सिध्दांत व तत्त्वज्ञान मुख्य अंतर्विरोधाचे तत्व अमान्य करतात ते सर्व सामाजिक बदलाच्या आड येत असतात.

आपल्या देशात सत्तांतर होण्यापूर्वी मुख्य अंतर्विरोध ब्रिटीश साम्राज्यवाद आणि भारतीय जनता यात होता. त्याचवेळेस सरंजामशाही व जनता यामध्येही अंतर्विरोध होता. पण तो त्या वेळेस दुय्यम होता. परंतू सत्तांतरानंतर मुख्य अंतर्विरोध दुय्यम झाला व दुय्यम अंतर्विरोध मुख्य झाला. याचाच अर्थ निरनिराळ्या टप्प्यांवर अंतर्विरोध निरनिराळे असतात.

## ५) अंतर्विरोधातील मुख्य पैलू

अंतर्विरोधातील दोन विरोधी घटकांतील एक घटक मुख्य असतो व तो दुसऱ्या घटकावर प्रभूत्व गाजवित असतो व तो बदलाच्या प्रक्रियेवर आपला प्रभाव पाडत असतो. दुसरा घटक तुलनेने अशक्त असला, तरी तो संघर्ष करून मुख्य घटक बनण्याचा प्रयत्न करीत असतो. जेव्हा शक्तींमधील समतोल दुसऱ्या बाजूकडे वळतो, तेव्हा अशक्त घटक मुख्य घटकाची जागा घेतो.

## ६) अंतर्विरोधातील शत्रूत्वाची जागा

आपण जर सामाजिक जीवनातील काही अंतर्विरोधांचा विचार केला, तर आपणास आढळते की, त्यामधील विरोधी घटकातील संघर्ष शत्रूत्वाच्या पातळीवर पोहचतात. असे शत्रूत्वाचे अंतर्विरोध ज्या सामाजिक व्यवस्थेमध्ये असतात त्या व्यवस्थेमधे असे अंर्तविरोध सोडविणे अशक्य असते. वर्गसंघर्षाद्वारे सामाजिक क्रांती करूनच व जुन्या समाजव्यवस्थेचा अंत करुनच असे अंतर्विरोध सोडविणे शक्य होते.

सर्वच सामाजिक अंतर्विरोध शत्रूत्वाचे असत नाही. जनतेमध्येही आपआपसात अंतर्विरोध असतात, पण ते शत्रूत्वांचे नसतात. ते अंतर्विरोध चर्चा करुन व देवाण-घेवाण करुन सोडविता येऊ शकतात. कारण त्यांचे सामुदायीक (सर्वांना लागू होणारे) हितसंबंध असतात व ते त्यांच्यामधील संघर्षांच्या हितसंबंधापेक्षा जास्त महत्वाचे असतात. अर्थात प्रत्येक वेळी ते मित्रत्वाच्या नात्याने सोडविले जातातच असे नाही. उलट असे काही अंतर्विरोध वेळेवर सोडविले नाही, तर ते शत्रूत्वाच्या अंतर्विरोधामध्ये परिवर्तीत होतात.

उदा. हिंदू-मुस्लिम, दलित-ओबीसी.

साम्यवादी कार्यकर्ते शत्रूत्वाच्या व बिनशत्रूत्वाच्या अंतर्विरोधामध्ये फरक करतात व शोषीत जनतेची एकजूट करण्यास समर्थ होतात. सत्ताधारी वर्ग मात्र जनतेमधील अंतर्विरोधांना तीव्र करुन, शत्रूत्वाच्या अंतर्विरोधामध्ये बदलण्यासाठी प्रयत्न करीत असतो. बाबरी मशीद पाडून जातीयवादी शक्तींनी व सत्ताधारी वर्गाने जनतेमधील अंतर्विरोध शत्रूत्वाच्या अंतर्विरोधमध्ये बदलले, हे आपणास माहीत आहेच.

साम्यवादींनी जनतेमधील अंतर्विरोधाचा विचार सर्वहारा वर्गाच्या दृष्टीकोनातून केला पाहिजे. जनतेची एकता सर्वात फार महत्वाची आहे, हे लक्षात घेऊन साम्राज्यवाद्यांविरुध्द व सरंजामशाहीविरूध्द आघाडी उभी केली पाहिजे. सर्वहारांच्या पक्षामध्ये, मतामधील फरक, पक्षातील भिन्न धोरणे, यामुळे निर्माण होणारे अंतर्विरोध, टीका-आत्मटीका ही लोकशाहीची पध्दत वापरून सोडविता येतात.

## संख्यात्मक बदलाचे गुणात्मक बदलांमध्ये परिवर्तीत होण्याचा नियम

आपणास आता समजले आहे की, जडवस्तूमधील बदल किंवा विकास दोन विरोधी घटकांतील संघर्षामुळे होतो. पण हा बदल कसा होतो, हे संख्यात्मक बदलांचे गुणात्मक बदलात होणाऱ्या परिवर्तनाच्या नियमाद्वारे समजते. या जगात असंख्य जडवस्तू आहेत व ते एकमेकांपासून भिन्न आहेत. उदा. धातू म्हणजे काय? काही सामुदायिक विशिष्ट गुणधर्म असलेल्या वस्तूंचा गट म्हणजे धातू होय. जो घनपदार्थ हातोडीने दुसऱ्या आकारात कायमपणे आणता येतो व ज्यामधून वीज वाहू शकते व जो चकाकतो इ. गुणवत्ता असलेल्या जडवस्तूस धातू म्हणतात. गुणवत्ता म्हणजे वस्तूमानाच्या गुणधर्मांचा गट की जो त्यांची विशेषता किंवा गाभा व्यक्त करतो. सोने धातू आहे, याचा अर्थ असा होतो की सोने असे वस्तूमान आहे, ज्याचे असे गुणधर्म आहेत, जे केवळ धातू असलेल्या वस्तूमानांमध्येच असतात.

प्रत्येक वस्तूमानाची विशेष गुणवत्ता असते. जर ही गुणवत्ता बदलली, तर स्वत: जडवस्तूमानामध्ये बदल घडून आला, असा त्याचा अर्थ होतो. जर पाण्याने द्रव स्वरुप बदलून टाकले, तर त्यास आता पाणी न म्हणता, बर्फ किंवा वाफ असे म्हणावे लागेल. या नविन स्वरुपात त्याचे गुणधर्मही नविन असतील. जोपर्यंत स्वरुप एकाच प्रकारचे आहे, तोपर्यंत त्याची गुणवत्ता बदलत नाही. गुणवत्ता तुलनात्मक दृष्ट्या स्थिर असते.

प्रत्येक वस्तूमानास गुणवत्तेबरोबरच विशिष्ट मात्रात्मक परिमाण असते. मात्रात्मक परिमाण म्हणजे काय? जडवस्तूंचा आकार, त्याने व्यापलेली जागा, जडवस्तूचा विशेष गाभा

असलेल्या गुणवत्तेची तीव्रता व त्या गुणवत्तेच्या विकासाची (म्हणजेच वाढीची किंवा कमीपणाची) पातळी या सर्वांद्वारे त्या वस्तूमानाची मात्रात्मक परिमाण ठरत असते. सर्वसाधारणपणे मात्रात्मक परिमाण आकड्यात मोजता येते. काही संख्या आकड्यात मोजता येणार नाही. उदा. उत्पादक शक्तींचा विकास आकड्यात मोजता येणार नाही. पण तरीसुध्दा आपण त्याची वाढ वा ऱ्हास लक्षात घेऊ शकतो.

जडवस्तूंचे अस्तित्व त्याच्या गुणवत्तेवर जास्त अवलंबून आहे. जडवस्तूंचे स्वरुप न बदलता, केवळ संख्येमध्ये बदल घडवून आणता येतो. म्हणून संख्येत बदल झाला, तरी स्वत: जडवस्तूच्या अस्तित्वामध्ये वा त्याच्या गुणवत्तेमध्ये फरक पडत नाही. परंतू संख्यात्मक बदल काही एका विशिष्ठ पातळीपर्यंत झाल्यानंतर, वस्तूमानाच्या गुणवत्तेमध्ये व स्वत: वस्तूमानामध्ये बदल घडतात. यालाच आपण संख्यात्मक बदलांचे गुणात्मक बदलांमध्ये परिवर्तन असे म्हणतो.

पाणी शुन्य सेंटीग्रेड किंवा त्यापेक्षा कमी तापमानात घन स्वरुपात असते व शंभर सेंटीग्रेड व त्याहून जास्त तापमानात वायू स्वरुपात असते. परंतू शून्य ते शंभर सेंटीग्रेड यामधील तापमानात पाणी द्रव्यच असते. तापमानाने जर मर्यादा पार केली, तरच या संख्यात्मक बदलांमुळे गुणात्मक फरक पडू शकतो. म्हणजेच संख्या व गुणवत्ता यामधील एकत्व भंग पावते. नविन स्वरुपात नविन पायावर संख्या व गुणवत्ता यांचे एकत्व निर्माण होते. हेगेलने अतिशय उत्तम उदाहरण दिले आहे. ऑक्सीजनच्या दोन अणूंपासून ओटू ($O_2$) तयार होतो. व तीन अणूंपासून ओ थ्री ($O_3$) म्हणजेच ओझोन तयार होतो. या दोघांमधील गुणवत्तेत फरक आहे. जर शरीरातील तापमानाने मर्यादा पार केली, तर मृत्यू होतो. उत्पादक शक्तींच्या संख्यात्मक बदलामुळे उत्पादन संबंधामध्ये बदल घडू शकणे शक्य होते.

संख्यात्मक बदल कमी वेगाने होत असतात व दिर्घ कालामध्ये होत असतात व ते लक्ष वेधून घेतील किंवा नाही घेतील. गुणवत्तेमधील बदल मात्र वेगाने, अचानक व लक्ष वेधून घेत असतात. जरी सर्व गुणात्मक बदलांमुळे विकास होत नसला, तरी विकास गुणात्मक बदल झाल्याशिवाय होत नाही. सुधारणावादी ही बाब लक्षात घेत नाहीत व ते समाजाचे मुलभूत स्वरुप शांततेच्या मार्गाने संख्यात्मक बदल घडवून वा सुधारणांद्वारे बदलू पाहतात व अयशस्वी होतात. ते गुणवत्तेमध्ये बदल घडवून व क्रांती करुन बदल घडवत नाहीत. म्हणूनच विकासासाठी गुणवत्तेमधील बदलांच्या आवश्यकता मान्य करतात की नाही यावरून क्रांतीकारक व सुधारणावादी यामध्ये भेदाभेद करणे शक्य आहे. संख्या व गुणवत्तेमधील संबंध द्वंद्वात्मक आहेत.

## नष्ट करणाऱ्याचे नष्ट होणे यासंबंधीचा नियम

'नष्ट करणाऱ्याचे नष्ट होणे' हा नियम विकासाच्या दोन लागोपाठच्या टप्प्यांमधील व जुने आणि नविन यांच्यामधील संबंध स्पष्ट करतो. नष्ट करणे याचा अर्थ नविनाने जुन्याची जागा घेणे, असा येथे घ्यावा. एंगल्सने बीयांचे उदाहरण याबाबत दिले आहे. बीयांमधून नविन झाड तयार झाले की त्या बीया नष्ट होतात व कालांतराने त्या झाडामधून शेकडो बिया तयार होतात व झाड मरते. यालाच नष्ट करणाऱ्याचे नष्ट होणे म्हटले आहे. परंतू या प्रक्रियेत विकास झालेला असतो. नविन येणारे वस्तूमान व प्रक्रिया जुन्यातील सर्व पुरोगामी, प्रगतिशील अंश स्विकारते व पुढच्या नविन विकासासाठी आवश्यक असणारे घटकही विकसीत करते. नविन येणाऱ्यांत जुन्यामधील प्रतिगामी घटकही अस्तित्वात येतात. क्रांतीनंतर जुन्या समाजातील सर्व नकारात्मक, प्रतिगामी घटक एकदम नष्ट होत नाहीत. जुन्या समाजातील प्रतिगामी विचारसरणी, प्रथा, सवयी व संस्कृती नष्ट करण्यासाठी सांस्कृतिक क्रांतीची आवश्यकता निर्माण होते. उत्क्रांतीवादामुळे आपणास माहीत आहे की, वनस्पती व प्राणी केवळ संख्यात्मक बदल करत नाहीत, तर गुणात्मक बदल करुनही विकसीत होत असतात. आदिम साम्यवादी समाजाच्या जागी खाजगी मालमत्तेवर आधारीत वर्ग असलेला समाज निर्माण झाला. खाजगी मालमत्ता असलेल्या वर्ग समाजाच्या जागी, सामाजिक मालकी असलेला साम्यवादी समाज निर्माण होईल. हा वर्गविहीन साम्यवादी समाज जरी आदिम साम्यवादी समाजासारखा वाटला, तरी तो विकसीत स्वरुपात अस्तित्वात असेल.

## द्वंद्वात्मक भौतिकवादातील तत्त्वज्ञानाच्या संकल्पनाविषयी

ज्याप्रमाणे वस्तूमान, उर्जा, गुरुत्वाकर्षण या पदार्थविज्ञानाच्या शाखेतील संकल्पना आहेत. विक्रीय वस्तू, मूल्य, भांडवल इ. संकल्पना राजकीय अर्थशास्त्रातील आहेत. त्याचप्रमाणे तत्त्वज्ञानामध्येही संकल्पना आहेत. तत्त्वज्ञानामध्ये सहा महत्वाच्या संकल्पना संच आहेत.

१) विशेष व वैश्विक, २) गाभा व स्वरुप, ३) सार व देखावा, ४) कारण व परिणाम, ५) आवश्यकता व आपसुकता, ६) शक्यता व सत्यता

विशेष व वैश्विकता विषयी आपण आधीच चर्चा केली आहे.

## गाभा व स्वरुप

एखाद्या जडवस्तूचा वा प्रक्रियेचा मुलभूत घटक, पैलू, त्यामधील प्रक्रिया व त्यांमधील संबंध, या सर्वांमुळे ती विशिष्ट वस्तू वा प्रक्रिया अस्तित्वात येते. या सर्वांना त्या वस्तूमानाचा वा प्रक्रियेचा गाभा म्हणतात. गाभा त्या वस्तूच्या विकासाची जडणघडण ठरवित असतो.

गाभ्याची रचना व गाभ्यातील निरनिराळ्या घटकांचे आपापसातील संबंध यास स्वरुप असे म्हणतात. गाभा व स्वरुप प्रत्येक जडवस्तू व प्रक्रियेमधील अलग न होऊ शकणारी विरोधी पैलू आहेत.

उत्पादक शक्ती उत्पादन व्यवस्थेचे गाभा आहेत, तर उत्पादन संबंध त्या व्यवस्थेचे स्वरुप आहेत. सृजनशील साहित्यामध्ये जीवनाचे प्रतिबिंब हा त्या साहित्याचा गाभा आहे व ज्या प्रकारे ते जीवन दर्शविले जाते (भाषाशैली, वर्णन, चित्रण) त्यास साहित्याचे स्वरुप असे म्हटले पाहिजे.

साम्यवादी समाजरचना अस्तित्वात आणण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी, जे आपल्या संपूर्ण जीवनाचे योगदान करतात असे सर्व, साम्यवादी पक्षाचे सभासद त्या पक्षाचा गाभा आहेत. पक्षाची छोटी तुकडी, विभाग समिती, त्यांच्यातील ताळमेळ व एकत्व हे पक्षाचे स्वरुप आहे.

प्रत्येक वस्तूमानाचा गाभा कुठल्यातरी स्वरुपात व्यक्त होतो. स्वरुप नेहमीच कुठल्यातरी गाभ्याशी जोडलेले असते. त्यांच्यातील एकत्व बदलत नाही, असे आपण गृहित धरता कामा नये. वस्तूमानातील वा प्रक्रियेतील गाभा बदलू शकतो कारण बाह्य जगाशी त्याचा संबंध असतो व गाभ्यामध्येही आपापसात क्रिया-प्रतिक्रिया चालूच असतात.

आपणास माहित आहे की, जेव्हा उत्पादन संबंध (स्वरुप) उत्पादक शक्तींच्या (गाभा) विकासामधील अडथळे बनतात, तेव्हा त्यांचे स्वरुप बदलल्याशिवाय उत्पादक शक्तींचा विकास होणे अशक्य आहे. क्रांती करुन नविन उत्पादन संबंध निर्माण केल्याशिवाय उत्पादक शक्तींचा विकास अशक्य आहे. क्रांतीकारी व्यवहार करीत असतांना त्यांचे स्वरुप व गाभा यांबाबत दक्षता बाळगणे आवश्यक आहे. संघटनेचे स्वरुप व गाभा लक्षांत घ्यावे लागतात.

## सार व देखावा

विशिष्ट जडवस्तूमधील वा प्रक्रियेमधील मुलभूत संबंध व अंतर्गत नियम दोघे मिळून, त्या वस्तूमानाच्या वा प्रक्रियेच्या अस्तित्वाची स्थिरता व विकास प्रक्रिया ठरवित असतात व त्यास त्या वस्तूमानाचे वा प्रक्रियेचे सार असे म्हणतात. सार म्हणजे वस्तूमान वा प्रक्रियेमधील खोलवर असलेला सर्वात स्थिर मुलभूत घटक व संबंध की, जे त्या वस्तूच्या वा बदलाचे आधार असतात. सार व गाभा एकच नाही, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. सार गाभ्याचा एक भाग आहे.

जडवस्तूंच्या बाह्यांगाचे गुणधर्म व त्याचे दुसऱ्या वस्तूंशी असलेले संबंध दोघे मिळून त्या वस्तूचा देखावा ठरवित असतात. देखावा म्हणजे वस्तूमानाच्या साराचे अंदाजे दृष्यस्वरुप.

देखाव्यांचा आपल्या पाच इंद्रियांवर परिणाम होतो. देखाव्याशी संबंध असलेल्या ज्ञानाला समज असे म्हणतात. मार्क्स लिहीतो की, जर केवळ देखाव्यावरुन आपणास सार लक्षात आले असते, तर विज्ञानाच्या एवढ्या शाखांची आवश्यकता लागली नसती. भांडवली समाजामध्ये श्रमशक्ती व भांडवल, यांमधील संबंध आपणास दोन समान मुल्यांच्या अदलाबदलीच्या देखाव्यात दिसतो व व्यक्त केला जातो. परंतू हा देखावा श्रमशक्ती व भांडवल यांच्यामधील संबंधाचे सार स्पष्ट करीत नाही. मार्क्सने हे सार वरकड मुल्याच्या सिध्दांताची मांडणी करुन उघडे केले. हा सिध्दांत कामगारांची पिळवणूक का व कशी होते, हे स्पष्ट करतो.

संसदीय लोकशाहीचे सार, भांडवलदारांची हुकूमशाही हाच आहे. परंतू बाह्य देखावा मात्र असा आहे की, संसद म्हणजे लोकांच्या इच्छेनुसार काम करणारे सरकार असलेली व्यवस्था. कामगारवर्गाची हुकूमशाही या संकल्पनेद्वारे असे वाटते की, सर्वहारा वर्गाची हुकूमशाही असलेली राज्यव्यवस्था. पण त्याचे सार मात्र सर्वहारा वर्गासाठी खरीखूरी लोकशाही हाच आहे.

सार व देखावा एकाच वस्तुमानाच्या वा प्रक्रियेच्या दोन विरोधी बाबी आहेत. आपण फक्त आपल्या विचाराद्वारेच त्यामध्ये फरक करु शकतो. हे दोघे एकमेकांमध्ये बदलू शकतात. वस्तूमानाचे सार आतमध्ये खोलवर असते व ते देखाव्याच्या आड लपले जाते. ज्ञानेंद्रियांना सार ग्रहण करता येत नाही. सार केवळ अमूर्त विचारांद्वारेच समजले जाते. ज्ञान मिळविण्याची प्रक्रिया देखाव्यापासून सुरु होते व नंतर सार ग्रहण करते. सार व देखावा, यामधील द्वंद्वात्मक संबंध आपणास समजला नाही, तर आपण ज्ञानेंद्रियांनी ग्रहण केलेले ज्ञान व तर्कशुध्द ज्ञान, यांमधील द्वंद्वात्मक संबंध समजण्यास अपयशी ठरतो.

## कारण आणि परिणाम

ज्यामुळे परिस्थिती किंवा घटना निर्माण होतात, त्यास कारण असे म्हणतात. ‘कारण’ अंमलात आल्यामुळे, जे काही घडते त्यास परिणाम असे म्हणतात. उदा. पावसामुळे पुर येतो व नद्या, नाले भरून जातात. येथे पाऊस हे कारण आहे, तर नद्या, नाले भरणे, पुर येणे परिणाम आहेत. कारण व परिणाम यामध्ये द्वंद्वात्मक संबंध असतात. राजकारण, नैतिकता, धार्मिकता व संस्कृती हे ढाचाचे घटक आहेत व उत्पादानाच्या पद्धतीचा परिणाम म्हणून ढाचा अस्तित्वात असतो. परंतु ढाचा (परिणाम) व उत्पादनाची पद्धत (कारण) यामधील संबंध द्वंद्वात्मक आहेत. याचा अर्थ असा की ढाचा आपला प्रभाव उत्पादनाच्या पद्धतीवर पाडित असतो आणि कधी कधी हा प्रभाव निर्णायक ही ठरू शकतो. कारण व परिणाम एकमेकांची जागा घेऊ शकतात. धोकादायक विनाशकारक प्रक्रियेच्या कारणाचा

शोध घेतला, तर त्यांचे वाईट परिणाम नाहीसे वा कमी करता येतात. तसेच चांगले परिणाम असलेल्या प्रक्रियांच्या कारणांचा शोध घेतला तर त्याचा फायदा सर्वांनाच होऊ शकतो.

## आवश्यकता आणि आपसुकता

कारण व परिणाम यांमधील संबंधाचा खोलवर अभ्यास केल्यावर आवश्यकता ही संकल्पना उदयास आली. विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट बाब आवश्यकपणे घडत असते. उदा. 'साम्राज्यवाद म्हणजे युद्ध' असे का म्हटले जाते? याचा अर्थ असा आहे की, साम्राज्यशाहीच्या काळामधील भांडवलशाही स्वत:च्या संकुचित बाजापेठेच्या संकटातून बाहेर पडण्यासाठी म्हणजेच या अंतर्विरोधातून बाहेर पडण्यासाठी आवश्यकपणे युद्धनीती वापरते. म्हणजेच जो पर्यंत साम्राज्यवाद आहे तो पर्यंत युद्ध अटळपणे होणारच. आवश्यकता जडवस्तू वा प्रक्रियेच्या सारातून व अंतर्गत घडणीमुळच नक्की उदयास येते. आपसुकता किंवा शक्यता, आवश्यकतेप्रमाणे नक्की अस्तित्वात येईलच असे नव्हे. वादळामुळे जर पिकांची हानी झाली तर एक आपूसकता असते कारण वादळाचा संबंध पीकांच्या अंतर्गत घडणीशी नसतो व वादळ नेहमीच येतात असे नव्हे.

## शक्यता आणि सत्यता

नविन वस्तूमानाच्या वा प्रक्रियेच्या उदयासाठी मुलभूत पूर्वअटी, कारणे व परिस्थितीची गरज आहे. या सर्वांना एकत्रीतपणे शक्यता असे म्हणतात. याचाच अर्थ असा होतो की, जे काही अस्तित्वांत आहे, ते सर्व शक्यता असल्यामुळेच अस्तित्वात आले. सत्यता ही संकल्पना असंकूचीत व संकूचीत अर्थाने वापरता येते. असंकूचीत अर्थाने सत्यता म्हणजे, जे काही वस्तूमय जगात आहे, ते सर्व. संकूचीत अर्थाने सत्यता म्हणजे शक्यता प्रत्यक्षात अस्तित्वांत येणे किंवा शक्यता तयार होणे. भांडवलशाहीचा विकास झाल्यामुळे उत्पादनाच्या साधनाच्या सामुदायिक मालकीची शक्यता उदयास येऊ शकली. शक्यतेचे रुपांतर सत्यामध्ये होण्यासाठी प्रदीर्घ कालावधी लागतो व त्रास, अडचणी येत असतात. निसर्गातील शक्यतांचे रुपांतर सत्यतेमध्ये होण्यासाठी केवळ वस्तुगत परिस्थितीची आवश्यकता पुरेशी आहे. जंगलामध्ये जेव्हा बीयांस योग्य जमीन, तापमान व आर्द्रता उपलब्ध झाली तर त्या बीयांचे रुपांतर वनस्पतीमध्ये होऊ शकते. परंतु सामाजिक जीवनामध्ये माणूस हा जाणिव असलेला घटक असल्यामुळे शक्यतेचे रुपांतर सत्यामध्ये होण्यासाठी केवळ वस्तुगत परिस्थिती पुरेशी नाही तर आत्मगत परिस्थितीचीही आवश्यकता आहे. भांडवलशाही स्व:ताहून साम्यवादामध्ये बदलणार नाही. जाणिवपूर्वक वर्ग संघर्षाचे धोरण जर कामगार वर्गाने स्विकारले तरच साम्यवादाची शक्यता प्रत्यक्ष सत्य होऊ शकते.

## ज्ञानासंबंधी मार्क्सवादी सिध्दांत

मानवी विचार प्रक्रियेच्या विकासाची सर्वसाधारण तत्त्वे स्पष्ट करणाऱ्या सिध्दांतास ज्ञानाचा सिध्दांत असे म्हणतात. ज्ञानाच्या सिध्दांताचा विचार करीत असतांना, आपण द्वंद्वात्मक पध्दत वापरली पाहिजे. आपल्या ज्ञानात बदल होणार नाही, असे आपण समजू शकत नाही. अज्ञान दूर करून, ज्ञान कसे संपादन केले जाते, अर्धवट व अपूरे ज्ञान पूर्ण व अचुक कसे करता येईल याचा विचार केला पाहिजे.

कल्पनावादी तत्त्ववेत्ते वस्तूमय जगाचे अस्तित्वच अमान्य करीत असल्यामुळे, त्यांच्या मते ज्ञान पूर्णपणे आत्मगत आहे. मार्क्सवादी तत्त्वज्ञान जग वास्तवात, स्वतंत्रपणे अस्तित्वात आहे या मांडणीद्वारेच सुरु होते व म्हणून मार्क्सवादी विचारसरणीप्रमाणे ज्ञान म्हणजे बाह्य जगाचे मानवी विचारातील प्रतिबिंब होय. जगातील वस्तूमान व प्रक्रिया मानवी ज्ञानाचे स्त्रोत आहेत, या आधारावर ज्ञानाचे मार्क्सवादी सिध्दांत उभे आहेत.

ज्ञानाचे मार्क्सवादी सिध्दांत असे समजतात की, ज्ञान ग्रहण करण्याची क्रिया केवळ, वस्तूमानावर अवलंबून नसून, ती क्रिया ज्ञान ग्रहण करणाऱ्यांवरही अवलंबून आहे. मानव विशिष्ठ कंपन असलेलाच आवाज ऐकू शकतो. वासाची शक्ती कुत्र्यांना माणसांपेक्षा जास्त प्रमाणात आहे. आपण काही विशिष्ट प्रकारचेच प्रकाशकिरण पाहू शकतो. अर्थात उत्क्रांतीच्या प्रक्रियेमुळे मानवाची ज्ञानेंद्रिये परिस्थितीशी जूळत गेले व ते एकमेकांशी सुसंगत कार्य करीत असल्यामुळे वस्तूगत जगाचे सर्वोत्तम प्रतिबिंब मानवाला ग्रहण करता येते. तरीही ज्ञानप्रक्रिया ग्रहण करणाऱ्यांवर अवलंबून असल्यामुळे अनेकदा भ्रम, चुकीची माहिती व चुकीची प्रतिमा मानवी जाणिवेत निर्माण होते.

मार्क्सवादी तत्त्वज्ञानाप्रमाणे जगाचे ज्ञान ग्रहण करण्याची गरज व त्याचा उपयोग सामाजिक व्यवहार करण्यासाठी आहे. निसर्गामध्ये व समाजामध्ये जाणिवपूर्वक बदल घडवून आणण्याच्या प्रयत्नांना, मार्क्सवादी सामाजिक व्यवहार असे म्हणतो. म्हणून सामाजिक व्यवहार म्हणजे सामाजिक उत्पादन, वर्गसंघर्ष व वैज्ञानिकता आहे.

जेव्हा आपण म्हणतो की, ज्ञान सामाजिक व्यवहाराची उत्पत्ती आहे, तेव्हा आपण ज्ञानाचे सामाजिक स्वरूप लक्षात घेत असतो व ज्ञानाचे व्यवहाराशी असलेले अतूट संबंध व्यक्त करीत असतो.

## ज्ञान मिळविण्याच्या प्रक्रियेमधील दोन पायऱ्या

१) ज्ञानेंद्रियांनी ग्रहण केलेले ज्ञान, २) तर्कशुध्द ज्ञान

व्यवहारात आपण प्रथम घटना, वस्तूमानाचे अलग पैलू व त्यांचे बाह्य संबंध ज्ञानेंद्रियांद्वारे

ग्रहण करतो. ही ज्ञानाची पहिली पायरी आहे. आपण या पायरीद्वारे खोल ज्ञान प्राप्त करु शकत नाही. यानंतर आपण वस्तूमानाचे सार, त्यांचे आपापसातील संबंध याविषयी कल्पना करु शकतो. नंतर व्यवहारात त्याची पडताळणी करुन, काही निष्कर्ष काढून आपण तर्कशुध्द निर्णयास येतो. ही ज्ञान ग्रहण करण्याची दुसरी पायरी आहे.

आपण मिळवलेले निरनिराळे ज्ञान व प्रत्यक्षातील सत्यता समान आहे किंवा नाही, हे केवळ ज्ञानाच्या दोन पायऱ्यांद्वारे आपणास समजू शकत नाही. त्यासाठी प्रत्यक्ष व्यवहाराची गरज आहे व जेव्हा आपण तर्कशुध्द ज्ञान सामाजिक व्यवहारात वापरतो, तेव्हा या प्रश्नाला उत्तर मिळते. ज्या सिध्दांतांचा संबंध क्रांतीकारी व्यवहारांशी येत नाही किंवा ते क्रांतीकारी व्यवहारात रुपांतरित होत नाही, त्या सिध्दांतांना उद्देश असत नाही. ज्या व्यवहारांचा सिध्दांताशी कुठलाही संबंध नसतो, ते व्यवहार अंधारात तीर मारत असतात.

व्यवहार-ज्ञान-पुन्हा व्यवहार-पुन्हा ज्ञान अशी प्रक्रिया खंड न पाडता, पुन्हा पुन्हा करावी लागते. प्रत्येक एका वर्तुळानंतर व्यवहार व ज्ञान यांचे सार उच्च पातळी गाठते.

## पुर्ण सत्य-तुलनात्मक सत्य

जे काही चुकीचे आहे अथवा अंशत: चुकीचे आहे असे सिध्द करता येत नाही व जे व्यवस्थितपणे माहित असते, त्यास पूर्ण सत्य असे म्हणतात.

तुलनात्मक सत्य म्हणजे, जे काही भविष्यामध्ये चुकीचे किंवा अंशत: चुकीचे आहे. असे वैज्ञानिक प्रगतिद्वारे सिध्द होऊ शकेल ते सर्व. अर्थात हे लक्षात घेतले पाहिजे की, तुलनात्मक सत्य हे पुर्ण सत्याकडे जाणारे पाऊल असते. मानवाची जाणिव एका वेळेस सर्व वस्तूनिष्ठ सत्य पूर्णपणे जाणून घेऊ शकेल का ? जगात सतत विकास होत असतो व जग अंतहीन असल्यामुळे, संपूर्ण ज्ञान एका विशिष्ट वेळी मिळविणे, माणसाच्या ज्ञान ग्रहण क्रियेस असंभवनीय आहे. या अर्थाने माणसाचे ज्ञान तुलनात्मक सत्य आहे, असे म्हणावे लागेल. परंतू ज्ञान मिळविण्याचा उद्देश व दिशा मात्र पूर्ण सत्य हेच असेल.

# प्रकरण ४

# ऐतिहासिक भौतिकवाद

मानवी समाज अस्तित्वात कसा आला ? त्याची गति कशी आहे व विकास कसा होत आहे ? तो कुठल्या दिशेला वाटचाल करत आहे ? प्राचीन काळापासून मानवास या प्रश्नांची उत्तरे हवी आहेत. प्राचीन काळापासून वर्गसंघर्षावर आधारीत असलेल्या, सर्व सामाजिक-आर्थिक व्यवस्थेमध्ये संपत्ती असलेल्या वर्गाने स्वत:चे धोरण, बौध्दिक कार्यावरही लादले. परिणामी समाजामध्ये, इतिहासामध्ये व समाजाच्या विकास प्रक्रियेमध्ये, कल्पनावादी विचारांचे प्रभूत्व अगदी अलिकडच्या काळापर्यंत होते. समाजावर व समाजाच्या विकासावर परिणाम करणाऱ्या देवासारख्या अगम्य व गुढ शक्तींच्या अस्तित्वावर विश्वास, वैयक्तीक वीरांद्वारे इतिहास घडणे, महान व्यक्तींच्या विचारानुसार, मतानुसार, समाजाचा विकास घडून येणे या सर्व कल्पनावादी विचारधारा आहेत.

धार्मिक, कल्पनावादी व अधिभौतिक विचारांना व मतांना विरोध करुन, मार्क्स व एंगल्स यांनी मानवी समाजाच्या संपूर्ण इतिहासाचे, द्वंद्वात्मक भौतिकवादाच्या दृष्टीकोनातून विश्लेषण केले. या प्रक्रियेत त्यांनी समाजाच्या विकासाचे मुलभूत नियम मांडणाऱ्या ऐतिहासिक भौतिकवादाची निर्मिती केली.

ऐतिहासिक भौतिकवाद समाजाची घडण, त्याचे सर्वसाधारण गुणविशेष, समाजातील विविध घटकांतील क्रिया व प्रतिक्रिया, समाजाच्या विकासाची सर्वसाधारण तत्वे, या सर्वांचा अभ्यास द्वंद्वात्मक भौतिकवाद वापरून करतो. तो मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा अतूट हिस्सा आहे. त्याच्यामुळे सर्व सामाजिक विज्ञानांना पाया उपलब्ध होतो.

## निसर्गाचे नियम आणि समाजाच्या विकासाचे नियम

ऐतिहासिक भौतिकवाद मानवी समाजास निसर्गाचा अतूट हिस्सा समजतो. म्हणून निसर्गाचे बहुतेक सर्व सर्वसाधारण नियम, मानवी समाजाला सुध्दा लागू होतात.

भौतिकवादाच्या नियमाप्रमाणेच ऐतिहासीक भौतिकवादाचे नियमही वस्तूनिष्ठ आहेत. निसर्गाचे नियम आंधळेपणाने अंमलात येतात. याउलट सामाजिक नियम मानवाच्या जाणिवपूर्वक व विशिष्ठ उध्दीष्टांसाठी केलेल्या कृतीद्वारे अंमलात येतात. समाजाचे नियमही, जरी जाणिवपूर्वक केलेल्या कृतीमुळे अस्तित्वात येत असले, तरी ते नियम माणसांच्या इच्छेप्रमाणे अंमलात येत नाहीत.

## सामाजिक अस्तित्व व सामाजिक जाणिव

माणसांचे सामाजिक अस्तित्वच माणसांची सामाजिक जाणिव ठरवित असते. माणसांच्या जाणिवेवरून माणसांचे अस्तित्व ठरत नसते. जगण्यासाठी लागणाऱ्या साधनांच्या निर्मितीच्या प्रक्रियेत निसर्ग आणि मानव यामधील संबंध व तसेच माणसांमधील आपापसातील संबंध समाज प्रस्थापित करीत असतो. हे संबंध मानवापासून स्वतंत्र असतात व सामाजिक अस्तित्वाचा भाग बनतात.

राजकारण, कायदा, धर्म इत्यादी विषयी सिध्दांत, माणसांची मते व विचार, वर्गीय सामाजिक मनोधारणा, राष्ट्रीयत्व व माणसांचा समूह, हे सर्व मिळून, सामाजिक जाणिव तयार होते. सामाजिक अस्तित्व सामाजिक जाणिव ठरवित असते याचा नक्की अर्थ असा होतो की, सामाजिक विचार किंवा सिध्दांत अपघाताने आपसूकपणे उदयास येत नाहीत व कुठलाही समुह, वर्ग किंवा व्यक्ती, विशिष्ठ सामाजिक-आर्थिक-ऐतिहासिक परिस्थितीमध्ये विचार व कृती करतो. ऐतिहासिक परिस्थितीमध्ये सर्वहारा वर्ग सामाजिक शक्ती म्हणून उदयास आला व भांडवली व्यवस्थेशी संघर्ष करु लागला व त्या संघर्षाची वैचारिक गरज पूर्ण करणे आवश्यक असलेल्या परिस्थितीमध्ये मार्क्सवाद निर्माण झाला व म्हणून मार्क्सवाद वैयक्तीक निर्मिती नसून सामुदायीक निर्मिती आहे.

## उत्पादन पध्दत - सामाजिक जीवनाचा भौतिक पाया

## समाज म्हणजे काय ?

समाज म्हणजे केवळ माणसांचा समुह असे आपण समजत नाही. समाज म्हणजे भौतिक उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये विशिष्ठ उत्पादन संबंध स्थापित झालेल्या व या संबंधावर अवलंबित असणाऱ्या, सामाजिक-राजकीय-सांस्कृतिक व्यवस्थेमधे रहाणाऱ्या माणसांचा समुह. सर्व मानवी कृतींमध्ये भौतिक उत्पादनाची कृती ही सर्वात महत्वाची कृती आहे. जगण्याच्या साधनांची निर्मिती, हाच मानव प्राण्यापासून भिन्न असण्याचा महत्वाचा घटक आहे. निसर्गावर आपल्या श्रमांनी व उत्पादनाच्या अवजारांच्या मदतीने प्रक्रिया करुन मानव जीवनावश्यक वस्तु निर्माण करतो व यालाच आपण उत्पादन करणे असे म्हणतो. उत्पादनाची पहिली अवजारे दगडांपासून निर्माण केली गेली. श्रमप्रक्रियेमुळे माणूस सामाजिक झाला व त्याच्या शारिरीक व मानसिक क्षमतेचा विकास होण्यामधे श्रमप्रक्रियेने महत्वाची भूमिका केली. उत्पादन करीत असतानांच मानवी संबंध तयार झाले व समाजाच्या निर्मितीचे ते आधार बनले. या आधारावर राजकारण, संस्कृती व धर्म विकसीत झाले व यालाच समाजाचा ढाचा असे म्हणतात. भौतिक उत्पादन प्रक्रिया व त्यात निर्माण होणारे आर्थिक संबंध यास समाजाचा पाया असे म्हणतात. पाया व ढाचा मिळून जी एकूण

सामिजक घडण तयार होते त्यास संयुक्तपणे सामाजिक-आर्थिक व्यवस्था असे म्हणतात.

उत्पादनाची पध्दत हाच सामाजिक जीवनाचा भौतिक पाया आहे हे ओळखणे हाच ऐतिहासिक भौतिकवादी संकल्पनेचा महत्वाचा घटक आहे.

मानवी समाज आदिम समाजापासून ते आत्ताच्या भांडवली समाजापर्यंत भिन्न टप्प्यांद्वारे विकसीत झाला आहे. उत्पादनाची नविन पध्दत अस्तित्वात आणल्यामुळे संपूर्ण सामाजिक-आर्थिक व्यवस्था नविन व उच्च पातळीवर पोहचते. म्हणून मानवी समाजाच्या इतिहासातील टप्पे म्हणजे उत्पादन पध्दतीच्या विकासातील निरनिराळे टप्पे आहेत. म्हणून मानवी इतिहास हा उत्पादन पध्दतींचा इतिहास असे आपण म्हणू शकतो. मग कुठली गतिशील शक्ती समाजाचा इतिहास घडवून आणते हा प्रश्न उभा राहतो. उत्पादन पध्दतीचे घटक असलेले उत्पादनांच्या शक्ती व उत्पादन संबंध या दोन घटकांमधील अंतर्विरोध हीच मानवी समाजामधील गतिशील शक्ती आहे. या दोन विरोधी घटकांतील संघर्षामुळे मानवी समाज निरनिराळ्या टप्प्यांद्वारे प्रगति करतो.

## उत्पादनाच्या शक्ती

उत्पादन म्हणजे मुख्यत: नैसर्गिक साधनांचे दैनंदिन मानवी जीवनाला उपयोगी पडणाऱ्या वस्तूंमध्ये रुपांतर करणे. उदा. कुंभाराने मातीपासून भांडी तयार करणे, शेतात धान्य तयार करणे, कापसापासून कापड तयार करणे, लोखंडापासून यंत्रे तयार करणे इ. वस्तूंच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या सर्व वस्तू व शक्तींना उत्पादनाच्या शक्ती असे म्हणतात. उत्पादनाच्या शक्तींची विभागणी उत्पादनाची साधने व मानवी श्रम, या दोन गटांत सर्वसाधारणपणे करता येते.

## उत्पादनांची साधने

जमीन, खाणी, जंगल, कच्चा माल, निरनिराळी अवजारे, नांगर, यंत्रे इत्यादी सर्व उत्पादनांची साधने आहेत. यामधील अवजारे मानवी श्रमाची साधने आहेत. मानवी श्रम व उत्पादनाची साधने या दोन घटकांशिवाय उत्पादन अशक्य आहे.

## उत्पादन संबंध

उत्पादन प्रक्रियेमध्ये जे संबंध माणसांमध्ये निर्माण होतात, त्यास उत्पादन संबंध असे म्हणतात. त्यास आर्थिक संबंध असेही म्हणतात.

भांडवली समाजामध्ये भांडवलदार व कामगार यामध्ये संबंध तयार होतात व उत्पादनाची साधने व श्रमांनी एकत्र काम केले की, उत्पादन होऊ शकते. उत्पादक शक्ती, उत्पादन

संबंधाच्या विशिष्ट संचामध्येच अस्तित्वात असतात व कार्य करतात. विशिष्ठ उत्पादक शक्तींच्या विकासाच्या टप्प्याला अनुरुप, विशिष्ठ उत्पादन संबंध असावे लागतात. उत्पादन संबंध उत्पादनाचे स्वरुप ठरवत असतात. उत्पादनाच्या संबंधामध्ये बदल झाल्यास, उत्पादनाचे स्वरुप बदली होते. जमीनदार-शेतकरी हे संबंध नाहिसे झाले, तर सरंजामशाही नाहीशी होते. भांडवलदार-कामगार, यामधील संबंध संपुष्टात आले, तर भांडवलशाही संपुष्टात येते. म्हणून आपण असे म्हणू शकतो की मानवी समाजाचा इतिहास हा मानवी संबंधाचा इतिहास आहे.

## उत्पादक शक्ती व उत्पादन संबंध - दोन विरोधी घटक

उत्पादक शक्ती व उत्पादन संबंध यामधील उत्पादक शक्ती सतत गतिमध्ये असतात. उत्पादक शक्तींचा गुणविशेष आहे की, ते सतत बदलत असतात व विकसीत होत असतात. उत्पादन संबंध तुलनेने जास्त स्थिर असतात व ते दिर्घकाळ अस्तित्वात असतात. उत्पादक शक्तींच्या विकासाच्या विशिष्ठ टप्प्यानंतर मात्र उत्पादक शक्ती व उत्पादन संबंध यामधील अंतर्विरोध तीव्र होतो व म्हणून ज्या संबंधामुळे आत्तापर्यंत उत्पादक शक्तींचा विकास शक्य झाला होता. तेच उत्पादक शक्तीच्या विकासास अडथळे ठरू लागतात व म्हणून उत्पादक शक्तींची प्रगती होऊ शकत नाही व त्याच चौकटीमध्ये आहेत तसेच राहतात. परिणामी नविन उत्पादन संबंधाची आवश्यकता निर्माण होते व क्रांतीद्वारे नविन संबंध प्रस्थापित करावे लागतात. जुने संबंध नविन संबंधांना विरोध करतात म्हणून जुने संबंध सामाजिक ताकद वापरून नष्ट करावे लागतात. नविन संबंध नविन टप्प्याला अनुरुप असल्यामुळे उत्पादक शक्तींचा विकास शक्य होतो. कालांतराने पुन्हा नविन उत्पादन संबंधाची आवश्यकता पुढील विकासासाठी निर्माण होते.

## पाया-ढाचा

राजकारण, धर्म, तत्त्वज्ञान, साहित्य, कला व संस्कृती हे सर्व घटक ढाचा तयार करतात व हे घटक मानवी जीवनात महत्वाचे आहेत. हे घटक जरी आर्थिक पायावर आधारित असले, तरी पाया भक्कम करतात व त्याचे संरक्षणही करतात. म्हणजेच पाया व ढाचा यांच्यामध्ये द्वंद्वात्मक संबंध तयार होतात. जेव्हा जुने उत्पादन संबंध समाजाच्या विकासातील अडथळे बनतात, तेव्हा त्या उत्पादन पध्दतीच्या पायावर उभा असलेला ढाचा, प्रतिगामी भूमिका जोराने कार्यरत करीत असतो. म्हणून जुन्या उत्पादन संबंधांविरुध्द असलेल्या संघर्षाला जुन्या प्रतिगामी ढाच्याविरुध्द सुध्दा जोरदार संघर्ष करावा लागतो. याचा अर्थ असा आहे की, केवळ पायाविरुध्द संघर्ष पुरेसा नाही.

## मानवी समाजाचा विकास - संक्षिप्तपणे

सत्ताधारी वर्गाच्या इतिहासकारांनी हजारो वर्षांच्या मानवी प्रगतिचे वर्णन वेगवेगळ्या घटनांच्या समुहाद्वारे व महान व्यक्तींच्या विचारामुळे, कर्तृत्वामुळे किंवा अगम्य असलेल्या देवा सारख्या चैतन्यशील शक्तींच्या इच्छेमुळे प्रगति झाली, या प्रकारे केले आहे. परंतू द्वंद्वात्मक भौतिकवादाच्या दृष्टीकोनातून केलेले विश्लेषण प्रथमच विज्ञान स्वरुपात आपणास उपलब्ध झाले.

आपण येथे मानवी समाजाच्या विकासाचे सर्वसाधारण चित्रण करणार आहोत. मार्क्सवाद हे अमान्य करीत नाही की, मानवी विकास निरनिराळ्या ठिकाणी, निरनिराळ्या वेळेला व निरनिराळ्या प्रकारे झाला आहे. परंतू या वेगळ्या व एकमेकांपासून स्वतंत्र आहे, असे वाटणाऱ्या घटनांच्या आड असलेले इतिहासाचे सार शोधून काढण्यात, मार्क्सवादाचे मोठे यश आहे.

## आदिम वर्गविहीन समाज

श्रम करणे व श्रम करण्यासाठी लागणाऱ्या अवजारांची निर्मिती करणे, या आधारावर माणसाचे जग प्राण्यांपासून दोन लाख वर्षांपूर्वी वेगळे झाले. परंतू इतिहासकार फक्त गेल्या पाच, सहा हजार वर्षांचा कालावधी लक्षात घेतात, कारण त्यावेळेपासून लिखीत स्वरुपातील पूरावे उपलब्ध आहेत. या आधीच्या काळाला इतिहासपूर्व काळ असे म्हणतात. या संपूर्ण दोन लाख वर्षांच्या काळात मानव वर्गीय शोषणाशिवाय व वर्गांशिवाय व दडपशाहीशिवाय जगला. यालाच आदिम साम्यवादी समाज असे म्हणतात. या काळातील मानवी समाजांत खाजगी मालमत्ता अस्तित्वात नव्हती. म्हणून वर्गही अस्तित्वात नव्हते. सामुदायिक सहकारी उत्पादन संबंध प्रचलित होते व सर्वजण उत्पादनामध्ये भाग घेत होते व उत्पादन सगळ्यांना वाटले जायचे.

पाशवी नैसर्गिक शक्तींपुढे निभाव लागण्यासाठी व मानवाच्या अस्तित्वासाठी असे सामुदायीक सहकारी उत्पादन संबंध आवश्यक होते. त्याकाळी अतिरिक्त उत्पादन होत नव्हते. म्हणून श्रम न करता, अतिरिक्त उत्पादनावर जगण शक्य नव्हते. टोकदार दगडांची शस्त्रे बनविल्यानंतर, प्राण्यांची शिकार लाभदायक ठरू लागली. तरीसुध्दा धनुष्यबाणाचा शोध लागला नव्हता, तोपर्यंत फळे, धान्य, कंदमुळे गोळा करणे, हीच जगण्याची मुख्य साधने होती. आगीचा शोध लागल्यानंतर प्रथमच मानवास नैसर्गिक साधनांवर नियंत्रण मिळविता आले. त्यानंतर मासे व अन्य जलचर प्राणी खाणे व अन्न शिजविणे शक्य झाल्यामुळे नदीच्या काठावर व समुद्रकिनारी वस्ती करणे शक्य झाले.

श्रमांची उत्पादकता एवढी वाढली की, मानवास श्रमाद्वारे केलेल्या उत्पादनांचा संचय भविष्यासाठी करणे शक्य झाले. नंतरच्या काळात मानव प्राण्यांना पाळण्यास व त्यांचे प्रजनन करण्यास व वनस्पतींची लागवड करण्यास शिकल्यामुळे मानवाचा अधिक विकास होऊ लागला. प्राण्यांसाठी कुरण मिळविण्यासाठी व वाढविण्यासाठी जमाती हिंडू लागल्या. नंतर धातूचा वापर करण्यास मानव शिकला. धातूंचे नांगर निर्माण झाले.

या सर्व काळात माणसांच्या लैंगिक संबंधामध्येही विकास होत गेला. सुरुवातीस कामशास्त्र व्यवहारांवर कुठलेच बंधन नव्हते. परंतू रक्तातील नाते असलेल्या लैंगिक व्यवहारांमुळे जमात अशक्त होते, हे लक्षात आल्यानंतर, रक्तसंबंध असलेल्यांना आपसात लग्न करण्यास मनाई करण्यात आली. नंतर माणसे गट करुन राहू लागली व गटाअंतर्गत लग्न करण्यास मनाई करण्यात आली. म्हणून गटा-गटांत लग्न होऊ लागली. गटा-गटांतील लग्ने होत असतांनाच जोडी मधील लग्नाची प्रथा चालू झाली. गटागटातील लग्नप्रथेमुळे समान पुर्वज असलेल्यांच्या जमाती निर्माण झाल्या. जमातीमध्ये श्रमविभागणी सर्व प्रथम पुरुष व स्त्रीया यामध्ये झाली. स्त्रीयांना मुलांचे संगोपन करावयाचे असल्यामुळे मुले वाढविणे, धान्य गोळा करणे व घरकाम करणे, ही कामे त्यांच्या वाटेला आली. पुरुषमंडळींना प्राण्यांची शिकार व नंतर प्राणी पाळण्याची कामे करावी लागली. त्यामुळेही उत्पादक शक्तींचा विकास झाला. जमातीमधील लोक एकत्र येऊन चर्चा करून सामुदायिकपणे निर्णय घेत होती. त्यांची संपत्ती सामुदायिक मालकीची असे. गटांमधील लोकशाही व जमातीची सामुदायीक संपत्ती, यांच्या आधारावर उत्पादन संबंध, सामायीक जमीन, भाषा, संस्कृती विकसीत झाली. दुसऱ्या श्रमविभागणीमुळे काही जमाती शेती करीत होत्या, तर काही प्राणी पाळून जगत होत्या. हळूहळू काही जणांना श्रम केल्याशिवाय जगणे शक्य झाले. जमातींचे प्रमुख, जादूटोणा करणारे श्रमापासून वेगळे झाले. याआधी हरलेल्या जमातीतील माणसांना ठार मारायचे, त्याऐवजी हरलेल्या माणसांना गुलाम म्हणून वापरायला सुरुवात झाली. याच काळात गुलाम व गुलामांचे मालक हे संबंध निर्माण व्हायला सुरुवात झाली. आदिम साम्यवादींच्या सामुदायीक मालकीच्या जोडीला, आता खाजगी मालकी व संपत्ती उदयास आली. दुसऱ्यांच्या श्रमावर जगण्याच्या क्रियेमुळे वर्ग संबंधही उदयास आले.

## वर्गावर आधारीत असलेला समाज

वर्गावर आधारीत असलेल्या समाजाने तीन ऐतिहासीक स्वरुपे धारण केली.

**१) गुलामगिरी, २) सरंजामशाही, ३) भांडवलशाही**

## गुलामगिरी

गुलामगिरी व्यवस्थेमध्ये गुलामांकडे उत्पादनाचे कोणतेही साधन नव्हते, त्यांना कुठलेही मानवी हक्क दिले गेले नव्हते. त्यांचे जगणे प्राण्यांहून ही वाईट होते. गुलामांचे मालक त्यांना विकू शकत, मारु शकत व मृत्यूही देऊ शकत होते. आदिम समाजातही अशा प्रकारचे संबंध उदयास आले नव्हते.

अशा प्रकारची अमानवी समाजव्यवस्था चालू ठेवण्यासाठी दडपशाही करणारी ताकद आवश्यक होती. यातूनच शासन व्यवस्था निर्माण झाली. मालकांसाठी विनामुल्य काम करण्याची सक्ती गुलामांवर करण्यासाठी, त्यांचा विरोध व निषेध दडपून टाकण्यासाठी, शासनव्यवस्था निर्माण झाली. शासनाने निरनिराळ्या ऐतिहासिक काळात व ठिकाणी निरनिराळी स्वरुपे घेतली असली, तरी ते नेहमीच मालकांच्या वर्गाची सत्ता चालविण्याचे हत्यार राहिले आहे व म्हणून दडपशाही करणारी व्यवस्था राहिली आहे. धर्मानेसुध्दा आपली भूमिका याकाळी केली. गुलामांना भासविले गेले की, त्यांची मुक्तता दुसऱ्या जगात होणार आहे. सुरुवातीच्या काळात अतिरिक्त उत्पादन प्रत्यक्षपणे स्वत: सत्ताधाऱ्यांच्या ताब्यात देण्याचे कार्य धर्माने केले आहे. धर्मांबाबत मार्क्सने 'धर्म व समाज' या ग्रंथात मांडणी केली आहे की, ''वेदनांच्या विरोधातील धार्मिक मांडणी एकाच वेळेस प्रत्यक्ष जीवनातील खऱ्या वेदनांच्या विरोधी मांडणी आहे व त्या वेदनांच्या विरोधी केलेला निषेधही आहे. धर्म दडपलेल्या जनतेचा उसासा आहे व मानवता नसलेल्या जगाचे हृदयही आहे, धर्म लोकांची अफू आहे. आनंदाचा आभास निर्माण करणाऱ्या धर्माचे निर्मूलन खऱ्या आनंदासाठी आवश्यक आहे. लोकांच्या परिस्थितीबाबत निर्माण केलेले भ्रम नाहिसे केले पाहिजेत, अशी मागणी करणे म्हणजे अशा भ्रमांची आवश्यकता निर्माण करणाऱ्या परिस्थितीच्या निर्मूलनाची मागणी आहे.''

## गुलामांचे श्रम-नागरीकरण

गुलामगिरी प्रथम नाइल, टाइग्रीस-इफार्टीस व सिंधू नदींच्या खोऱ्यात इ.स. पुर्वी ३०००-२००० या काळात उदयास आली व त्याचे स्वरुप प्राथमिक स्वरुपाची गुलामगिरी असे होते. गुलामांची उत्पत्ती प्रत्यक्ष वापरासाठीच होती. याच काळात व्यापाऱ्यांचा वर्ग उदयास आला व श्रमांची तीसरी विभागणी झाली. अर्थात ती अगदी प्राथमिक स्वरुपाची होती. नंतर काही काळाने उत्पादक शक्तींचा विकास झाला. नाणी अस्तित्वात आली. स्वतंत्र छोटे उत्पादक कफल्लक झाले. गुलामांच्या श्रमांनी उत्पादन प्रक्रियेत महत्वाची जागा मिळविली. गुलामांनी केलेले उत्पादन विक्रीय वस्तूत रुपांतरित झाले. गुलामांचा बाजार वाढू लागला. अनेक नागरिक कर्जबाजारी झाले व ते सर्वहारा वर्गात सामिल झाले.

गुलामांच्या श्रमांच्या आधारावर समाजात तत्त्वज्ञान, विज्ञान व कला या क्षेत्रात प्रगती झाली. ग्रीसमध्ये इ.स. पूर्वी ७००-४०० अशी प्रगति विशेष झाली.

या गुलामगिरी समाजामध्ये स्वाभाविकपणे गंभीर स्वरुपाचे वर्ग अंतर्विरोध होते. गुलामांनी सततपणे गुलामगिरीविरुध्द बंड केली आहेत. आर्थिकदृष्ट्या दडपलेल्या सामान्य नागरिकांनीही गुलामांच्या मालकाविरुध्द व शासनाविरुध्द बंडे केली आहेत. गुलामांच्या संख्येत मालकांनी सतत भर घातली व त्याद्वारेच त्यांनी स्वत:चा अंत करुन घेतला. गुलामांना उत्पादनाचा काहीच फायदा मिळत नसल्यामुळे, उत्पादकता वाढविण्याची त्यांची इच्छा नव्हती व त्यांनी त्यासाठी काही प्रयत्न केले नाहीत. एवढेच नव्हे, तर त्यांनी उत्पादनाच्या साधनांची मोडतोड सुरु केली. कृषी उत्पादन व हस्त उद्योग यामध्ये स्वत: लक्ष घातल्याशिवाय उत्पादकतेचा विकास होऊ शकणार नाही, अश्या टप्प्यावर गुलामांचा समाज येऊन पोहचला. गुलामगिरी व्यवस्था खोल संकटात जाऊ लागली.

आता गुलामांच्या मालकांनी गुलामांना, भिकेला लागलेल्या शेतकऱ्यांना छोटे छोटे शेताचे तुकडे, अवजारांसहित कसावयास दिले व त्याबदल्यात उत्पादनातील काही हिस्सा त्यांना देण्याची प्रथा सुरु केली. गुलामांना स्वातंत्र्य दिल्यामुळे व त्यांना शेतकरी बनविल्यामुळे, गुलामगिरीत जे उत्पादन मिळत होते, त्यापेक्षा जास्त उत्पादन मालकांना मिळू लागले. सरंजामशाही अशा प्रकारे अस्तित्वात आली.

भारतामध्ये सिंधू खोऱ्यातील व्यवस्था कुजायला लागल्यानंतर, समाजाने वेगळेच वळण घेतले. कुरणांवर जीवन अवलंबून असणाऱ्या आर्य जमातींनी, शेती करण्यास सुरुवात केली व ते खेड्यात वस्ती करुन राहू लागले व त्यानंतर वर्गव्यवस्था वर्ण व्यवस्थेच्या रुपात उदयास आली. रोम किंवा ग्रीसमधील गुलामगिरी व्यवस्थेशी तुलना केल्यानंतर, असे आढळते की, वर्णव्यवस्था एक वेगळ्याच रुपात होती. भारतामध्ये कुठेही नेता येईल, अशा प्रकारची गुलामगिरी मोठ्या प्रमाणात अस्तित्वात नव्हती. सर्व समाजाला लागणाऱ्या वस्तूंच्या निर्मितीसाठी कष्ट करण्याचे व उत्पादनांचे कार्य, वर्णव्यवस्थेमधील सर्वात खालच्या शुद्रांवर लादण्यात आले. युरोपमधील परिपक्व गुलामगिरी व येथील वर्णव्यवस्थेचा गाभा सारखाच होता. या दोन्ही वर्गव्यवस्था उत्पादनांच्या साधनांची खाजगी मालकी व आदिम काळातील वर्ग संबंध, याद्वारे उदयास आल्या होत्या.

कष्टकऱ्यांवर प्रचंड दडपशाही करून व गुलामगिरी लादून, सर्वहारा वर्गाला एकत्र केल्यामुळे, उत्पादनाचा आकार वाढला. विशिष्ठ ऐतिहासीक परिस्थितीमध्ये विशिष्ठ स्वरुपात उदयास आलेली वर्ण व्यवस्था, म्हणजे भारतातील पहिली वर्ग व्यवस्था आहे. जगातील निरनिराळ्या भागांतील पहिल्या वर्ग व्यवस्थेच्या स्वरुपात जरी भिन्नता होती,

तरी त्याचा गाभा सर्वत्र समान होता. तो गाभा आहे अमानवी दडपशाही - सर्वहारा वर्गाची गुलामी - कष्टकऱ्यांची भयानक पिळवणूक.

## संरजामशाही

सरंजामशाहीतील उत्पादन संबंधामुळे गुलामांचे रुपांतर अर्ध-गुलाम शेतकरी असे झाले. अर्ध-गुलाम शेतकऱ्यांकडे काही अवजारे होती व ते शेतीच्या काही हिश्यावर स्वत:साठी काम करु लागले. परंतू जमिनीबरोबर, तो व त्याचे कुटूंब जमीन मालकाच्याच ताब्यात होते. याचा अर्थ, तो त्या जमिनीशी बांधला गेला होता. शेतकऱ्यांना उत्पादनांचा काही हिस्सा जमिनदारांना द्यावा लागे. शिवाय तो जमिनदारांच्या जमिनीवर वेठबिगारी करीत होता. अशा तऱ्हेने शेतकऱ्यांची गुलामी व शोषण संपुष्टात आले नाही, फक्त पिळवणूकीच्या स्वरुपात बदल झाला. गुलामगिरीप्रमाणे येथेही जमिनदार-शेतकरी या संबंधाचा पाया खाजगी मालकी असा आहे.

निरनिराळ्या ठिकाणी व वेळी सरंजामशाहीने निरनिराळी स्वरुपे घेतली, तरी त्यांचा सर्वसाधारण गाभा जमिनदारांना मिळणारे भाडे (बहूधा धान्याच्या रुपात) व वेठबिगारी श्रमांद्वारे होणारे शेतकऱ्यांचे शोषण हाच होता. शेतकऱ्यांचे केवळ आर्थिक शोषण होत नव्हते. अन्य तऱ्हेनेही, त्यांचे शोषण व दडपणूक व्हायची व हीच सरंजामशाहीची गुणविशेषता आहे.

सरंजामशाहीत शासन सर्वसाधारणपणे राजेशाही या स्वरुपात होते. कधीतरी जमिनदारांच्या प्रतिनिधीद्वारे तयार करण्यात आलेले, गणराज्य हेही स्वरुप शासनाने घेतले. शासनाने जमिनदारांच्या बाजूने राज्य केले व शेतकऱ्यांवर, कारागिरांवर व अन्य कष्टकऱ्यांवर दडपशाही केली. धर्मानेही येथे शोषण केले व सरंजामशाहीच्या शेवटी चर्च, देवळे या संस्थांकडेही जमिनीची मालकी होती व तेही जमिनदार झाले होते. सरंजामदारांकडे संपत्ती जमा झाली होती व त्यांना विशेष हक्क प्राप्त झाले होते. शेतकऱ्यांना, कष्टकऱ्यांना कुठलेच हक्क प्राप्त झाले नव्हते व ते समाजातील खालच्या दर्जाचे घटक होते.

भारतामध्ये मौर्य घराण्याच्या पतनानंतर वर्ण व्यवस्थेचे रुपांतर सरंजामशाहीत होण्यास सुरुवात झाली होती. भारतीय सरंजामशाहीचे हे वैशिष्ठ्य होते की, स्वयंपूर्ण असलेली खेडी तिचा पाया होता. वर्णावर आधारित असलेल्या समाजाचे विघटण झाल्यामुळे वर्ण व्यवस्थेचे रुपांतर जाती व्यवस्थेमध्ये झाले व या जाती व्यवस्थेने, सरंजामशाहीतील उत्पादन संबंधाचे स्वरुप घेतले. जाती व्यवस्थेद्वारा कष्ट करणारे कनिष्ठ वर्गात फेकले गेले व त्यांच्या या खालच्या दर्जाचे वैचारिक व सांस्कृतिक समर्थनही जाती व्यवस्थेने

केले. या प्रकारे भारतीय सरंजामशाहीतील जाती व्यवस्थेद्वारा सामाजिक थर निर्माण झाल्यामुळे भारतातील सरंजामशाही युरोपमधील सरंजामशाहीपेक्षा जास्त ताकदवान व चिवट झाली व जास्त ताकदवान सरंजामशाही उत्पादन संबंध अस्तित्वात आले.

सरंजामशाहीच्या सुरुवातीच्या टप्प्यात शेती उत्पादनाला चांगली प्रेरणा मिळाली. तसेच हस्तउद्योगही विकसीत झाले. परिणामी शहरांचाही विकास झाला व ते औद्योगिक व व्यापारी केंद्र बनले. तरीही स्वयंपूर्ण खेड्याची अर्थव्यवस्था, याच पायावर भारतातील सरंजामशाही अस्तित्वात होती. तेथे सरंजामशाहीच्या अखेरपर्यंत विक्रीय वस्तू, पैसे व विनिमय संबंधांनी मोठ्या प्रमाणावर प्रवेश केला नव्हता.

सरंजामशाहीच्या शेवटी लहान उद्योग उदयास आले, श्रमांची विभागणी झाली व विक्रीय वस्तूंचे उत्पादन वाढले. तसेच विनिमयाचे व्यवहार करण्यासाठी पैश्यांची आवश्यकता होण्याची परिस्थिती निर्माण झाली. उद्योगांमध्ये भांडवल संबंध निर्माण झाले व कामगारांचे श्रम एक विक्रीय वस्तू बनण्यास सुरुवात झाली. अशा तऱ्हेने नैसर्गिक अर्थरचनेच्या जागी, विक्रीय वस्तूंची अर्थरचना येण्याची परिस्थिती निर्माण झाली. म्हणजेच प्रत्यक्ष उपभोगासाठी उत्पादन करण्याच्या व्यवस्थेच्या जागी, वस्तूंचे उत्पादन विक्रय वस्तूंसाठी करण्याच्या व त्याद्वारे खाजगी नफा कमविण्याच्या व्यवस्थेचा उदय होण्यास सुरुवात झाली.

सरंजामशाहीच्या शेवटी उत्पादक शक्तींचा विकास होऊ शकत नव्हता. सतत चालणारी युध्दे, राजा, सरंजामदार व जमिनदारांचे ऐषारामी व चैनीचे जीवन, यामुळे शासनाचा खजिना कमी होऊ लागला व परिणामी लोकांवरील करांचा बोजा वाढायला लागला. जमिनदारांनी शेतकऱ्यांची पिळवणूक अधिकच तीव्र केली. शेतकरी कर्जबाजारी होऊ लागले व ते खेडी सोडून, शहरांत रोजगारांच्या शोधासाठी स्थलांतर करु लागले. म्हणून खेडी सोडण्याविरुध्द कायदे करण्यात आले. शेतकरी एकीकडे आड व दुसरीकडे विहीर अशा परिस्थितीत सापडला. धार्मिक चर्चेद्वाराही जनतेची पिळवणूक वाढली. शेती उद्योगाचा ऱ्हास व्हायला लागला.

हस्तउद्योगातून नविन उदयास आलेले भांडवलदार व व्यापारीसुध्दा सरंजामदारांनी लावलेल्या करांमुळे व निर्बंधांमुळे बंधनात सापडले होते व निराश झाले होते. या काळात सबंध जगामध्ये, शेतकऱ्यांची बंडे होऊ लागली. इंग्लंडमध्ये चौदाव्या शतकात वॅटटायलरचे बंड झाले. फ्रांन्समध्ये चौदाव्या व पंधराव्या शतकात जॅकवेलीनची बंडे झाली. याच काळात बोहेमियांत हूसेंटीची युध्दे झाली. जर्मनीमध्ये सोळाव्या शतकात शेतकऱ्यांची बंडे झाली. चीनमध्ये ताइपींग बंड एकोणीसाव्या शतकात झाले. भारतामध्ये सतराव्या व

अठराव्या शतकांत शिखांनी बंडे केली व १८५७-५९ या काळात पहिले स्वातंत्र युध्द झाले. रशियामध्ये १७ व्या व १८ व्या शतकात शेतकऱ्यांनी बंड केली. कालबाह्य व सडलेली सरंजामी सत्ता बदलण्याची वेळ येऊन ठेपली. परंतू कुठलाही कालबाह्य व कुजलेला सत्ताधारी स्वत:हून सत्ता सोडत नसतो व म्हणून सरंजामदारांनी आपली सत्ता टिकवून ठेवण्याचे अयशस्वी प्रयत्न केले व म्हणून शेतकऱ्यांची बंडे दडपून टाकण्याचे प्रयत्न केले.

अशा परिस्थितीत नविन उदयास आलेल्या भांडवलदारांकडे सरंजामी उत्पादन संबंध संपूष्टात आणण्याची ऐतिहासिक शक्ती निर्माण झाली. कारखाने वाढविण्यासाठी उत्पादक शक्तींमध्ये व संबंधामध्ये अजूनही विकास होण्याची आवश्यकता होती. परंतू अस्तित्वातील सरंजामी उत्पादन व्यवस्थेमधील उत्पादन संबंध हा विकास रोखून धरत होते. हा अंतर्विरोध तीन प्रकारे व्यक्त होत होता.

भांडवली उत्पादनाच्या विकासासाठी उत्पादन साधन स्वत:कडे नसलेले, मुक्त कामगार हवे होते. परंतू शेतकरी मात्र जमिनीशी जखडलेले होते.

उद्योगांचा विकास होण्यासाठी विज्ञानाचा विकास होणे आवश्यक होते. परंतू सरंजामशाही व धर्मसंस्था विज्ञानाच्या विकासामधील मोठे अडथळे बनून गेले होते.

अनेक कठोर निर्बंध व प्रचंड कर सरंजामी शासनाने जनतेवर लादले होते व निर्बंधरहित बाजारांची आवश्यकता, उगवत्या भांडवलदारास बाजारपेठ वाढविण्यासाठी भासू लागली होती.

भांडवली लोकशाही क्रांतीच्या मुख्य मागण्या, या तीन अंतर्विरोधांच्या सोडवणूकीशी जोडलेल्या होत्या. सरंजामशाहीच्या शेवटी शेतकऱ्यांनी प्रचंड उठाव केला. तेव्हा अशा परिस्थितीत भांडवलदारांच्या वर्गाने सरंजामशाहीविरुध्द असलेल्या भांडवली लोकशाही क्रांतीचे नेतृत्व केले.

ज्या पश्चिम युरोपमधील देशात भांडवलशाही प्रथम उदयास आली. त्या देशांनी चीन, भारत व अन्य देशात स्वत:ची वसाहत निर्माण केल्या. (भारतामध्ये ब्रिटीशांनी सुमारे ३०० वर्षे राज्य केले) या परकीयांच्या वसाहतींमुळे, वसाहत बनलेल्या देशातील भांडवली क्रांतीद्वारे विकास होण्यास अडथळे निर्माण झाले. वसाहतवाद्यांनी स्वत:ची सत्ता सुरक्षित करण्यासाठी सरंजामदारांबरोबर हातमिळवणी केली, म्हणून क्रांतीकारी भांडवली शक्तींच्या अभावी, येथील शेतकऱ्यांचे प्रचंड उठावसुध्दा पराभूत झाले व सरंजामी उत्पादन संबंध चालूच राहिले. सरंजामी उत्पादन संबंध व बाहेरून येऊन येथील संपत्ती लुटण्यासाठी

आलेल्या वसाहतवाद्यांचे राज्य, या दोघांमुळे, या देशातील सामान्य जनतेची आर्थिक व सामाजिक परिस्थिती अत्यंत हलाखीची झाली व आता त्यापेक्षा वाईट झाली आहे. आताच्या कामगारांना व अन्य सर्वहारा वर्गांना सरंजामी उत्पादन संबंध नष्ट करण्याचे कार्य हाती घ्यावे लागले. या प्रकारे नवजनवादी क्रांतीचा टप्पा या देशात सुरु झाला. या नवजनवादी क्रांती देशातील कालबाह्य सरंजामी संबंध व आधुनिक प्रकारचा वसाहतवाद, यांचा पराभव करून व भांडवलशाही टप्पा टाळून, समाजवादाच्या टप्प्याकडे जनतेला नेतात.

## भांडवलशाही

वर्गावर आधारीत असलेल्या समाजाची भांडवलशाही, ही तीसरी व शेवटची अवस्था आहे. भांडवलदार-कामगार हा उत्पादन संबंध, भांडवलशाहीचा पाया आहे. ज्या व्यवस्थेमध्ये उत्पादनांच्या साधनांची मालकी असलेला भांडवलदार वर्ग, श्रम विकण्याशिवाय दुसरे कुठलेही साधन नसलेल्या कामगारांची श्रमशक्ती विकत घेऊन, बाजारात विकण्यासाठी व नफा कमविण्यासाठी उत्पादन करतो, त्या व्यवस्थेस भांडवलशाही असे म्हणतात. भांडवली मालकी व त्यावर आधारीत भांडवली उत्पादन संबंध, सामाजिक व आर्थिक जीवनावर सत्ता गाजवित असतात. गुलामगिरीमध्ये कामगार गुलाम होतो, सरंजामशाहीमध्ये तो अर्ध-गुलाम होतो व भांडवशाहीमध्ये तो वेतन-गुलाम आहे. गुलामगिरीमध्ये कामगार स्वत:च विक्रीय वस्तू होतो. भांडवलशाहीमध्ये कामगाराची स्वत:ची श्रमशक्ती दुसऱ्या कुठल्याही, वस्तूप्रमाणे एक विक्रीय वस्तू आहे. कामगारांकडे उत्पादनाची साधने नाहीत व त्यांचा कुठलाही हक्क त्यांनी उत्पादन केलेल्या वस्तूंवर नाही. म्हणून त्यांचे श्रम व श्रमाद्वारे केलेले उत्पादन, त्यांच्यापासून विभक्त होतात. त्यांनी केलेले उत्पादन बाजारात जाते व ते त्यास आवाहन देते की, गरज पूर्ण करण्यासाठी त्याच्याकडे सामर्थ्य असेल, तर खरेदी करुन दाखव. कामगार भुखमारी टाळण्यासाठी स्वत:हून कामावर जातो व त्यास असा भास हातो की, त्याला दिवसभराच्या कामासाठी पगार मिळाला, पण प्रत्यक्षात त्याला काही तासाचाच पगार मिळतो व उरलेला वेळ तो भांडवलदारांसाठी फुकट काम करीत असतो. कारण तो निर्मित करीत असलेल्या वस्तूंचे मुल्य, त्याला मिळणाऱ्या वेतनापेक्षा खूप जास्त असते व म्हणूनच भांडवलदार अतिरिक्त मुल्य (नफा) कमवू शकतात. याआधी कामगारांची पिळवणूक सहज लक्षांत येत होती. आता मात्र पिळवणूक, शोषण वेतनाच्या आड लपली जाते. भांडवली उत्पादनाचे ध्येय अतिरिक्त मुल्य कमविणे हेच आहे.

आधीच्या शोषण करणाऱ्या सत्ताधाऱ्यांप्रमाणेच भांडवलदार आपली संपत्ती

वाढविण्यासाठी व दुसऱ्यांची संपत्ती बळकविण्यासाठी, कुठलेही गैरकृत्य वा कोणावरही दडपशाही करण्यास नकार देत नाही. इंग्लंडमध्ये सत्तेवर आल्यावर सामुदायीक जमिनीवर कुंपण घालणे वा धान्य उगवत असलेल्या शेताला बकरींच्या चाऱ्याच्या शेतात रुपांतर करणे वा खेड्यांना आगी लावणे व शेतकऱ्यांना शहराकडे पळवून लावणे, यासारखी समाजविघातक कृत्ये भांडवलदारांनी केली आहेत. (आता विशेष आर्थिक क्षेत्राच्या नावाखाली भारतामधील शेकडो लाख शेतकरी जमीनीपासून मुक्त करुन, त्यांच्या जमीनी भांडवलदारांना नफा कमाविण्यासाठी हव्या आहेत.)

सर्व शोषण करणाऱ्या वर्गांचे एक समान लक्षण आहे व ते म्हणजे संपत्तीची पूजा करणे. भांडवलदारही त्यास अपवाद नाहीत. तरीसुध्दा भांडवलदार त्याचबरोबर आपली संपत्ती म्हणजेच संचय अधिक अतिरिक्त मूल्य मिळविण्यासाठी पुन्हा पुन्हा उत्पादन प्रक्रियेत गुंतवत असतो. या सतत चालणाऱ्या संचय चक्रामुळे समाजाचा विकास झाला व तो ओळखता येणार नाही एवढा बदलला. मानवी इतिहासात यापूर्वी कधीही नव्हता, एवढा विकास जलद गतिने उत्पादक शक्तींमध्ये झाला. जन्मास येऊन ३०० वर्षे होत नाही. तोच भांडवलशाही उच्च व शेवटच्या टोकास पोहचली.

वैयक्तीक भांडवलदारांमधील स्पर्धा व एकूण उत्पादन व्यवस्थेमधील गोंधळ व एकमेकात मेळ नसणे, ही भांडवशाहीची खास वैशिष्टये आहेत. प्रत्येक भांडवलदार स्वत:च्या फायद्याच्या दृष्टीकोनातून करीत असलेल्या उत्पादन व्यवस्थेमध्ये, समाजाच्या गरजांचा विचार होत नाही. तसेच काही क्षेत्रांत अति उत्पादन, तर काही क्षेत्रात टंचाई निर्माण होते. मागणी व पुरवठा यांत असमतोल निर्माण होतो.

भांडवलशाहीच्या प्राथमिक टप्प्यांमध्ये अनेक छोटे छोटे भांडवलदार होते. स्पर्धेच्या प्रक्रियेत मोठ्या भांडवलदारांनी छोट्या भांडवलदारास हरविले व त्यांना स्वत:मध्ये सामिल करुन घेतले. या प्रकारे उत्पादनाची साधने संख्येने कमी असणाऱ्या, पण आकाराने मोठ्या असणाऱ्या,भांडवलदारांच्या ताब्यात गेली. त्यामुळे भांडवलशाही साम्राज्यवादामध्ये रुपांतरित झाली व मक्तेदारी असणाऱ्या भांडवदारांचा उदय झाला. भांडवली समाजव्यवस्थेमध्ये मोठया प्रमाणावर जनता दरिद्री झाली. उत्पादनाच्या साधनांची खाजगी मालकी, हा थोड्या लोकांचा विशेष अधिकार बनला. भांडवलाचे केंद्रीकरण झाल्यामुळे मोठ्या आकाराचे कारखाने निर्माण झाले व त्यामुळे कामगार व उत्पादन यांचे सामाजिकीकरण झाले म्हणजे त्यांनी संपूर्ण समाजाला व्यापून टाकले. उत्पादनाच्या साधनांचेही सामाजिकीकरण होण्यासाठी ही पूर्वअट आहे.

भांडवलदारांचा वर्ग आपला नफा सतत वाढविण्यासाठी, कामगारांना जेवढे शक्य

होईल, तेव्हढे कमी पगार देत असतो. म्हणूनच कामगारांचे दारिद्रीकरण ही भांडवलशाहीची प्रवृत्ती आहे. एकीकडे भांडवलशाही समाजातील क्रयशक्तींचा संकोच करते, तर दुसरीकडे उत्पादन क्रियेमध्ये सतत विकास घडवून, कामगारांची संख्या सतत कमी करुन, उत्पादनाचा आकार वाढवित असते. कामगारांच्या जागी यंत्रे कामे करतील असे तंत्रज्ञान शोधून यांत्रिकीकरण केल्यामुळे कामगार अतिरिक्त होतात व परिणामी जनतेमध्ये एवढी बेकारी निर्माण होते की, जनता जास्त झाली आहे, असे वाटायला लागते. बेकार कामगारांमुळे वेतनाची पातळी सतत अगदी खालची असते. (आपण आता बघत आहोत की, भारतात सर्वत्र कायम कामगारांच्या जागी कंत्राटी कामगार वापरायचे धोरण मालकांनी घेतले आहे व म्हणून कामगार संघटना प्रभावहीन होत चालल्या आहेत. कंत्राटी कामगारांना कुठलाही हक्क मिळत नाही व मालक त्यांना पाहिजे, तेव्हा कामावरुन काढू शकतो. उदा. विशेष आर्थिक क्षेत्र/सेझ भारतात मोठ्या प्रमाणावर येत आहेत व येथील उद्योगांना कुठलेच कायदे लागू नसल्यामुळे, कामगार कायदेही लागू नाहीत. परिणामी विषमता व दारिद्र्यात प्रचंड प्रमाणात वाढ येत्या काही वर्षांत होईल. गेल्या पाच वर्षांत शेतकऱ्यांनी लाखोंच्या संख्येने, कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केल्या आहेत. पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी, शेतकऱ्यांसाठी पॅकेज जाहीर करुनसुध्दा, विदर्भात दररोज अनेक शेतकरी व त्यांचे कुटूंबीय आत्महत्या करीत आहेत. विदर्भाच्या बाहेरही आत्महत्या होत आहेत. लाखो स्त्रीयांना भारतात वेश्या व्यवसाय करावा लागत आहे व अनेक नवीन स्त्रीयांना वेश्या व्हावे लागत आहे. न्यायालयांमध्ये निकाल सर्रास शोषण करणाऱ्यांच्या बाजूने लागत आहेत. आपल्या हक्कांसाठी लढणाऱ्या आदिवासींना पूर्वी कधीही नव्हती, अशा प्रकारच्या दडपशाहीला तोंड द्यावे लागत आहे. भारतातील दलितांनाही अत्याचाराला बळी पडावे लागत आहे. भंडारा-खैरलांजी येथील एकाच दलित कुटूंबातील चार जणांचा खून २९ सप्टेंबर २००६ रोजी जमिनीच्या प्रश्नावरून प्रस्थापित जातीयवाद्यांनी केला व त्यातील दोन स्त्रीयांना नग्न करुन गावात फिरविले व त्यांच्यावर सामुहीक बलात्कार केले. कानपूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पूतळा तोडण्यात आला. परिणामी ३० नोव्हेंबर २००६ रोजी संपूर्ण महाराष्ट्र दलित तरुणांनी बंद केला व व्यवस्थेवरील एकूण राग बसेस, रेल्वे गाड्या जाळून व्यक्त केला. -अनुवादक) परिणामी एका बाजूला वाढत जाणारे उत्पादन व दुसऱ्या बाजूला शोषणामुळे, होणारी क्रयशक्तीची कमतरता, असा अंतर्विरोध भांडवली समाजात निर्माण होतो. भांडवली समाजात एकिकडे अतिश्रीमंती व अतिसंपत्ती व दुसरीकडे समाजाचे वाढते दारिद्र्य व विषमता आपणास एकाच वेळेस आढळते. एकिकडे अनेक कोटी माणसे बेकार आहेत, तर दुसरीकडे जनतेला जीवानावश्यक वस्तू व सेवा मिळू शकत नाही अशी स्थिती फक्त भांडवलशाहीतच आढळते.

अशा तऱ्हेने उत्पादक शक्ती व उत्पादन संबंध, यामधील अंतर्विरोध भांडवलशाहीमध्ये पुन्हा एकदा, अशा स्थितीत आले आहेत की, भांडवलदारांचा वर्ग कालबाह्य झाला आहे व बेकारी, दारिद्र्य व विषमता संपुष्टात आणण्यासाठी, उत्पादन साधनांवरील त्यांची मालकी संपुष्टात आणावी लागेल.

हा अंतर्विरोध एका प्रकारच्या जागी, दुसऱ्या प्रकारची खाजगी मालकी आणून, सुटू शकत नाही. उत्पादनाच्या सामाजिक स्वरुपाला योग्य अशी उत्पादनांच्या साधनांची मालकी सामाजिक असणे आवश्यक आहे. असे झाल्यावर, वर्गीय शोषण व दडपशाही संपुष्टात येऊ शकेल.

''संपूर्ण जगाची भांडवली शोषणातून मुक्तता करण्याचे ऐतिहासिक कार्य, आधूनिक सर्वहारावर्ग करील. या कार्याची ऐतिहासिक कारणमीमांसा आत्मसात करणे, त्याचप्रमाणे त्याची वैशिष्ठ्ये समजून घेणे, जो दडपलेला वर्ग हे ऐतिहासिक कार्य करणार आहे त्या वर्गाची जाणीव विकसीत करणे, तसेच हे कार्य यशस्वी होण्यासाठी, आवश्यक असणारी परिस्थिती विकसीत करणे, हे वैज्ञानिक समाजवादाचे कर्तव्य आहे व हा वैज्ञानिक समाजवाद सर्वहारा वर्गाच्या चळवळीची सैध्दांतिक मांडणी आहे.'' (अँटी डूहरींग, पान क्र. ३६९-३७०, एंगल्स)

मार्क्सवादाने हे ऐतिहासिक कार्य करण्यासाठी सर्वहारा वर्गाकरिता, जगाकडे बघण्याचा वैज्ञानिक दृष्टीकोन व क्रांतीकारी सैध्दांतिक विचारसरणी उपलब्ध करुन दिली. ही क्रांतीकारी सैध्दांतिक विचारसरणी वैज्ञानिक समाजवाद आहे व सर्वहारांचा क्रांतीकारी पक्ष या चळवळीच्या आघाडीचे नेतृत्व करतो.

सर्वहारा वर्गाने क्रांतीकारी विचारसरणी आत्मसात केल्याशिवाय व सत्ताधारी वर्गाविरुध्द प्रखर लढा करणारा क्रांतीकारी पक्ष वाढविल्याशिवाय क्रांती होऊ शकत नाही.

२० व्या शतकाच्या सुरुवातीस, भांडवलशाहीने मक्तेदारी भांडवलशाही टप्प्यात प्रवेश केला. म्हणजेच साम्राज्यवाद हा अत्युच्च टप्पा भांडवलशाहीने गाठला. साम्राज्यवाद म्हणजे सडलेली भांडवलशाही आहे. त्यामधील अंतर्विरोध तीव्र होतात व समाजवादी क्रांतीकडे भांडवलशाही जाते.

जगातील सर्वहारा वर्ग मार्क्सवाद-लेनिनवाद-माओवाद याद्वारे शस्त्रसज्ज झाला आहे व तो जगातील भांडवलशाही सशस्त्र समाजवादी क्रांतीद्वारा संपुष्टात आणील. कामगारवर्ग खाजगी मालकी निर्मूलन करण्याचे अपूर्ण कार्य पूर्ण करेल. रशियामध्ये १९१७ साली लेनिनच्या नेतृत्वाखाली जगातील पहिल्या समाजवादी क्रांतीने विजय प्राप्त केला. लेनिन

व स्टॅलिनच्या नेतृत्वाखाली, समाजवादी समाजरचनेच्या बांधणीला सुरुवात झाली. स्टॅलिनच्या मृत्यूनंतर, जे सत्तेवर आले, त्यांनी भांडवलशाहीची पुनर्रचना रशियामध्ये केली.

१९४९ साली माओच्या नेतृत्वाखाली चीनच्या जनतेने मोठे भांडवलदार व जमिनदारांची सत्ता यशस्वीपणे संपूष्टात आणली व नवजनवादी क्रांती पूर्ण केली. १९५६ सालापासून तेथे समाजवादी अर्थव्यवस्था आणण्यास सुरुवात झाली. माओच्या मृत्यूनंतर चीनमध्येही आधूनिक सुधारणावाद्यांनी भांडवलशाही पुन्हा प्रस्थापित केली.

या दोन्ही क्रांत्यांनी जगाला यशस्वी क्रांती कशी करायची, हे दाखविले व समाजवादी समाजाची बांधणी कशी करायची व कशी करायची नाही, याचा अनुभव जगाला दिला. आपण आधी बघितले की, क्रांतीची प्रक्रिया विजय-हार-विजय-हार-विजय या वाकड्या मार्गाने होते.

# प्रकरण ५

# आधुनिक वर्गविहीन समाज – साम्यवाद

भांडवली समाजामध्ये खाजगी संपत्ती आणि वर्गीय विभागणी यामुळे अंतर्विरोध तयार होतात व ते अशा अवस्थेत जाऊन पोहोचतात की, जेव्हा उत्पादक शक्ती व समाज विकास करु शकत नाही आणि त्यामुळे भांडवली उत्पादन संबंध नष्ट केल्याशिवाय आणि सामुदायिक उत्पादन संबंध प्रस्थापित केल्याशिवाय विकास शक्य होत नाही. याचा अर्थ असा होतो की, भांडवली उत्पादनाचे संबंध नष्ट झाल्यावर खाजगी संपत्ती आणि त्यातून निर्माण होणारे अंतर्विरोध अटळपणे नष्ट होणार आहेत आणि मानवी समाजामध्ये एकमेकांवर अवलंबित संबंध अटळपणे साम्यवादी समाजव्यवस्थेत प्रस्तापित होणार. आधुनिक वर्गविहीन समाज आदीम वर्गविहीन समाजापेक्षा खुप भिन्न असणार आहे. खाजगी संपत्ती, वर्गविभागणी आणि त्यावर आधारित पिळवणूक यांचा अभाव व त्याऐवजी एकमेकांशी सहकार्य करणारे उत्पादन संबंध हे या दोन्ही समाजव्यवस्थेतील समान घटक आहेत.

## समाजवाद

समाजवाद हा साम्यवादी व्यवस्थेचा पहिला टप्पा आहे. या अवस्थेमध्ये भांडवली व्यवस्था साम्यवादी व्यवस्थेमध्ये बदलते आणि वर्गावर आधारित समाज वर्गविहीन समाजात बदलतो. उत्पादनाच्या साधनांवर समाजाची मालकी असलेल्या सामाजिक संबंधाच्या पायावर समाजवादी समाज प्रस्थापित होतो. या टप्प्यामध्ये सर्वहारा वर्गांकडे राजकिय सत्ता असते व कामगारवर्गांची हुकूमशाही प्रस्थापित केली जाते. याचा अर्थ हा होतो की, समाजवादामध्ये वर्ग असतील, पण इतिहासात प्रथमच पिळवणूक करणाऱ्या वर्गाला कामगारांच्या हुकूमशाहीला तोंड द्यावे लागेल. सत्तेवर आलेल्या कामगारवर्गाने पुर्वीचे भांडवली शासन नष्ट केले पाहिजे. कारण या आधीच्या सर्व शासनांनी खाजगी संपत्तीच्या संरक्षणाचे कार्य केले आहे व शोषण करणाऱ्या वर्गांची बाजू शासनाने सदैव घेतली आहे. म्हणूनच जोपर्यंत साम्यवादाचा टप्पा गाठला जात नाही तोपर्यंत कामगार वर्गाची हुकूमशाही राबविणारी शासन व्यवस्था अंमलात आणली पाहिजे.

• जरी उत्पादनाच्या साधनांवर समाजाची मालकी आली तरी पुढील काळात छोटे-छोटे उद्योग खाजगी पद्धतीने चालविले जात असल्याने छोटे भांडवलदार मोठ्या संख्येने अस्तित्वात असतात. त्या सर्वांना सामुदायिक उत्पादनाच्या व्यवस्थेमध्ये आणण्यासाठी दीर्घ काळ लागतो. उत्पादनाच्या सर्व साधनांवर समाजाचा ताबा आल्यावरच खाजगी

संपत्ती संपुष्टात येऊ शकते.

• समाजवादी उत्पादन व्यवस्थेमध्ये जरी भांडवली उत्पादन व्यवस्था नष्ट झाली तरी भांडवली व्यवस्थेचे काही घटक अस्तित्वात असतातच. प्रत्येकास त्याच्या क्षमतेप्रमाणे व त्याच्या श्रमाप्रमाणे हे तत्व चालूच राहते. भांडवली शोषण जरी नष्ट झाले असले तरी वेतन ही संकल्पना चालूच राहते. प्रत्येकास त्याच्या क्षमतेनुसार व त्याच्या गरजेनुसार हे साम्यवादी तत्व अंमलात आणण्यासाठी वेतनातील तफावत जाणीवपूर्वक कमी करणे अत्यावश्यक असते. हे तत्व अस्तित्वात येण्यासाठी उत्पादनाच्या पातळीमध्ये प्रचंड वाढ करणे आवश्यक आहे.

• शरिरीक विरुद्ध बौद्धिक, शहर विरुद्ध खेडी इ. अंतर्विरोध चालूच असल्यामुळे साम्यवादी व्यवस्थेमध्ये दीर्घकालीन योजना आखून ते नष्ट करावे लागतात. स्त्री व पुरुष, निसर्ग विरुद्ध मानव यामधील अंतर्विरोधाचे स्वरुप बदलून ते एकमेकास पुरक करणे आवश्यक आहे.

हे लक्षात घेतले पाहिजे की, समाजवादाकडून साम्यवादाकडे जाण्याच्या प्रक्रियेमध्ये वर्गसंघर्ष अटळपणे येतो (कारण सर्व भांडवली घटक नष्ट झालेले नसतात). दोन विचारधारातील संघर्ष व सांस्कृतिक क्रांती या दोन मार्गाद्वारे वर्गसंघर्ष करावा लागतो. समाजवादामध्ये वर्गसंघर्ष हीच समाज घडविण्याची मोठी शक्ती असते. वर्गीय समाजातील अंतर्विरोध सोडविण्यासाठी वर्ग संघर्षाचा मार्ग वापरावा लागतो. सर्व जगात वा पृथ्वीवरील मोठ्या विभागात समाजवादाचा विजय झाल्यानंतर मानवी समाज साम्यवादाकडे जाऊ शकतो.

## वर्ग, राष्ट्र व शासन

मार्क्सच्या आधीही तज्ञांनी समाजामध्ये वर्ग आणि वर्गसंघर्ष असतात या विषयी मांडणी केली आहे. परंतु मार्क्सवादाने प्रथमच हे मांडले की, आतापर्यंतचा इतिहास वर्गसंघर्षाद्वारे घडविला गेला व वर्गसंघर्ष हिच खरी शक्ती समाजाच्या विकासास कारणीभूत आहे. वर्गीय समाजामध्ये उत्पादक शक्ती आणि उत्पादनाचे संबंध यामध्ये अंतर्विरोध निर्माण होतो आणि एक वेळ अशी येते की, जेव्हा उत्पादनाच्या संबंधामध्ये बदल केल्याशिवाय उत्पादनाच्या शक्ती वाढू शकत नाही व हिच क्रांतीची वेळ असते.

पुर्वीच्या काळी माणसे गटागटाने राहत होती. रक्ताचे जवळचे नाते असणाऱ्याचा गट तयार होत असे. उत्पादनाच्या साधनांवर सर्व गटाची मालकी असायची. त्यांची भाषा, त्यांच्या रुढी व परंपरा समान असायचे. त्यांचे धार्मिक विचार व विधी समान असायचे.

ते एकत्र येऊन निर्णय घेत असत. गटातील वरिष्ठ माणूस दैनंदिन व्यवहार नियंत्रित करीत असत. त्यांची लग्ने मात्र भिन्न गटातील मुलामूलीमधून होत असत. जवळचे संबंध असलेले अनेक गट एकत्र येऊन त्यांची जमात तयार होत असे. जमातीमध्ये समान भाषा व समान भौगोलिक प्रदेश हे गुणधर्म आढळतात.

कालांतराने जेव्हा खाजगी संपत्तीची निर्मिती झाली तेव्हा रक्त संबंध कमजोर झाले व अनेक जमाती एकमेकांत मिसळू लागल्या, त्यानंतर खाजगी मालमत्तेच्या आधारावर राष्ट्र ही संकल्पना निर्माण झाली. भांडवलशाही प्रस्थापित झाल्यानंतरच राष्ट्र ही संकल्पना सशक्त झाली. समान भाषा, समान भौगोलिक प्रदेश, समान संस्कृती व सामुदायिक आर्थिक व्यवहार हे राष्ट्रांचे गुणविशेष राहिले आहेत.

भांडवली सामाजिक वैज्ञानिक मात्र वंश आणि राष्ट्राची सांगड घालुन गोंधळ निर्माण करीत असतात. वसाहतीचे राजकारण करणाऱ्या भांडवलदारांनी वर्गसंघर्ष टाळण्यासाठी वंश श्रेष्ठत्वाच्या खोट्या सिद्धांताचा वापर केला व आपल्या वसाहतींचे समर्थन केले.

राष्ट्र व वर्ग हे दोन्ही घटक समाजाची उभारणी खाजगी संपत्तीच्या आधारावर होत असतानाच उदयास आले आहेत, परंतु राष्ट्र हा घटक समानता असणाऱ्या समाजावर आधारित नाही. प्रत्येक राष्ट्रामध्ये एकमेकांविरुद्ध हितसंबंध असणारे वर्ग अस्तित्वात आहेत. परंतु भांडवली विचारधारा अशा भिन्न असणाऱ्या वर्गांचे अस्तित्व नाकारते व धर्म, राष्ट्र, राष्ट्रभक्ती इ. याचा आधार घेऊन वर्गसंघर्ष दडपून टाकण्याचा प्रयत्न करतात.

भांडवली विचारवंत असे मानतात की शासन वर्ग आशय लक्षात घेत नाही व वर्गहितापासून अलिप्त आहे व समाजाच्या सर्व सभासदांच्या संमतीने त्यांच्या संरक्षणासाठी अस्तित्वात आले. मार्क्सवादी सिद्धांतांनी वरील मांडणीतील खोटेपणा उघडकीस आणला व विशेषत: आधूनिक भांडवली शासनाचे स्वरुप समाजासमोर स्पष्ट केले. मार्क्सने सिद्ध केले की, शासन शोषित वर्गांच्या दमनासाठीच निर्माण झाले व ते शोषक वर्गाचे हत्यार आहे आणि जेव्हा शोषणरहित समाज अस्तित्वात येईल तेव्हाच ते नष्ट होईल.